मेहता मराठी
# ग्रंथजगत
डिसेंबर, २०१६ । पृष्ठे १००। किंमत १५ रुपये





## ग्रामीण साहित्याचा आधारवड...
# ‘झोंबी’कार डॉ. आनंद यादव

विशेषांक

# तू संयमशीला

चेंडूसारखे चिमुकले क्षुद्र
किती किती सूर्य गेले तुझ्यावरून.
तुझी प्रसन्न शांती होरपळून पाहात,
तुझी दया-दानत भेगाळून भेगाळून,
किती युगे तुझ्या अंगावर
उड्या मारून उडून गेली.
किती संस्कृतींची बाळे उठून
नसलेल्यात नाहीशी झाली.
फुलून फुलून घेरी आलेल्या गंध-वेड्या
ऋतूऋतूंनी तुला समर्पण-भाव दिला.
अफाट-बेफाट सापडेल तिथं पसरत
पिकांचा दरया फुलल्यावरही तू संयमशीला.
सत्-चित्-आनंद तू;
आविष्कारातही असतेस स्तब्ध.
फळाफुलांच्या झाडाझुडुपांच्या
कलाकृतींना मौनाचेच असतात शब्द.
तुझ्या सूक्ष्म कणांतील प्रचंड आशय
वड-पिंपळांतून आविष्कार घेत जातो.
वेद-उपनिषदांतील चिरंतन उन्मेष तुझा
वस्तूवस्तूवर सौंदर्यत आकारतो.

**- डॉ.आनंद यादव**

'मळ्याची माती' या कविता संग्रहातून

# मेहता मराठी ग्रंथजगत

। डिसेंबर २०१६ । वर्ष सोळावे । अंक बारावा ।

## अनुक्रमणिका


**संपादकीय** ४

**लेखकांचे लेखक डॉ. आनंद यादव**
रवींद्र ठाकूर १०

**साहित्यातलं काटकोनी वळण**
डॉ. सुनीलकुमार लवटे १५

**अवगुणी समाजातला गुणा** अतुल कुलकर्णी २२

**'नटरंग' कादंबरी ते सिनेमा** कीर्ती मुळीक २४

**वाचकमनाची मशागत...** अरुण नाईक ३६

**ग्रामीण साहित्य चळवळीचे प्रवक्ते**
जयराम देसाई ३९

**असं घडलं 'झोंबी'चं कव्हर** अनिल मेहता ४४

**साहित्यातील आनंदयात्री** विजय बाविस्कर ४६

**ग्रामीण साहित्यातील दीपस्तंभ** रवींद्र शोभणे ४९

**आनंदाचे डोही...!** ह.ल. निपुणगे ५३

**नारबाचा गोतावळा** उज्ज्वला केळकर ५८

**श्रद्धांजलीपर लेख** ६६

**कथा : आनंद यादवांची** ८५



संपादक
**सुनील मेहता**

कार्यकारी संपादक
**शंकर सारडा**

अंकाची किंमत **१५ रु.**

वर्गणी
**मनीऑर्डरने अथवा ऑनलाईन पाठवावी.**

प्रसिद्धी
**दरमहा ११ तारखेस**

**मांडणी-अक्षरजुळणी**

**मेहता पब्लिशिंग हाउस**



संपादक-मुद्रक-प्रकाशक
सुनील मेहता,
१९४१ सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड
टेलिफोनभवनसमोर, पुणे - ४११ ०३०
फोन : ०२०-२४४७६९२४ / २४४७५४६२
Extension (ग्रंथजगत विभाग) - २२४/२२५
E-mail : info@mehtapublishinghouse.com


**डिजिटल अंकाची वर्गणी : तीन वर्षांची ३००रु., पाच वर्षांची ४००रु.**

या अंकातील लेखांतील मते ही त्या त्या लेखकांची असून त्यांच्याशी संपादक सहमत असतीलच असे नाही.




# ‘आनंद’ हरपला

साठच्या दशकापर्यंतचं मराठी साहित्य म्हणजे मध्यमवर्गीय जाणिवांच्या पायावर उभा असलेला कल्पनाविष्कार. या साहित्यात खेड्याचं दर्शन आलं, तरी ते टवाळखोरीच्या स्वरूपातच अधिक होतं. अशात मराठी साहित्य विश्वाच्या पटलावर एक ‘आंदा’ अवतरला. त्यानं वास्तवाचे निखारे शब्दांत उतरवले. ते निखारे खोल कळ उमटवणारे होते. झोंबणारे होते. दारिद्र्य आणि अज्ञानाच्या खोल बोगद्याच्या बाहेर या निखाऱ्यांची प्रकाशरेघ दिसू लागली. एक आनंद पिढ्या न् पिढ्यांचं दुःखं मुठीत घेऊन भाषाविश्वात आला. त्यानं मराठी भाषेलाही बोली बदलायला लावली. एका अनभिज्ञ जगण्याचं मराठी साहित्य विश्वात प्रतिनिधित्व केलं. एक चळवळ उभी केली. ही चळवळ वाढली. बहरली. ती आज एका आश्वासक टप्प्यावर उभी आहे. पण या ग्रामीण साहित्य चळवळीचे प्रवर्तक डॉ. आनंद यादव आज आपल्यात नाहीत. मेहता पब्लिशिंग हाऊसचे आधारस्तंभ डॉ. यादव यांच्या जाण्याने निर्माण झालेली पोकळी भरून निघणारी नाही. पण त्यांच्या साहित्याचा अक्षय वारसा आपल्यासोबत आहे. त्या अक्षर आनंदाचं स्मरण या अंकामधून करीत आहोत.

ग्रामीण साहित्य चळवळीला १९७४च्या सुमारास सुरुवात झाली. देशातली ७५ टक्के जनता खेड्यात राहणारी असूनही तिचं पुरेसं प्रतिबिंब साहित्यात उतरत नव्हतं. साहित्याच्या मध्यावर तिला स्थान

नव्हतं. अशात आनंद यादव हे नाव कथा, कादंबरी, कविता, ललित गद्य, वैचारिक अशा अनेकविध साहित्य प्रकारांत पुढे येत होतं. आपल्या लेखक म्हणून जडणघडणीसोबतच त्यांनी पुण्यात मेहता पब्लिशिंग हाऊसची मुहूर्तमेढ रोवण्यात हातभार लावला. आणि या जोडीनं ग्रामीण साहित्यात भरीव योगदानाची शृंखला सुरू केली. डॉ. यादव यांच्या 'गोतावळा' आणि 'झोंबी' पुस्तकांनी विक्रमांची मालिका अनुभवली. साहित्य अकादमीच्या पुरस्कारावर नाव कोरलं. आकाशवाणीवर काम करणाऱ्या डॉ. यादव यांनी एम.ए. पूर्ण केलं आणि प्राध्यापकाचा पेशा स्वीकारला. १९९५ पर्यंत पुणे विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख म्हणून काम करत असतानाच त्यांनी मराठी साहित्य विश्वाला दर्जेदार साहित्यकृती बहाल केल्या.

डॉ. यादव यांनी ग्रामीण भागातील रवींद्र शोभणे, सदानंद देशमुख, अनंत भोयर यांच्यासारख्या नव्या लेखकांना मेहता पब्लिशिंग हाऊसशी जोडलं. ग्रामीण साहित्याला वैचारिक भूमिका दिली. त्यातून ग्रामीण साहित्यात बदलत्या ग्रामजीवनाचे प्रतिबिंब उमटू लागले. खेड्यापाड्यातल्या संमेलनांमधून नव्या पिढीचे विचार स्पष्ट होऊ लागले. एका दबलेल्या वर्गाला आवाज लाभला. हाच आवाज डॉ. आनंद यादव यांच्या लेखणीने अधोरेखित केला. 'गोतावळा' आणि 'झोंबी'सारख्या कादंबऱ्यांनी शेती संस्कृतीतलं जगणं जगासमोर आणलं. तर 'नटरंग'मधल्या गुणानं लिंगभेदाच्या विदारक वास्तवाला शब्दरूप दिलं. डॉ. यादव यांची लेखणी सातत्यानं सामाजिक संकुचिततेवर प्रहार करत राहिली. त्यांनी ग्रामीण भाषेबाबतची संकुचितताही मोडीत काढली. आपल्या समाजाचा आवाज त्यांच्या शब्दांत व्यक्त केला. तो ज्या आत्मविश्वासानं व्यक्त केला, त्या विश्वासानंच त्या भाषेला मराठी सारस्वतात समावेशकता मिळवून दिली. ग्रामीण लेखकांची तिसरी पिढी लिहिती झाली आहे; पण तिला साहित्य विश्वात स्थान मिळवून देण्याचं ऐतिहासिक काम डॉ. यादव यांच्या नावावर नमूद आहे.

८२व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्ष-पदानंही डॉ. आनंद यादव यांच्या लेखनाचं सामर्थ्य मान्य केलं. आपला विचार आणि आवाज वाचकांपर्यंत पोचवताना त्यांना अनेक विवादांनाही तोंड द्यावं लागलं. पण या विवादांच्या पलीकडे जात त्यांनी समाजसंवादाचे प्रयत्न कायम ठेवले. आयुष्याच्या उत्तरार्धात त्यांनी लेखनाला विराम दिला; पण आपल्या वैचारिकतेची पेरणी ते कायम करत राहिले. मराठीच्या समृद्धतेवर विश्वास ठेवत राहिले. लिहित्या हातांना कायम आधार देत राहिले. डॉ. आनंद यादव यांची स्वतःची साहित्यसंपदा आणि त्यांनी इतर लेखकांना दिलेली प्रेरणा मराठी साहित्याचा मोठा ठेवा आहे. त्यामुळे मराठी साहित्य विश्व त्यांच्या आश्वासक शब्दांना कायम स्मरणात ठेवेल.

डॉ. आनंद यादव म्हणतात,

**‘मराठी भाषेची मला चिंता नाही. नवी पिढी चांगले लिहिते आहे. प्रखर वास्तववादी लेखन तरुण साहित्यिक करत आहेत. त्यामुळे मराठी कधीच हद्दपार होणार नाही.’**

**मराठी साहित्य विश्वाच्या या आश्वासक आवाजाला विनम्र श्रद्धांजली!**



## मेहता मराठी ग्रंथजगत

### विशेष...

**दि. १ मार्च, २०१६ पासून**
**मेहता पब्लिशिंग हाऊस**
**'मेहता मराठी ग्रंथजगत'ची**
**वार्षिक वर्गणी**
**बंद करीत आहोत.**
**तरी आपण**
**त्रैवार्षिक किंवा पंचवार्षिक वर्गणी**
**पाठवून सहकार्य करावे,**
**ही विनंती.**

**नवनवीन पुस्तकांच्या अद्ययावत माहितीसाठी आजच वर्गणीदार व्हा.**

त्रैवार्षिक वर्गणी ३५० रुपये / पंचवार्षिक वर्गणी ५०० रुपये

# वाचकांसाठी सुवर्णसंधी!

# WORDPOWER

Books | Toys | Stationery | Music | Movies | Games

## बेळगाव / कोल्हापूर / औरंगाबाद

पुस्तके, खेळणी, स्टेशनरी, म्युझिक, मूव्ही, गेम्स अन्यही बरेच काही आता वर्डपॉवरच्या एकाच दालनात उपलब्ध आहे. सुट्टीचा आनंद पुरेपूर लुटण्यासाठी अवश्य भेट द्या.

बेळगाव, कोल्हापूर, औरंगाबाद येथील वर्डपॉवरचा पत्ता पुढीलप्रमाणे

पहिला मजला, खानापूर रोड, भंडारी कॅपिटल, कॉसमॉस बँकेच्या वर, खानापूर रोड, टिळकवाडी, बेळगाव-५९०००६. टेलिफोन क्र. (०८३१)-४२००६७६

शॉप नं १, ग्राऊंड फ्लोअर, अथर्व एम्पाअर, ताराबाई पार्क, कोल्हापूर-४१६००३. टेलिफोन क्र.(०२३१)-६६१७६२५/२६

स्टार बझार, पुणे-बेंगलोर हायवे, कोल्हापूर – ४१६००१

शॉप नं. - जी/१५, प्रोझोन मॉल, चिखलठाणा, एमआयडीसी, औरंगाबाद - ४३१००६.

अधिक माहितीसाठी संपर्क

www.wordpowerbookshop@gmail.com

Find us on Facebook

https://www.facebook.com/mehta.publishinghouse

**सर्व प्रकारची महाविद्यालयीन पुस्तके, युपीएसी, एमपीएसी, सेट-नेट, इंजीनिअरिंग, मेडिकल, मॅनेजमेंट, सायन्स, कॉम्प्युटर इ. विविध विषयांवरील क्रमिक व संदर्भ पुस्तके यांचे माहेरघर**

# मेहता बुक सेलर्स

३२२, भाऊसिंगजी रोड, भवानी मंडपाजवळ,
कोल्हापूर ४१६ ०१२.
वेळ : सकाळी ९.३० ते रात्री ८ **(शनिवारी बंद)**
फोन : (०२३१) २५४२९०१/२५४२३०४/२५४१८८१

Email : mehtabooksellers@gmail.com

GET IT ON Google Play आणि dailyhunt

यांच्या संयुक्त विद्यमाने

नाहीत स्कॅन केलेली पाने किंवा नाहीत पीडीएफ्स...
मराठीत प्रथमच, खरीखुरी eBooks युजर फ्रेंडली, वाचायला सोपी,
सोयीस्कर- थेट तुमच्या कॉम्प्युटर, आयपॅड आणि ॲन्ड्रॉइड टॅब्लेटवर!

**eBooks**





# लेखकांचे लेखक डॉ. आनंद यादव

– रवींद्र ठाकूर

मी लेखक आहे की नाही ते मला माहीत नाही. समीक्षक तरी किती आहे तेही निश्चितपणे सांगू शकत नाही. कथा, कविता, कादंबरी, समीक्षा अशी पंचवीस पुस्तके लिहूनही मी कोणी प्रस्थापित लेखक आहे अशी परिस्थिती नाही. कदाचित असेही असेल की, मी कुठल्या गटात नाही की तटात नाही. मी कधी कोणाचा झेंडा घेऊन नाचलो नाही की मी कधी कोणाची तळी उचलली नाही. राजकारण हा तर माझा पिंडच नाही. आपण आपलं काम करत राहावं, एवढा एकच मंत्र मला माहीत आहे. कारण आनंद यादव यांच्यासारख्या गुरुवर्याकडून तेवढंच मी शिकलो. एकंदरीत आज मी जो काही आहे तो यादव सरांसारख्या माणसांमुळे आहे, हे सांगायला मला मुळीच संकोच वाटत नाही. आयुष्याच्या प्रवासात त्या वेळी कोत्तापल्ले सर, यादव सर यांच्यासारखी माणसे भेटत गेली म्हणूनच आजवरचा हा प्रवास झाला हे निःसंशय. ती माणसे भेटली नसती तर काय झाले असते, हा विचारही मनाला अस्वस्थ करतो.

औरंगाबाद शहरात रस्तोरस्ती पेपर विकत, कुठे हातमजुरी करत तर कुठे दुकानात पुड्या बांधत एम.ए. झालो आणि कोत्तापल्ले सरांच्या मार्गदर्शनामुळे औसद-शहाजानीसारख्या एका खेडेवजा गावात मदतीचा प्राध्यापक म्हणून रुजू झालो. तिथे दोन वर्षे काम केल्यावर सिनियर कॉलेजमध्ये नोकरीची संधी मिळाली म्हणून उदयगिरी कॉलेज उदगीर इथे गेलो. हे सगळे करीत असताना रात्रंदिवस अफाट असे वाचन सुरूच होते. त्यात झाले असे की, प्रसिद्ध समीक्षक डॉ. गो.म. कुलकर्णी हेच आमचे विभागप्रमुख होते. त्यांना मी पीएच.डी. करायचा मनोदय बोलून दाखवला. त्यांनी आनंदाने संमती दिली आणि मार्गदर्शक व्हायची तयारीही दर्शवली. र.वा. दिघे यांच्या कादंबरी वाङ्मयावर अभ्यास करायचा असा निर्णय होताच. मी कामाला लागतो.

परंतु तशात माझी प्राध्यापकाची नोकरी धोक्यात आली. मी पूर्ण वेळ होतो तिथे कार्यभार कमी झाल्याने झटक्यात अर्ध वेळ झालो. संसार वाढलेला. पुन्हा नोकरीसाठी वणवण सुरू झाली. असाच भटकत असताना पुण्याजवळ दौंड इथल्या कॉलेजमध्ये मुलाखत दिली. मुलाखत इतकी छान झाली की, मुलाखती संपताच 'तुमचे सिलेक्शन झाले आहे'असे सांगून आणि माझे अभिनंदन करून यादव सर निघूनही गेले.

दौंडला रुजू झाल्यावर थेट उदगीरला जाऊन कुलकर्णी सरांना भेटणे जमेनासे झाले. तशातच त्यांना दृष्टीच्या अधूपणामुळे वाचनाचा त्रास होत असे. एके दिवशी ते म्हणाले, ''आता तुम्ही पुण्याजवळच आहात. तेव्हा यादवांना भेटा. ते तुम्हाला जरूर सहकार्य करतील. मी पाठवलं आहे म्हणून सांगा.'' त्याप्रमाणे यादव सरांना घरी जाऊन भेटलो. झालेल्या कामाची माहितीही दिली. त्यांनी 'हे वाचले आहे का, ते वाचले आहे का' म्हणून विचारायला सुरुवात केली. गंमत म्हणजे त्यांनी जे-जे विचारलं ते-ते सगळे मी वाचलेले होते. समोरचा विद्यार्थी अगदीच काही कच्चा नाही, हे त्यांच्या लक्षात आले असावे. एका क्षणात त्यांनी 'अभ्यास सुरू ठेवा. नावनोंदणीचं काय ते मी पाहतो,' असे सांगून माझा मार्गच मोकळा केला. एवढ्या मोठ्या माणसाने कुठलेही आढेवेढे न घेता, कुठलीही ओळखदेख नसताना असे प्रोत्साहन द्यावे, या गोष्टीने मला फार आनंद झाला. आता मात्र मी दुप्पट वेगाने कामाला लागलो.

दरम्यान माझ्या व्यावसायिक जीवनात आणखी उलथापालथी झाल्या. दौंड सोडून मी कोल्हापूरला यशवंतराव चव्हाण (के.एम.सी.) महाविद्यालयात स्थलांतरित झालो. वस्तुतः 'तुम्ही कोल्हापूरला अजिबात जाऊ नका. तिथं तुम्हाला विकासाची पुरेशा संधी मिळणार नाही,'असे सर म्हणाले होते. परंतु माझा नाइलाज होता. मला कोल्हापूरला जावेच लागले. सर म्हणाले होते, ते खरेच ठरले. कोल्हापुरात प्रोत्साहन देणारे कमी आणि खच्चीकरण करणारेच खूप भेटले. ल. रा. नाझिराबादकर, प्राचार्य करांबळे, कमलाकर दीक्षित अशी काही चांगली माणसे भेटली; परंतु काही धेंडांनी मला शत्रूसारखे वागवले. माझा अपराध एकच होता आणि तो म्हणतो मी यादव सरांचा पीएच.डी.चा विद्यार्थी होतो. साहित्याच्या आणि संशोधनाच्या क्षेत्रातही अशी हीन पातळीवरची गटबाजी आणि हेवेदावे, द्वेष, मत्सर असतात, हे पाहून फार वाईट वाटले. परंतु म्हणून मी माझा निर्णय बदलणार

२१वी आवृत्ती




# झोंबी

**आनंद यादव**

**किंमत : ३२०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

आजच्या आर्थिक आणि
सामाजिक परिस्थितीत
अस्वस्थ होऊन घुमसणे
हाच ग्रामीण जीवनाचा स्थायीभाव आहे.
त्या अस्वस्थपणाचा स्फोट
मराठी साहित्यात सुरू झालाच आहे.
हे व्हायला हवेच होते.
शिवाय, साऱ्या जगातलं साहित्य
समृद्ध केलं आहे ते या
झोंबी सारख्या वाचकाला
अस्वस्थ करणाऱ्या ग्रंथानीच!

**– पु.ल.देशपांडे**

नव्हतो. महिना-दोन महिन्यांतून पुण्याला जायचो आणि सरांशी चर्चा करून यायचो .

सहज एके दिवशी सर म्हणाले, ''तुम्ही बरीचशी ग्रामीण कादंबरी वाचून काढली आहे. तुमचं इतर वाचनही चांगलं आहे. तुम्ही ग्रामीण कादंबरीचा इतिहास लिहा. छान लिहू शकाल.''

मी तीन ताड नाही तरी एक ताड तरी उडालोच. मी आणि ग्रामीण कादंबरीचा इतिहास लिहिणार? पीएच.डी. झालो तरी खूप! नाही म्हणायला तोपर्यंत मी किरकोळ कविता आणि कथा लिहिल्या होत्या. एम.ए.ला असताना कोत्तापल्ले सरांच्या प्रोत्साहनामुळे चार-दोन परीक्षणंही लिहिली होती. परंतु एक संपूर्ण पुस्तक लिहायचं म्हणजे अवघडच होतं. कविमित्र फ. मुं. शिंदे यांच्या सहकार्यामुळे माझा एक कवितासंग्रह मात्र तोवर प्रकाशित झालेला होता.

सरांचा आत्मविश्वास मात्र दांडगा होता. ते पुनःपुन्हा आग्रह करतच राहिले. मी म्हणालो, ''सर आपण म्हणता तसं मी पुस्तक लिहीनही; पण ते छापणार कोण? कुठल्याही प्रकाशकाशी माझी ओळखदेख नाही. मी एक सामान्य प्राध्यापक; मला कोण ओळखतो?''

तत्काळ सर म्हणाले,''ती काळजी तुम्ही करू नका. तुम्ही लिहा. प्रकाशनाचं मी पाहतो.''

'आंधळा मागतो एक डोळा' अशी माझी अवस्था झाली. आपण जे लिहू, ते छापलं जाणार आहे म्हटल्यावर माझा हुरूप वाढला. सर प्रकाशनाची जबाबदारी घ्यायला तयार आहेत म्हटल्यावर मी तत्काळ ओळखलं की, आपलं पुस्तक झालं तर ते 'मेहता पब्लिशिंग हाऊस'तर्फेच येणार. एका नामवंत आणि प्रतिष्ठेच्या प्रकाशन संस्थेतर्फे पुस्तक येणार असेल तर या संधीचं सोनं केलंच पाहिजे, या जिद्दीने मी कामाला लागलो. रात्रंदिवस खपून कादंबऱ्या वाचल्या. हिंदी-मराठी सगळी समीक्षा धुंडाळून काढली. करवीर वाचन मंदिराची आणि भास्करराव जाधव वाचनालयाची कपाटं पालथी घातली. मुद्दे काढले, टिपणं लिहिली. लेखन-पुनर्लेखन, कादंबऱ्यांची सूची असा बराच उद्योग करत राहिलो.

एके दिवशी तयार झालेली मुद्रणप्रत घेऊन पुण्याला गेलो आणि मोठ्या आनंदाने ती प्रत सरांच्या हाती ठेवली. मला वाटले होते की, सर मला मेहतांकडे पाठवतील; परंतु सरांनी ती जबाबदारी स्वतःच पार पाडली. मी

निश्चिंत मनानं कोल्हापूरला परत आलो.

आणि यथावकाश 'मराठी ग्रामीण कादंबरी' हे माझे पुस्तक अत्यंत देखण्या स्वरूपात प्रकाशित झाले. दीपक संकपाळ यांनी त्याचे अत्यंत समर्पक असे मुखपृष्ठ तयार केले होते. पुस्तक प्रकाशित होताच सगळीकडून प्रतिक्रियांचा पाऊस सुरू झाला. या पुस्तकाची फार गरज होती, असे अनेकांचे म्हणणे पडले आणि ते खरेच होते. अचानक एके दिवशी ध्यानीमनी नसताना या पुस्तकाला कोपरगावचा भि.ग. रोहमारे पुरस्कार जाहीर झाला. त्या संदर्भात भेट झाली असताना समितीचे काम पाहणारे डॉ. गणेश देशमुख म्हणाले की, ग्रामीण कादंबरीचा सलग असा इतिहास असलेले ते पहिलेच पुस्तक आहे. त्यामुळे निवड समितीने आवर्जून हा पुरस्कार दिला आहे. कळवा येथे झालेल्या दलित-आदिवासी ग्रामीण साहित्य संमेलनात तो पुरस्कार मला मोठ्या सन्मानाने बहाल करण्यात आला. आपले परिश्रम कारणी लागले आहेत, असेच मला वाटले.

या ग्रंथामुळे एक झाले- 'मेहता पब्लिशिंग हाऊस'शी निर्माण झालेले माझे ऋणानुबंध आणखी दृढ होत गेले. या ग्रंथापाठोपाठ 'आनंद यादव : व्यक्ती आणि वाङ्मय', 'कादंबरीकार र.वा. दिघे' हे ग्रंथ प्रकाशित झाले. त्यानंतर सुमारे सात वर्षे राबून लिहिलेली 'महात्मा' ही कादंबरीही मेहतांनी आवर्जून प्रकाशित केली. मी लिहावे आणि मेहतांनी छापावे, असा परिपाठच सुरू झाला. कर्ण चरित्रावरील 'धर्मयुद्ध', उच्च शिक्षणाच्या क्षेत्रात माजलेल्या भ्रष्टाचाराचा वेध घेणारी 'व्हायरस' या कादंबऱ्याही त्यांनीच प्रकाशित केल्या. यादव सरांमुळे निर्माण झालेला हा ऋणानुबंध अजूनही टिकून आहे आणि यापुढेही टिकून राहणार आहे, यात शंका नाही.

तर असे हे आमचे यादव सर... त्यांनीच माझ्यातला लेखक-समीक्षक हेरला आणि त्याला खतपाणी घातले. म्हणूनच तर या लेखाचे शीर्षक 'लेखकाचे लेखक आनंद यादव' असे दिले आहे. हा माझाच नाही तर अनेकांचा अनुभव आहे. मराठी साहित्याच्या क्षेत्रात असे दुसऱ्याला हात देऊन मोठे करणारे लेखक किती मिळतील, हाच प्रश्न आहे. एरवी जातीपातीच्या खातेऱ्यात लोळणारे, गटबाजीच्या डबक्यात बुडालेले मराठी लेखक आणि तथाकथित अल्लड समीक्षक पाहिल्यावर सरांची थोरवी कळते आणि आपण किती मोठ्या माणसाच्या सहवासाला मुकलो याची अंतर्मुख करणारी जाणीव होते.

❖



# साहित्यातलं काटकोनी वळण

– डॉ. सुनीलकुमार लवटे

सन १९६० पर्यंतचं मराठी साहित्य स्थूलमानानं नागरी होतं. लिहिणारे साहित्यिक, त्यांचे विषय, पात्रं, समस्या, भाषा, प्रश्न, परिवेश सारं नागरी जीवनावर बेतलेलं असायचं. पण 'ठार ग्रामीण' प्रवाह म्हणता येईल असं साहित्य तत्पूर्वी नव्हतं. पूर्वकाळात जरूर त्याच्या पाऊलखुणा सापडतात, पायवाट मळण्याचे प्रयत्नही आढळतात; पण ग्रामीण साहित्याचा ध्यास घेऊन साहित्याच्या विविध प्रकारांमध्ये लेखन करणं, त्याच्या समीक्षेबद्दलची कसोटी तयार करणं, तिचं व्याकरण नि भाषा वेगळी आहे असं ठासून सांगणं, त्यासाठी नागरी साहित्यिक, संपादक, समीक्षकांकडून 'यादव पत्रिका', 'यादव काल' (जो पुढे त्यांचा 'काळ' ठरला!) अशी हेटाळणी सहज करणं नि तरीही ग्रामीण साहित्याबद्दलचा आपला आग्रह न सोडणं अशा प्रतिबद्धपणे ग्रामीण साहित्य लिहिणं, त्याबद्दल बोलणं, साहित्यिक आंदोलन उभं करणं, नवशिक्षित ग्रामीण साहित्यिकांना लिहितं करणं, प्रोत्साहन देणं अश अनेक अंगांनी प्रचलित मराठी नागरीप्रचुर साहित्यास मिलिटरी भाषेत सांगायच तर 'अबाऊट टर्न' करणं नि वाहत्या रस्त्यावर सरळ नवा काटकोनी रस्ता तयार करणं (आजच्या भाषेत तर त्याला सहा पदरी काँक्रीटचा हमरस्ता, सुपर हायवे, एक्सप्रेस हायवेच म्हणायला हवं!) असं ऐतिहासिक कार्य डॉ. आनंद यादव यांनी केलं.

ग्रामीण साहित्य लेखन हा डॉ. यादवांच्या जीवनातील मूलभूत स्पंदनाचा भाग आहे. तो त्यांचा श्वास आहे, प्राण आहे. जीवनाचा तो एक न संपणारा शोध आहे. तो त्यांचा 'आदिताल' आहे. त्यामागे पूर्वसुरींच्या प्रेरणा आहेत. डॉ. यादव महात्मा फुले यांना मराठी ग्रामीण साहित्याचे आद्य जनक म्हणून स्वीकारतात. त्यांच्या दृष्टीनं सन १९०३ मध्ये लिहिलेली रामचंद्र विनायक टिकेकर ऊर्फ धनुर्धारी यांची 'पिराजी पाटील' ही पहिली ग्रामीण कादंबरी. ग्रामीण जीवनावर बेतलेल्या 'पाणकळा', 'सराई', 'आई आहे शेतात', 'पड

रे पाण्या', 'कार्तिकी'सारख्या कादंबऱ्या लिहिणारे र. वा. दिघे त्यांच्या दृष्टीने मराठी मातीचे खरे कादंबरीकार. ग्रामीण कवयित्री म्हणून ते बहिणाबाई चौधरींना आद्य स्थान बहाल करतात. त्यामुळे त्यांनी स्वतःस ग्रामीण साहित्याचे आद्य जनक म्हणवून घेतलं नाही हे स्पष्ट आहे. पण या प्रवाहास 'मध्यप्रवाह' बनवण्याचं श्रेय मात्र त्यांनाच द्यावं लागेल.

त्यांच्या कविता, कथा, कादंबरी, विनोद, वगनाट्य, ललित लेख, समीक्षा, व्यक्तिचित्रं, संपादन, भाषणं, आत्मचरित्र, वैचारिक लेख, प्रस्तावना, लेखन, बालकविता अशा विविधांगी विपुल लेखनाचा मूळ स्वर ग्रामीण आहे. डॉ. यादवांचा जन्म खेड्यातला. कुटुंब शेतकरी. घरी अक्षरशत्रुत्व. अशा स्थितीत 'मीच शोधीन माझा मार्ग' असा ध्यास घेत ते शिकले. प्रतिभा कवितेनं उमलते. तशी 'हिरवे जग' (१९६०) घेऊन ती आली. 'मळ्याची माती' (१९७८) तिनं मराठी मनाला दाखवली.

नगं हासूस कारभारणी
दुर्मिळ हाय तुझा रंग
केवड्याच्या पोटरीला
खरंच डसंल भुजंग

सारख्या ओळीतून तयांच्या कवितेचा ग्रामीण बाज जसा लक्षात येतो तशी तिच्यातील प्रागतिकता

पोराचं हाय पुढला लगीन;
वाईच विचारानं पेरणी वाढा
जुंधळ्या-तुरीच्या पिकापरास
गव्हा-तांदळाचं पीका काढा

मधून व्यक्त होते. गावच्या काळ्या आईची सारी रया व्यक्त करणाऱ्या या कवीनं आपल्या कवितांतून ग्रामीण संस्कृती, संवाद, भाषा, व्यवहार, व्यथा, वेदना, वास्तव प्रकट केलं. यादवांचे कवितेचे आणखी धुमारे 'मायलेकरं' (१९८९), 'रानमेवा' (१९९९) 'सैनिक हो तुमच्यासाठी' (२०००) मध्ये दिसतात. त्यात अंतिम दोन्हीत बालकवितांचा बाज आहे.

'खळाळ' (१९६७) ते 'उगवती मने' (२००३) या कथालेखनाच्या प्रवासात डॉ. यादव यांनी आपल्या दहा कथसंग्रहांतून ग्रामीण जनतेची सुखदुःखं व्यक्त केलं. व्यक्ती नि तिच्या व्यवहारातून ग्रामीण जीवन अधोरेखित करण्याचं त्यांचं कसब डोळ्यांत भरतं. खेड्यातील पात्रं, त्यांची

बोली, त्यांचा थेटपणा नागरी साहित्यास काटकोनी छेद देत आपला अस्सलपणा ठसवतो. 'डवरणी' (१९८२), 'उखडलेली झाडे' (१९८६), 'झाडवाटा' (२००१) अशा शीर्षकांतूनही तो स्पष्ट होतो. 'इंजनं', 'मोट', 'गिधाडं' या कथा वाचक विसरूच शकत नाहीत. यादवांच्या आत्मपर लेखनशैलीचं सावट कादंबऱ्यांप्रमाणेच कथेतही पडलेलं दिसतं. या कथात्मकतेचं उजवेपण आज राजन गवस, कृष्णात खोत, अप्पासाहेब खोत यांच्या लेखनात दिसतं. त्यातलं देशीपण आज अधिक ठळक होत आहे, हे डॉ. यादवांच्या स्वप्नाचं वर्तमान सत्य वा वास्तव म्हणून सांगता येईल.

तीच गोष्ट कादंबऱ्यांची. 'गोतावळा' (१९७१), 'नटरंग' (१९८०), त्याच वर्षी आलेली 'एकलकोंडा', 'माउली' (१९८५), 'कलेचे कातडे' (२००१) व लोकसखा ज्ञानेश्वर (२००५) या लेखनाचा आलेख ग्रामीणतेकडून कलात्मक प्रयोगाकडे असा दिसतो व तो वरचढही मानावा लागेल. रा. रं. बोराडे यांच्या 'पाचोळा'शी स्पर्धा करत त्याच वेळी प्रकाशित झालेली कादंबरी 'गोतावळा' कृषी संस्कृतीवरील यंत्रानं फिरवल्या जाणाऱ्या शोषण व दमनाच्या वरवंट्यावरच आघात करते. माणूस असून जनावरागत जगण्याचं शल्य ती स्पष्ट करते. यातला 'नारबा' प्रातिनिधिक आहे. तो शेतकऱ्यांच्या आजच्या आत्महत्येची पूर्वपीठिकाच एका अर्थाने समजावतो आहे, असं आज परत वाचताना लक्षात येतं. 'नटरंग'ला लोकसंस्कृतीच्या वेदना समजावयाच्या आहेत असं वाटतं. यातील नाच्याच्या शोकात्मक जीवनातील कथा वास्तवातील गणपत पाटील यांचीच शोकात्म कथा वाटावी. कालक्रमानं ती १९८०ची. म्हणजे गणपत पाटील यांच्या शोककथेच्या आधीची. पण कलाकारास दूरचं अगोदर दिसतं. आगामी वास्तव, भविष्यवेध ही चाहूल हेरण्याची कला प्रतिभावंतास त्याच्या निरंतर चिंतानातून हस्तगत होत असावी. 'कलेचे कातडे' (२००१) मध्ये हे चिंतन पुढे शब्दरूप घेताना दिसते. या कादंबऱ्यांचा विकास म्हणून चंद्रकुमार नलगे, महादेव मोरे यांच्या लेखनाकडे पाहता येईल. राजन गवस, कृष्णात खोत यांचं लेखन ग्रामीण कादंबरीस अव्वल दर्जा देताना आढळतं.

कादंबरीच्या समांतरपणे डॉ. यादव यांनी आपल्या आत्मकथा प्रकाशित केल्या. हाही त्यांचा आणखी एक कलात्मक प्रयत्न म्हणून नोंदविता येतो.

'झोंबी' (१९८७), 'नांगरणी' (१९९०), 'घरभिंती' (१९९२) 'काचवेल' (१९९७) अशा धारावाहिक आत्मकथा लिहून यादवांनी

आपणास ‘सिरियल ऑटोबायोग्राफर’ सिद्ध करत नागरी साहित्याचे ‘सिरियल किलर’ (विधायकतेने) म्हणून नोंद केली. ती परंपरा चंद्रकुमार नलगे यांनी ‘रातवा’ (भाग १ व २) मधून चालवली. या आत्मकथनातून डॉ. यादव ग्रामीण माणसाचा जीवनसंघर्ष अधोरेखित करतात. ‘स्व’ विकासाच्या पाऊलखुणातून ते ग्रामीण समूह विकास इंगित करतात. अंतस्थ उद्देश स्पष्ट करतात.

‘मातीखालची माती’ (१९६५) मधील माणसं हिंदी वाचकास रामवृक्ष बेनीपुरींच्या ‘माट की मूरते’चं स्मरण देतात. ही व्यक्तिचित्रं गावचं जग नि जगणं आपल्यापुढे उभे करतात. ‘स्पर्शकमळे’ (१९७८), ‘पाणभवरे’ (१९८२), ‘ग्रामसंस्कृती’ (२०००) मधील ललित लेखांतून डॉ. यादव नागरीकरणातून बदलत जाणाऱ्या ग्रामसंस्कृतीस स्वर देतात. जिराईत व बागायतीनं निर्माण केलेल्या शेतकरी वर्गातली भेद, त्यांचं विश्व नि प्रश्न, अल्पभूधारकांचं दुःख ते चित्रित करतात.

नागरी साहित्यास काटकोनी छेद देण्याचा डॉ. यादवांचा प्रयत्न केवळ ललित साहित्याने थांबत नाही. मराठी समीक्षक ग्रामीण साहित्यास त्याचं कलात्मक मूल्य, साहित्यिक योगदान नाकारताना जेव्हा यादव पाहतात, तेव्हा ते आपल्या परीनं ग्रामीण साहित्याचा धांडोळा घेत तो इतिहासबद्ध करतात, त्याची संपादनं करतात नि समीक्षाही! हे असं त्यांना करावं लागलं? आपणच वाजावायचं नि आपणच नाचायचं, असा डॉ. आनंद यादवांचा एकपात्री प्रयोग, नागरी समीक्षकांच्या नकारात्मक भूमिकेपुढे निर्माण केलेला सकारात्मक पर्याय म्हणून पाहावा लागेल. डॉ. यादवांच्या लेखनास अलीकडच्या काळात निवडणुकीच्या निमित्तानं ‘त्यांचं लेखन आत्मपरतेच्या पलीकडे जात नाही’ म्हणणं आपली नामुष्की स्वीकारण्यासारखंच नव्हे का? प्रत्येकाची एक लेखनशैली असते. लेखनध्यास असतो, ध्येय असतं. तसं प्रत्येकाचं लेखन आत्मरतच असतं. प्रश्न आहे तो त्यातून तुम्ही आत्मरंजन करून घेता की व्यापक समाजहिताच्या गोष्टी करता. डॉ. यादव हे समाजहितैषी साहित्यिक होत. त्यांच्या लेखनामागे ग्रामीण व्यथावेदनांना माणुसकीचं साहित्य म्हणून मराठी सारस्वतात मान्यता देण्याचा आग्रह होता. ते करताना डॉ. यादव नागरी साहित्य व साहित्यिकांना दूषण न देता ग्रामीण जनता व त्यांचं जीवन, सौंदर्य नि संघर्ष कलात्मक पद्धतीनं शब्दबद्ध करत गेले, हे उदारपणे समजून घेतलं पाहिजे.

व्यक्ती म्हणून डॉ. यादव यांच्यात ऋजुता असली तरी विचारक म्हणून ते आक्रमक होते. त्यांचा युक्तिवाद त्यांच्या दृष्टिकोनावर आधारित होता. री ओढणे हा त्यांचा स्वभाव नव्हता. 'लघुनिबंधाचे जनक कोण?' सारख्या वादात ते स्पष्ट होतं. त्यांच्या समीक्षा नि चिकित्सेस मराठी, संस्कृत साहित्याचं वाचन व अभ्यासाची संशोधक बैठक आहे. वादाकरिता वाद ही त्यांची वृत्ती नव्हती. समरसता साहित्य मंचावरील त्यांच्या वावरातून ग्रामीण माणूस शहरी होत असल्याचं वास्तव मात्र प्रत्ययास येतं खरं! कागल ते पुणे अशा विकास प्रवासाची ती अटळ परिणती म्हणावी लागेल.

'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या' (१९७९), 'ग्रामीणता, साहित्य आणि वास्तव' (१९८१), 'मराठी साहित्य समाज आणि संस्कृती' (१९८५),'साहित्याची निर्मिती प्रक्रिया' (१९८९) 'ललित गद्याचे तात्त्विक स्वरूप आणि मराठी लघुनिबंधाचा इतिहास' (१९९५), '१९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह' (२००१), 'आत्मचरित्र मीमांसा' (१९९८) सारख्या समीक्षाग्रंथांतून डॉ. यादव हे मराठीचे एक गंभीर व जबाबदार समीक्षक म्हणून पुढे येतात. 'कलेचे कातडे' सारख्या कादंबरीची प्रस्तावना, भाषणे, अन्य ग्रंथ व साहित्य प्रवाहांवरील लेख यातूनही डॉ. यादव यांचं स्वतंत्र वैचारिक व्यक्तिमत्त्व उभं राहतं.

या साहित्यिक रियाजापूर्वी आकाशवाणीत असताना डॉ. यादव यांनी 'चालू जमाना' कार्यक्रमासाठी केलेलं लेखन एकत्र येण्याची गरज आहे. सन १९६४ ते १९७३ असं एक दशकभर ग्रामीण प्रश्नांवर सतत लिहून स्वातंत्र्योत्तर ग्रामीण जीवनाचं, प्रश्नांचं जे चित्रण केलं आहे, ती त्यांची खेळी नागरी माध्यमांच्या पुढे उभा केलेला आणखी एक काटकोनी प्रवास होय. त्यातील नवशिक्षित ग्रामीण तरुणांना त्यांनी दिलेली उमेद हे त्यांचं सामाजिक देणं म्हणून इतिहासात नोंदवावं लागेल. यातील 'संवाद' व 'नाटिका' हा मराठी साहित्याचा ठेवा ठरावा, असा खजिना आहे. तो संकलित करून प्रकाशित झाला पाहिजे.

डॉ. यादव यांनी खेड्यापाड्यांत जाऊन अनेक ग्रामीण साहित्य संमेलनांची अध्यक्षपदं भूषविली आहेत. तेथील भाषणांचा संग्रह एकत्रित आल्यास डॉ. शरणकुमार लिंबाळेंच्या 'शतकातील दलित विचार' सारखा ऐतिहासिक दस्तऐवज तयार होईल. त्यांच्या या उपस्थिती व संवादातून नागरी साहित्य संमेलनांना एक रचनात्मक व समर्थ पर्याय निर्माण

झाला आहे. सीमा भागात होणाऱ्या साहित्य संमेलनांचं अध्यक्षपद भूषविताना मी हे अनुभवलं आहे. त्याशिवाय संशोधनाच्या मार्गानं डॉ. यादव यांच्या साहित्याचं झालेलं मूल्यमापन, त्यांच्यावर प्रकाशित झालेले डॉ. रवींद्र ठाकूर व डॉ. एस.एम.कानजे यांचे समीक्षाग्रंथ, डॉ. यादवांच्या पाठोपाठ झालेलं अन्यांचं विपुल ग्रामीण साहित्य लेखन हा त्यांनी नागरी साहित्यास दिलेला उजवा पर्याय (उजवा कालवा, डावा कालवा साहित्यातही असतोच) होय.

डॉ. यादव यांच्या साहित्यकृती व कर्तृत्वास लाभलेले पुरस्कार, सन्मानपत्रे, अध्यक्षपद यातूनही मराठी सारस्वतातील त्यांच्या योगदान व कर्तृत्वाची पावती म्हणून पाहता येईल. त्यांच्या साहित्याचे हिंदी, इंग्रजी, कन्नड, ऊर्दू, बंगाली, फ्रेंच भाषातील अनुवादही या काटकोनी दाव्यास पुरावा म्हणून देता येतात. मराठी साहित्याचा इतिहास लिहायचा झाला तर डॉ. आनंद यादव यांना वगळता येणार नाही. डॉ. लाभसेटवार साहित्य सन्मानानं त्यांना मराठीचं ज्ञानपीठ लाभलं आहेच. आता प्रतीक्षा भारतीय ज्ञानपीठाची.

❖












**७वी आवृत्ती**



# नटरंग

**आनंद यादव**

**किंमत : २००/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

'नटरंग' ही एका भारतीय कलावंताची शोकांतिका.
तिला अनुभवाचे अनेक पदर आहेत.
जीवनातील भयानक दारिद्र्य आणि कलात्मक ऊर्जा,
कलावंताचे कुटुंब आणि कलावंताचे कला-व्यक्तिमत्त्व,
मातंग समाजाची रूढिग्रस्त जनमान्य जीवनशैली
आणि तिच्या बाहेर जाऊन आत्मप्रेरणेने आणि
कलानिर्मितीच्या आकांक्षेने जगू पाहणारा कलावंत,
कलेचा उपयोग पोट भरण्यासाठी करू पाहणारे सहकारी
आणि कलेच्या विशुद्धतेचा ध्यास घेऊ पाहणारा कलावंत,
अशी संघर्षाची विविध आणि व्यामिश्र रूपे
'नटरंग'मध्ये एकजीव झालेली आहेत.

**– डॉ. चंद्रकान्त बांदिवडेकर**



# अवगुणी समाजातला गुणा

– अतुल कुलकर्णी
अभिनेता

तुम्ही बाई असाल तर असं वागायला हवं... पुरुष असाल तर तसं. आमच्या लिंगभावानुसार आमची विभागणी ठरलेली. पुरुषाचं दुबळेपण दाखवायचं, तर 'काय रे, बांगड्या भरल्यास का?' म्हणायचं. 'बांगडी म्हणजे बाई आणि बाई म्हणजे दुबळी' व्याख्या ठरलेलीच. हे जेंडर पॉलिटिक्स किती खोल मुरलंय समाजात! शिवाय इथली राजकीय चढाओढ तर ते पोसायला आणखी हपापलेली. त्यांनी पुरुषार्थाच्या व्याख्या ठरवायच्या. आम्ही त्या डोळे झाकून स्वीकारायच्या. समाज म्हणून आमचं ना स्वातंत्र्याशी काही घेणंदेणं आहे, ना मॅच्युरिटीशी. या कमकुवत समाजात 'भेदहीनता' आणि 'मोकळिकी'चा पाया रचायला कुणी सरसावलंच, तर त्याला नामोहरम करण्यात मात्र सारे आघाडीवर. अशात कुणी आवाज उठवायला तयार नाही. 'स्व'त्वाचे सूर हरवून तर जाणार नाहीत, याचं काहूर माजू लागलंय. या कोलाहलात आनंद यादव एक आरसा दाखवतात. त्यात समाजाचं ढोंगीपण लख्खं दिसतं. नटरंगचा गुणा त्या जेंडर पॉलिटिक्सला आव्हान करतो. नटरंग सिनेमात हा गुणा साकारताना लिंगभेदाचा विखार जवळून पाहता आला.

नटरंग करायचं ठरलं. रवी जाधवसोबत आनंद यादवांचं पुण्यातलं घर गाठलं. ती दीड-दोन तासांची भेट. पण त्या भेटीत लिंगभेदाच्या वास्तवाचे अनेक कंगोरे यादवांनी स्पष्ट केले. यादव निव्वळ एका समाजघटकाविषयी बोलत नव्हते. त्यांच्या जगण्यात मुरलेला त्याचा अर्क समोर ठेवत होते. त्यांच्या बोलण्यातून स्पष्ट होणारा गुणा निराळं समाजभान मांडत होता. महाराष्ट्रातलं ग्रामजीवन, तमाशा, त्याबद्दलचा सामाजिक दृष्टिकोन यांचा पटच त्यांच्या शब्दांमधून प्रकटत होता. ते निव्वळ एका कादंबरीबद्दल बोलत नव्हते. एका संस्कृतीची, एका जीवनशैलीची ओळख घडवत होते. अगदी त्या जगण्यातल्या दैनंदिन गोष्टींशी परिचय घडवत होते. त्यातूनच स्पष्ट

होत होतं की, यादवांनी साकारलेला ‘नटरंग’ निव्वळ एका गुणाची गोष्ट नाही; ती शोषितांच्या जगण्याचे अनेक पदर उलगडणारी गाथा आहे. या रेखाटनाचा केंद्रबिंदू लिंगभेद आणि त्यातल्या विदारकतेचा आहे. गुणाला जे भोगावं लागलं तो आपल्या संकुचित सामाजिक मानसिकतेचा परिपाक आहे. बदलत्या काळासोबतही हे वास्तव परिवर्तनाच्या वाटेवर सरकत नाही. त्यामुळं यादवांनी मांडलेले गुणाचे भोग हे २०१६ मध्येही इथल्या व्यवस्थेच्या थोबाडीत मारणारे ठरतात.

आनंद यादव यांचं नटरंग असो वा झोंबी- ते समाजाच्या असंवेदनशीलतेवर नेमकं बोट ठेवतात. स्वतःच्या कणखर भूमिकांमधून वाचकांच्या जाणीव-नेणिवेचा तळ हलवून सोडतात. समाजभान गहिरं करतात. पण त्यांच्या प्रामाणिक प्रयत्नांनासुद्धा विरोध होतो, हे आपल्या सामाजिक कमकुवतपणाचं लक्षण आहे. आनंद यादवांनी विचार पेरला आहे. त्याच्या सोबतीनं आपण पुढं जायला हवं. ती सोबत जोपासली नाही, तर प्रवास तिथंच खुंटून जाईल. आनंद यादवांचं लिखाण आरसा आहे, ज्यात समकालीन वास्तवाची खळबळ प्रतिबिंबित होते. ती ओळखून तिला दिशा देण्याचं भान आपल्यात यायला हवं.

**शब्दांकन - योजना यादव**

❖





# 'नटरंग' कादंबरी ते सिनेमा

– कीर्ती मुळीक

माणूस हा समूहाने राहणारा प्राणी आहे. एकमेकांच्या सहवासात राहून, आपल्या भावभावना, विचार, मानसिक आंदोलने यांचे आदानप्रदान करणे त्याला आवडते. या मोठ्या विश्वात जगण्यासाठी ते त्याला आवश्यकही ठरते. हे आदानप्रदान करणे याला 'व्यक्त होणे' असे म्हणता येईल. माणूस वेगवेगळ्या पद्धतींनी व्यक्त होत असतो. हसणे, रडणे, खोकणे, ओरडणे, हातवारे करणे, अंग आकसून घेणे अशा त्याच्या कृती व्यक्त होण्यासाठी असतात. या प्राथमिक अवस्थांतून माणसाचा जसा विकास होत गेला तशी त्याने बुद्धीच्या साहाय्याने भाषा निर्माण केली. भाषा या संकेतप्रणालीतून तो व्यक्त होऊ लागला. भाषेच्या माध्यमातून व्यक्त होणे त्याला सोपे वाटू लागले. आपल्या दैनंदिन गरजा तो भाषेच्या माध्यमातून व्यक्त करू लागला.

व्यक्त होणे ही माणसाची स्वाभाविक वृत्ती आहे. जीवन जगताना माणसाला अनेक अनुभव येत. या अनुभवातून त्याच्या मनात कल्पनांचे विश्व निर्माण होऊ लागले, सौंदर्याची वेगवेगळी अनुभूती त्याला मिळू लागली. त्यातून त्याच्या मनात तत्त्वज्ञानाची एक बैठक तयार होऊ लागली. 'मन' या संकल्पनेचा त्याला शोध लागला. नैतिक मूल्ये त्याला माहीत होऊ लागली. मूल्यांचे अधिष्ठान त्याला जगण्यासाठी महत्त्वाचे वाटू लागले. या सर्व गोष्टी काही वेगळ्या पद्धतीने व्यक्त कराव्यात, असे त्याला वाटू लागले. त्यातून कलेचा जन्म झाला. माणूस या कलेच्या माध्यमातून अभिव्यक्त होऊ लागला.

चित्र, शिल्प, नृत्य, गायन, साहित्य या माणसाला अभिव्यक्त करणाऱ्या कला आहेत. माध्यमांच्या वैविध्यातून कलांचे हे प्रकार निर्माण झाले. साहित्य कला ही शब्दांच्या माध्यमातून व्यक्त केली जाते. शब्दांची लय आणि अनुभवाचा तरलपणा यातून कविता हा साहित्य प्रकार निर्माण झाला. जीवनातील एखादा दुसरा अनुभव कथा प्रकारातून परिणामकारक

रीतीने सांगितला जाऊ लागला आणि संपूर्ण मानवी जीवनातील व्यामिश्रता व्यक्त करण्यासाठी कादंबरी स्वरूप आकाराला आले.

जीवन जगताना येणाऱ्या अनुभवांतून माणसाच्या मनात आशा-आकांक्षा फुलू लागतात, नवी स्वप्नं जन्म घेऊ लागतात. माणूस ध्येयवादी बनू लागतो. महत्त्वाकांक्षा त्याला घेरू लागते. हे सर्व मिळवण्यासाठी तो कष्ट घेऊ लागतो. या त्याच्या कष्टांत त्याला अनेक अडीअडचणींना तोंड द्यावे लागते, नवे व्यूह बांधावे लागतात, वेगळ्या कल्पना लढवाव्या लागतात, इतर माणसांच्या विरोधांशी सामना करावा लागतो, पोटाची भूक भागवण्यासाठी रोजचे जगणेही सुरू ठेवावे लागते. जीवनातील हे सर्व संघर्ष तो कादंबरीरूपातून मांडू पाहतो.

मराठीतील ‘नटरंग’ ही कादंबरी अशाच एका माणसाच्या- गुणाच्या- संघर्षाची, त्याच्या ध्येयवेड्या मनाची, त्याच्या कलेची, त्याच्या संसाराची, आई-बापाची, बायको-मुलांची, त्याच्या कलेला साथ देणाऱ्या त्याच्या मित्रांची आणि विरोध करणाऱ्या स्वार्थी समाजाची कहाणी आपल्याला सांगते. मराठीतील ज्येष्ठ, प्रतिभावंत साहित्यिक आनंद यादव यांनी ही कादंबरी लिहिली आहे.

‘नटरंग’ कादंबरीची प्रेरणा आपल्याला कशी मिळाली हे यादव यांनी स्पष्ट केले आहे. कोल्हापूरजवळील कागल हे यादव यांचं गाव. या गावात गैबीचं अर्थात गहिनीनाथाचं देऊळ आहे. यादव यांच्या बालपणी या गहिनीनाथांचा आठ ते नऊ दिवस उरूस असे. शाहू महाराजांची जहागिरी आणि तालुक्याचं गाव असल्यामुळे हा उरूस उत्साहानं पार पाडला जाई. आजूबाजूच्या गावांतील नाटक मंडळी, तमाशे, जलसे, बहुरूपी, जोगतिणी, गायकिणी येथे येत आणि आपली कला सादर करीत. त्यांच्या उदरनिर्वाहाचं हे एक प्रमुख साधन होतं. हा काळ स्वातंत्र्यप्राप्तीपूर्वीचा. तेव्हा मातंग समाजातील अनेक व्यक्ती तमाशाची कला सादर करून आपले पोट भरीत.

यादव यांच्या घराला लागून एक बोळ होता आणि या बोळाच्या दुसऱ्या बाजूला मांगवाडा होता. या मांगवाड्यातील पहिलं घर बापू मांग यांचं होतं. यांची तरुण मुलं हुन्नरी होती. उरूसाच्या काळात आपल्या मित्रांना जमवून तमाशा, गाणी सादर करून ती पैसा मिळवत. यांच्या घरी होणाऱ्या तालमी पाहण्यासाठी यादव जात. या तालमी पाहताना त्यांना एक वेगळी गंमत अनुभवायला यायची. ही तरुण मुलं दिवसभर काबाडकष्ट करीत नि रात्री

तालमीसाठी एकत्र जमत. भयाण दारिद्र्यात जगणाऱ्या या तरुणांच्या अंगावर केवळ एक लंगोट- लज्जा रक्षणासाठी असे. एकमेकांशी चर्चा करून 'तू असं म्हण, मग मी असं म्हणतो' असं करत त्यांचं स्क्रिप्ट तयार होई. त्यानंतर त्यांची तालीम सुरू होई. या तालमीत हे लंगोटधारी तरुण राजा, प्रधान, राणी, सरदार अशा भूमिका साकारू लागत. कमरेला धरलेली काठी तलवार समजून त्यांचे संवाद सुरू होत. भान हरपून ते आपले संवाद म्हणू लागत. त्यांच्या अंगात उत्साह संचारलेला असे आणि आपली राजा, राणीची भूमिका ते जगू लागलेले असत. अंगावर लंगोट असणारे हे राजा, राणी, सरदार बघताना यादवांना हसू यायचं. त्यातील विसंगती त्यांच्या लक्षात यायची.

अनेक वर्षं हे दृश्य पाहताना काही गोष्टी यादव यांच्या लक्षात येऊ लागल्या. तालमी करताना या तरुणांच्या मनात राजाची श्रीमंती येते. लंगोट असला तरी त्या क्षणांना ते आपापली भूमिका जगू लागलेले असतात. यादवांच्या मनात हे प्रसंग घर करून राहिले.

पुढील काळात यादवांना या विसंगतीचा एक वेगळा अर्थ जाणवू लागला. प्रत्येक माणसाच्या मनात एक नट असतो. या नटानं एक आदर्श जगणं मनात निर्माण केलेलं असतं. छान राहावं, आकर्षक दिसावं, सुंदर कपडे घालावेत, वेगळा भांग पाडावा, वेगळं जगणं जगावं, असं या नटाला वाटत असतं. त्याच्या मनात नाना रंग उभे राहत असतात. अनेक कल्पना, इच्छा आकांक्षा, वासना असे या रंगांचे प्रकार असतात. माणसाच्या मनात या रंगांचं एक मूर्त रूप असतं आणि संधी मिळेल तेव्हा ते प्रकट होऊ पाहतं. या सर्वातून यादव यांच्या मनात गुणा- 'नटरंग' कादंबरीचा नायक उभा राहिला.

यादव उत्सुकतेपोटी तमाशातील व्यक्तींना भेटले. तमाशात भरजरी पटका, काठेवाडी धोतर परिधान केलेली, छाती पुढे काढून दिमाखात ढोलकी वाजवणारी, राजा, प्रधान होऊन ऐटीत चालणारी, बहारदार गणगौळण, नृत्य सादर करणारी ही माणसं कनातीत गेली की सामान्य व्यक्ती होऊन जातात. त्यांचं जगणं केविलवाणं आहे, हे यादवांच्या लक्षात आलं. या व्यक्तींशी बोलताना त्यांना जाणवलं की तमाशा सादर करून चार पैसे मिळवणं आणि पोटाची भूक भागवणं एवढंच त्यांचं उद्दिष्ट आहे. आपल्या मुली तमाशात नाचवण्यात त्यांना आनंद नाही. नाइलाजानं त्यांना हे

**९वी आवृत्ती**




# नांगरणी

**आनंद यादव**

**किंमत : २८०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

कणखर सकसता आणण्यासाठी भूमीनं स्वत:वर धारदार अवजारांनी आडवे उभे घाव घालून घेणे आणि सूर्यभट्टीत अंतर्बाह्य होरपळणे म्हणजे नांगरणी.

उत्तम पिकांच्या समृद्धीसाठी शेत-मळ्यांवर हिरवीगार साय साकळावी; अंगाखांद्यांवरच्या गाईगुरांना, माणसाकाणसांना, किड्यामुंग्यांना, चिमण्या-पाखरांच्या इवल्या चोचींना मूठमूठ-चिमूटचिमूट चाराचणा मिळावा; म्हणून भूमीनं स्वत:ची सोशिकपणे केलेली उरस्फोड म्हणजे नांगरणी.

इच्छा-आकांक्षांची पूर्तता करणारा पाऊस कृपावंत होऊन पडावा म्हणून तहानलेल्या पृथ्वीनं वासलेली चोच म्हणजे नांगरणी.

नांगरणी म्हणजे हिरव्या चैतन्याला जन्म देऊ पाहणाऱ्या सर्जनोत्सुक भूमीची घुसमटणारी निर्मितिपूर्व करुणावस्था.

करावे लागतं आहे. तमाशा आणि प्रत्यक्ष जीवन यांतील फरकाची त्यांना निश्चित जाणीव होती. यातून 'नटरंग'चं कथानक यादवांच्या मनात आकार घेऊ लागलं.

''नटरंग' कादंबरीचं कथानक पूर्ण काल्पनिक आहे. ते माझ्या मनातलं आहे. कोणतीही कलाकृती हे त्या कलावंताच्या मनात जीवन जगताना उमटलेल्या अनेक ठशांचं रूप असतं. माझ्या मनात गैबीच्या उरुसाचा उमटलेला ठसा, 'नटरंग'मधून आकाराला आला,'' असं यादव सांगतात.

'नटरंग' कादंबरीचा नायक गुणा हा मातंग समाजातील तरुण. कलावंत मनाचा. तमाशाचा त्याला नाद आहे. शिर्पतच्या शेतात तो गडी म्हणून राबतो आहे. पण येणारा पगार त्याला तमाशाला नि घरखर्चाला पुरत नाही. गुणाच्या घरात त्याचे आई, वडील, पत्नी दारकी आणि मुलं राजा, दया आहेत. गुणाचा मोठा भाऊ मिलिटरीत बेपत्ता झाला आहे. घरातला कर्ता पुरुष गुणा. त्यामुळे त्यानं राबावं, मुलाबाळांचं बघावं, आपलं म्हातारपण निभवावं आणि घरादाराची इज्जत सांभाळावी, असं गुणाच्या वडिलांना- बाळू मांगाला वाटत असतं. ही हातातोंडाची मिळवणी करता करता मांगवाड्यातील अनेक तरुणांचा जीव घायकुतीला येऊ लागतो. निदान तमाशातून तरी पैसे मिळतील; राजा-परधानाची कामं करायला मिळतील, ढोलकी, पेटी वाजवायला मिळेल, गायला मिळेल, जन्माचं पांग फिटेल, या हेतूनं हे तरुण गुणाच्या तमाशाचा फड काढण्याच्या बेताला होकार देतात. सामानाची जमवाजमव सुरू होते. गुणा वग लिहिण्यात रमून जातो. कामंधामं उरकून रात्रीच्या नानाच्या गोठ्यात तालमी सुरू होतात. गुणाच्या कलावंत मनाला उभारी येते; पण त्याचा बाप बाळू, पोरगा घरादाराची अब्रू घालवायला बसलाय, तमाशाच्या नादाला लागलाय, या विचारांनी तगमगू लागतो. गुणाशी तो भांडण काढतो, पत्नी बायनाला 'हे माझ्या पोटचं न्हाई' म्हणून शिव्या घालतो. गुणा त्याला दाद देत नाही. पांडबाबरोबर त्याचे तमाशाचे फड उभा करण्याचे प्रयत्न चालू राहतात. तमाशात नाचायला नयना, शोभना या तरुण मुली मिळतात. या मुली गुणाच्या तमाशाच्या फडात नाचायला तयार होतात; पण राणीसारखी देखणी नयना 'तम्माशात सोंगाड्याबरोबर एक नाच्याबी पाहिजे' अशी अट घालते. कशाबशा मिळवलेल्या या पोरी हातच्या जाऊ नयेत, तमाशाचा फड मोडला जाऊ नये, आपलं तमाशाचं स्वप्न विरलं जाऊ नये, म्हणून गुणा नाच्या व्हायला तयार होतो. पांडबानंच

त्याला हे सुचवलेलं असतं. गुणाच्या मनाची घालमेल होते. नयना त्याला बाईसारखं नाचायला, मुरकायला शिकवते. गुणाचा तमाशा सुरू होतो. त्याच्या नाच्याच्या भूमिकेला भरपूर टाळ्या मिळतात. 'आयला! हे गुण्या फलकं हुतं की रं' गुणाबद्दल गावात चर्चा सुरू होते. गुणाचा बाप आणि सासरा गुणाची समजूत काढू पाहतात; पण गुणा ऐकत नाही. आपल्या वतनदार घराची अब्रू गुणानं नाच्या होऊन घालवली, या दुःखानं गुणाचा बाप बाळू झाडाला फास घेऊन मरण स्वीकारतो... दोन वर्ष होऊन जातात. गुणाचा फड गाजू लागतो. गावोगावी जाऊन ते तमाशा करू लागतात. गुणाचा तमाशा परिषदेकडून सत्कार केला जातो. त्याला नटराजाची मूर्ती दिली जाते. चार वर्षं होऊन जातात. गुणाचं कलावंत मन फुलू लागतं. आपण नाच्या म्हणूनच कायम राहायचं, ती एक कला हाये असा गुणा निश्चय करतो. गुणा अधूनमधून घरी जात राहतो. दारकी, मुलाबाळांची काळजी घेत राहतो. तमाशातून मिळणाऱ्या पैशांमधून घरादाराला चांगले दिवस येतात. पण पत्नी दारकी नाराज असते. तमाशाचा धंदा पैसा मिळाला तरी इभ्रतीचा नाही. आपला नवरा आपल्याजवळ असावा, असं तिला वाटत असतं. पण गुणा तिला धुडकावून लावतो. नयनाविषयी त्याच्या मनात प्रेम निर्माण होतं. पण व्यवहारी नयना ''सारा जलम नाच्यासंग कसा काढायचा. नाच्याचं म्हातारपण लई भयानक! त्याचं हाल कुतरं खायाचं न्हाई,'' असं त्याला स्पष्ट सांगून नकार देते. गुणा ढासळतो. दिवस चाललेले असतात. गुणाचा मुलगा राजा कळता होऊ लागलेला असतो. 'ह्येचा बाप फलका', या पोरांच्या चिडवण्यानं तो संतापू लागतो, पोरांशी हाणामाऱ्या करू लागतो. दारकीलाही गावातल्या बाया, पुरुष, 'रांड गाववेसवा' म्हणू लागलेले असतात. 'माझ्या जिवाला इंगळ्या डसतात. माझ्या जिवाचा पापूड हुतूय हितं रक्शावरचा', अस म्हणत ती गुणाला तमाशाचा धंदा बंद करायला सांगते. पण गुणा तिला भीक घालत नाही. अर्जुन बृहन्नडेचा नवा वग लिहिण्यात तो रमून गेलेला असतो. अर्जुनासारख्या विराट पुरुषालाही परिस्थितीपुढे बृहन्नडेसारखं स्त्री रूप स्वीकारावं लागलं, हे गुणानं या वगात मांडलेलं. या वगात त्यानं नाच्याबरोबर पुरुषधारी अर्जुनाचीही भूमिका स्वीकारलेली; पण पब्लिकला ते मान्य होत नाही. त्यांना गुणा केवळ नाच्या, फलक्या म्हणूनच हवा असतो. मोरे आणि माने साहेबांच्या भांडणातून तमाशाचा फड उधळला जातो. नयना, शोभना आणि गुणावर बलात्कार केला जातो. फड, कनात जाळली

जाते. उद्‌ध्वस्त झालेला गुणा आश्रयासाठी मांगवाड्यात घरी येतो. पण घर बंद करून दारकी मुलाबाळांसह आपल्या बापाकडे म्हायेरी निघून गेलेली असते. गुणा तिला आणायला आपल्या सासुरवाडीला येतो. पण दारकी यायला नकार देते. सासराही 'पोरीला नाच्या घरी नांदायला लावणारा न्हाई', म्हणत भांडण काढतो. गुणाचा मुलगा राजाही संतापानं बापाच्या अंगावर थुंकतो आणि त्याला घाणेरड्या शिव्या देऊ लागतो. 'मी मिलटरीत जाणार. गावानं गांड मारलेल्या बाऽजवळ मी ऱ्हाणार न्हाई', असं म्हणू लागतो. गुणाला भडभडून येतं. तो एकटाच आपल्या घराकडं वळतो. त्याचं घर उद्‌ध्वस्त झालेलं असतं, तमाशा मोडलेला असतो. नयना, शोभनासकट सर्वांनी 'आता पुन्ना ह्या भानगडीत पडायचं न्हाई. ह्या टायमाला जीव तरी वाचला. उद्या कनातीसकट आपल्याला जाळतील', असा निर्णय घेतलेला असतो. दार बंद करून गुणा एकटाच घरात पडलेला असतो. बराच वेळ चाहुल येईना म्हणून शेजारची हौसा गडबडीनं पांडबाला निरोप पाठवते. पांडबा चौघांसह गुणाच्या घरी येतो. गुणा दार उघडतो. पांडबा त्याचं सांत्वन करू लागतो. 'तुझी सगळी दशा मीच वाद्यानं केली', म्हणत त्याची माफी मागू लागतो. पण गुणानं आता निर्णय घेतलाय, 'मी भयाण एकटा, ना साथ, ना संगत. बाकीचं समदं खोटं... दारकी, नैना, तुम्ही... माझा राजाबी खोटा...आता माझी कला माझा जीवन नि मी तिचा शिव... आता चोवीस तास ती माझ्यात नि मी तिच्यात'.

आनंद यादव यांनी 'नटरंग' कादंबरीत कलावंताच्या जीवनाची शोकांतिका स्पष्ट केली आहे. यादवांची लेखक म्हणून असलेली ताकद या कादंबरीतून स्पष्ट होत जाते. यादवांच्या लेखणीतून वाचकांच्या नजरेसमोर प्रसंग चित्रवत उभे होत जातात. पानोपानी असणाऱ्या गुणाच्या मनोगतातून त्याचं कलावंत मन वाचकाला समजू लागतं आणि कथानकही पुढे सरकू लागतं. स्टेजवर रंगून सजून नाचणाऱ्या तमासगिरांचं कनातीतलं विश्व यादव त्यांच्या अनेक बारकाव्यांनिशी वाचकांसमोर उभं करतात. कलावंताच्या विशुद्ध कलेला समजून न घेता त्याला नावं ठेवणारा समाज यादवांनी प्रभावीपणे उभा केला आहे. यादव यांची प्रसंगातील कारुण्य आणि विनोद हेरण्याची क्षमता विलक्षण आहे. ते प्रसंगांना रसपूर्ण बनवतात. त्यांना मनोवैज्ञानिक स्पर्श देतात. त्यामुळे कादंबरीतील वातावरण चैतन्यपूर्ण झालं आहे. कोल्हापूर-कागलकडची अस्सल बोली भाषा ही या कादंबरीची

आणखी एक ताकद आहे. बोलीभाषेचा ढंग, शिवराळपण, गोडवा आणि माणूस नेमकेपणानं व्यक्त करण्याची क्षमता यादवांनी जाणली आहे. त्यामुळे संवादाबरोबरच, निवेदनासाठीही त्यांनी तिचा वापर केला आहे. कलावंत गुणाची घरात आणि शेतात होणारी कुचंबणा यादव गुणाच्या मनोगतातून व्यक्त करतात. 'तम्माशाची धुंदी तुम्हांस्नी न्हाई कळायची मालक. तिच्या तंद्रीतच असतूय म्हणून तर हे ढोरकाम करायचा कट्टाळा येत न्हाई. दिवसभराच्या ह्या मरणातनं सुटका म्हंजे ह्यो तम्माशा. रातभर रमतूय, जिता हुतूय म्हणून तर सकाळनं घोड्यागत तेज होऊन हे काम कराय येतूय. न जागरणाचा तरास, ना शिणवटा'...

'नटरंग' कादंबरीला प्रचंड लोकप्रियता लाभली. तिच्यातलं नाट्य, संघर्ष सर्वांना भावला. अनेक नाट्यपूर्ण प्रसंगांनी भरलेलं तिचं वेगवान कथानक चित्रपट निर्मात्यांना मोहित करू लागलं. त्यांच्या व्यवहारी नजरेनं तिच्यातला तमाशाही हेरलेला. यादव यांनी हे जाणलं होतं. 'चित्रपटात कादंबरीचं कथानक जसंच्या तसं आलं पाहिजे. गुणाच्या नाच्यापेक्षाही त्याचं कलावंत मन तिथं दिसलं पाहिजे. तमासगिरापेक्षाही त्याचं कलावंती जगणं चित्रपटातून व्यक्त झालं पाहिजे. प्रथम मी चित्रपट पाहणार. मला पसंत पडला की मग तो प्रदर्शित करायचा.' अशा अटी यादवांनी निर्मात्यांना घातल्या. अनेक निर्मात्यांनी माघार घेतली. रवी जाधव पुढे आले.

'नटरंग' हा रवी जाधव यांचा पहिला चित्रपट. मुंबईतील जे.जे. स्कूल ऑफ आर्टचे ते विद्यार्थी. त्यामुळे यादव यांची चित्रदर्शी लेखनशैली त्यांना आवडलेली. मॉस्को येथे नोकरी करत असताना त्यांनी 'नटरंग' कादंबरी वाचली आणि त्यातील गुणाचा अनुभव हा त्यांना आपला अनुभव वाटला. नोकरीमध्ये आपल्या कलेला, कलावंत मनाला वाव नाही, हे त्यांच्या लक्षात आलेलं. त्यांच्या कलावंत मनाची नोकरीत घुसमट होऊ लागलेली. त्यामुळे नोकरी सोडून चित्रमाध्यमाला जवळच्या असणाऱ्या चित्रपट क्षेत्रात जाण्याचे त्यांचे विचार सुरू होते. 'नटरंग' कादंबरीमुळे या विचारांना गती मिळाली आणि ते नोकरी सोडून मायदेशी परतले.

आनंद यादव यांच्याशी चर्चा करताना त्यांच्या लक्षात आलं की यादव यांनी हे ग्रामीण जीवन अनुभवलं आहे, तमासगिरांचं जीवन जवळून पाहिलं आहे. 'नटरंग'च्या जन्माची कहाणी त्यांना ऐकायला मिळाली. 'कलावंत आपलं विश्व कलाकृतीतून मांडत असतो, त्याला एक न्याय देत असतो,' हे

त्यांच्या लक्षात आलं. त्यामुळे चित्रपट करताना आपण या लेखकाला, त्याच्या कादंबरीला पूर्ण शरण गेलं पाहिजे, त्याच्या मनाप्रमाणेच कादंबरीचं रूप चित्रपटातून रेखाटलं पाहिजे, असा त्यांनी निर्णय घेतला आणि यादव यांच्या अटींना मान्यता दिली.

''आनंद यादव हे लेखक म्हणून आपल्याला पूर्ण समजले पाहिजेत. त्यांना प्रत्येक शब्दातून काय सांगायचं आहे, सुचवायचं आहे, हे आपल्याला माहीत झालं पाहिजे. या दृष्टीनं मी यादव यांचं इतरही साहित्य वाचलं. 'गोतावळा' कादंबरी आणि 'झोंबी', 'नांगरणी', 'घरभिंती' हे त्यांच्या आत्मचरित्राचे प्रसिद्ध झालेले तिन्ही खंड वाचले,'' असं रवी जाधव सांगतात. ''नटरंग' कादंबरी अनेक वेळा वाचली. त्यातील घटना प्रसंगांचा, प्रत्येक शब्दाचा अर्थ माहीत करून घेतला. जे समजलं नाही त्यासाठी यादवांना भेटत राहिलो, त्यांच्याकडून खुलासे करून घेत राहिलो. यादव यांच्या कागल गावी गेलो. तिथं भरपूर हिंडलो. तेथील माणसं पाहिली. जागा पाहिल्या. तमाशा कुठं चालायचा ते ठिकाण पाहिलं. गैबीचं देऊळ पाहिलं. शेती, मोट, शेतीची अवजारं, शेतमजूर, त्यांची वस्त्रं, दोन पायांवर बसण्याची त्यांची ढब पाहिली. त्यांची तंबाखू मळण्याची, पान खाण्याची, पिचकाऱ्या टाकण्याची पद्धत पाहिली.'' रवी जाधव सांगत होते.

जाधव हे चिपळूणचे असले तरी ते मुंबईत वाढलेले. त्यामुळे त्यांनी कधी तमाशा पाहिला नव्हता. चित्रपटनिर्मितीचा विचार निश्चित झाल्यावर ते तीन वर्षं महाराष्ट्रात सर्वत्र हिंडले. सर्व ठिकाणचे तमाशे पाहिले. तेथील लोककलावंतांना ते भेटले. त्यांच्याशी बोलताना त्यांच्या लक्षात आलं, की ही माणसं दुःखं झेलणारी आहेत. आपली सुखंदुःखं, आपल्या जीवनाची दैन्यावस्थादेखील ते सहजपणे हसत खेळत, विनोदी ढंगानं सांगतात. एक अलिप्तपणाचा सूर त्यांच्यात जाणवतो. ते खरे कलावंत आहेत. संगमनेर येथील तमाशा फडाची पूर्ण वाताहत झाली होती. पण फडातील माणसं सहजपणाने 'त्याचं असं झालं बघा', अशी सुरुवात करत त्याविषयी सांगू लागायची. त्यामुळे 'या कलावंताला आपण न्याय दिला पाहिजे, त्याच्या कलेचा आपण सन्मान केला पाहिजे', असं जाधव यांना वाटू लागलं. मराठी चित्रपटात मुख्यतः नाच्याची भूमिका ज्यांनी केली, त्या गणपत पाटील यांना 'झी' जीवनगौरव पुरस्कार मिळालेला त्यांनी पाहिला होता. चित्रपट पाहणाऱ्या तरुण पिढीला आपण आशेचा किरण दाखवायचा, त्यांच्यातील

कलेला प्रोत्साहन द्यायचं, त्या दृष्टीने चित्रपटाचा शेवट सकारात्मक दाखवायचा, असा विचार त्यांच्या मनात आला. ते यादव यांना भेटले. यादव यांनीही या विचाराला होकार दिला. चित्रपटाची सुरुवात आणि शेवट बदलण्यात आला. चित्रपटाची सुरुवात वृद्ध गुणा कागलकर मानाचा 'झी' जीवन गौरव पुरस्कार स्वीकारण्यासाठी व्यासपीठावर चढत आहेत, अशी केली. शेवट तमाशाचा फड पुन्हा उभा करण्यासाठी निघालेल्या गुणाला नयना साथ देण्यासाठी येते, असा दाखवण्यात आला.

"'नटरंग' कादंबरी आधीच लोकप्रिय झाली होती. अनेकांनी ती वाचलेली आणि ती आवडल्याचा त्यांनी अभिप्रायही दिलेला. या रीतीनं गुणा लोकांपर्यंत आधीच पोहचला होता. त्यामुळे चित्रपट कादंबरीच्या तोडीचा झाला पाहिजे. कादंबरीच्या दर्जाइतकाच त्याचाही दर्जा असला पाहिजे, ही जाणीव होती. त्यामुळे तीन वर्षं अभ्यास केला नि मगच चित्रपटाच्या बांधणीला सुरुवात केली. पटकथा लिहायला घेतली," रवी जाधव सांगत होते.

'नटरंग' चित्रपटातील गाणी अतिशय गाजली. कथानकाला गती देण्यासाठी या गाण्यांचा उपयोग केला आहे. गुणाचं आगळं वेगळं व्यक्तिमत्त्व, कलावंतपण चित्रपटाच्या सुरुवातीला गाण्यातून सांगितलं आहे.

**कागल गावचा गुणा, ऐका त्याची कहाणी**
**रांगडा त्याचा बाज, आगळं हुतं पानी**
**कौतिक सांगू किती, पठ्ठ्या बहुगुणी,**
**अंगी हुन्नर, डोसक्यामधी झिंग**

..............................
**पैलवानी तोरा त्याचा, रुबाब राजावाणी**

या गाण्यानं गुणाची कथा सुरू होते.

गुणा आणि त्याचे मित्र तमाशाचा सराव सुरू ठेवतात. दिवसभर मजुरी करून घरदार भागवतात आणि रात्री सरावासाठी एकत्र जमतात. सराव चांगल्या रीतीनं सुरू असतो. पण पाऊस सुरू होतो आणि मजुरी संपते. घरादाराचं भागवण्यासाठी मित्र चारी दिशा फिरू लागतात आणि सरावात खंड पडतो. ही घटना गाण्यातून स्पष्ट केली आहे.

**चक् पडली ठिणगी, पेटलं सारं रान**
**काळमेळ इसरलं गडी, राहिलं नाही भान**

**पर मधीच शिकली माशी, झाला की हो घात**
**मृगाचा हंगाम दाटला, फाटलं आभाळ**
**इझून गेली ठिणगी, रामा, इझून गेला काळ**

संसार आणि कला यामध्ये गुणाची होणारी फरफट ‘वणवा ह्यो उरी पेटला, खेळ मांडला’, या गाण्यातून व्यक्त केली आहे. गुरू ठाकूर यांचं गीतलेखन आणि अजय-अतुल यांचं संगीत यामुळे ही गाणी काळजाला भिडणारी झाली आहेत.

या गाण्यांना पारंपरिक संगीताचा बाज आहेच, पण त्यांना आजच्या वाद्यांचीही जोड दिली आहे. ‘हे करताना मुख्यतः तरुण पिढी नजरेसमोर होती,’ असं रवी जाधव सांगतात. पस्तिशीच्या पुढचा प्रेक्षक चित्रपटाच्या कथानकात रमतो; पण तरुण पिढी मात्र गाण्यांवर फिदा होते. त्यांची ही मानसिकता लक्षात घेऊन अजय-अतुल या तरुण संगीतकारांना संधी दिली. या गाण्यांना अफाट लोकप्रियता मिळाली. आजही या गाण्यांवर देश-परदेशातली पावलं थिरकतात. अमेरिकेतील सेंट्रल स्क्वेअर, जर्मनीतील बर्लिन, मेक्सिको येथे आजही या गाण्यांवर नाच केला जातो.

‘नटरंग’ चित्रपटाची लोकप्रियता अद्वितीय ठरली. कादंबरी आणि तिच्यावर बेतलेला चित्रपट या दोघांनाही वाचकांची अफाट पसंती सहसा मिळत नाही, पण ‘नटरंग’बाबत ते घडलं.

**(साभार)**
**अक्षरपेरणी**







**७वी आवृत्ती**





# घरभिंती

**आनंद यादव**

**किंमत : ४००/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

मराठी साहित्याचा मोलाचा ठेवा ठरावा, अशी ही साहित्यकृती!
आजच्या जनसामान्यांच्या दैनंदिन जीवनातही महाभारतसदृश संघर्षपूर्ण घटना केवळ अस्तित्वासाठी घडत असतात, याचे वास्तवपूर्ण, भेदक दर्शन म्हणजे घरभिंती.
ग्रामीण समाजाच्या सर्वसाधारण स्तरातील कुटुंबाची ही प्रातिनिधिक तरीही वैशिष्ट्यपूर्ण कहाणी. जन्मप्राप्त, अटळ, जीवघेण्या आर्थिक हलाखीचा चक्रव्यूह भेदून बाहेर पडण्यासाठी केवळ काही शैक्षणिक सुविधांच्या तुटपुंज्या आधारावर एका तरुण, संवेदनशील मनाने दिलेला निकराचा पण यशस्वी लढा, हा या घरभिंतीचा गाभा!
'झोंबी' ते 'घरभिंती' या प्रवासपटातून प्रभावीपणे ग्रामीण जीवनाचे उभे-आडवे ताणेबाणे प्रथमच त्यांतील खऱ्या छेदाभेदासकट विस्तृत प्रमाणात साहित्यरूपाने साकार होतात.
त्यामुळे अंतर्बाह्य विस्तृतपणे वेध घेणारी ही आत्मचरित्रकथा ग्रामीण साहित्याच्या उद्याच्या प्रवासाची अचूक दिशा प्रभावीपणे दाखविते.

**– गो. म. कुलकर्णी**



# वाचकमनाची मशागत करणारा साहित्ययात्री

**– अरुण नाईक**

मराठी ग्रामीण साहित्याची चळवळ सर्वदूर पोहोचवून ती मराठी मनात रुजवण्यासाठी प्रयत्न करणारा एक सच्चा लेखक म्हणून आनंद यादव यांचं मराठी साहित्यातील योगदान मोलाचं आहे. त्यांनी मराठी वाचकमन समृद्ध केलंच; शिवाय वाचकमनाची नांगरणीच केली आहे, असं म्हणावं लागेल. साहित्य क्षेत्रातील त्यांच्या कर्तृत्वाची साक्ष त्यांची सुमारे चाळीसभर पुस्तकं देतात.

कोल्हापूर-निपाणी महामार्गावरून जाताना कागल हे यादवांचं जन्मगाव. इथल्या अस्सल मातीचं आणि कोल्हापुरातील शैक्षणिक धडपडीतून यादवांचं व्यक्तित्व ग्रामसंस्कृतीची यशोपताका मिरवत, घडत गेलं. कोल्हापूरच्या वालावलकर ट्रस्टच्या मदतीतून यादवांनी प्रारंभिक शिक्षण पूर्ण केलं. त्यासाठी त्यांनी केलेली धडपडही अभूतपूर्व अशीच आहे. कोल्हापुरात सिनेमा बघून त्यातील संवाद जिल्ह्यातील शाळा-शाळांमधून विद्यार्थ्यांना जसेच्या तसे ऐकवत त्यांनी आपल्या शिक्षणासाठी मदत गोळा केली. त्यांच्या जिद्द आणि स्मरणशक्तीचाच हा अविष्कार होता. असे प्रयोग करीत ते अगदी उत्तूरमधील आमच्या शाळेतूनही येऊन गेल्याचं स्मरणात आहे.

'झोंबी' हे त्यांचं आत्मचरित्र ज्या वेळी वाचलं, तेव्हा त्यांच्या दारिद्र्याचा संघर्ष वाचून थक्क झालो. त्यांच्या जन्मापासून ते मॅट्रिकपर्यंत कागलसारख्या गावातून शिक्षणासाठी झालेली आबाळ त्यांनी या पुस्तकात रेखाटली आहे. ते वाचून मन सुन्न होतं. पुढे नांगरणी, घरभिंती, काचवेल या चारही आत्मचरित्रपर पुस्तकांतून यादवांचा संघर्षपट खुला होतो. त्यांचे विविध जीवनानुभव वाचकमनाची मशागत करणारेच आहेत. या लेखनानं तळागाळातील ग्रामीण युवकांना स्फुल्लिंग मिळालं आणि तेच आदर्श डोळ्यांसमोर ठेवून पुढं पाऊल टाकणारी एक पिढीच निर्माण झाली आहे.

कनवाळू आई, परिस्थितीला कावलेला बाप रत्नाप्पा अशा व्यक्तिरेखा

आणि ग्रामीण भागातील वास्तवाचा तळच यादवांच्या लेखणीनं चर्चेत आणला. त्यामुळे शहरी संस्कृतीला या विदारक वास्तवतेचं झणझणीत अंजन घातलं गेलं.

आत्मकथा आणि कवितासंग्रह, कथा, ललित गद्य, गोतावळा, नटरंग आणि अलीकडची 'कलेचे कातडे' यांसारखी वेगळ्या वळणाची कादंबरी. वगनाट्य आणि समीक्षा, वैचारिक ग्रंथ असं विपुल साहित्य आनंद यादवांच्या लेखणीतून बहरलं; पण ग्रामीण जीवनाच्या अनुभवाचं बोट त्यांनी कधी सुटू दिलं नाही. साहित्याकडे व्रत, साधना म्हणून त्यांनी ध्येयवादी दृष्टीनंच पाहिलं. १९७१ मध्ये प्रकाशित झालेली त्यांची 'गोतावळा' ही कादंबरी मनात अजूनही घर करून आहे. या कादंबरीतून व्यक्त झालेला आशय यादवांच्या व्यक्तिमत्त्वाचाच एक भाग आहे, असं त्याचं आत्मपर लेखन वाचल्यावर नक्कीच वाटतं. बाळ ठाकूर यांच्या लक्षवेधी मुखपृष्ठातूनही याच भावना प्रभावीपणे व्यक्त झाल्या आहेत. 'गोतावळा'तला नारबा मनात अजूनही रुंजी घालून राहिला आहे.

डॉ. यादव अनेक पुरस्कारांनी सन्मानित आहेत. साहित्य अकादमी, लाभसेटवार, महाराष्ट्र शासन, मृत्युंजय प्रतिष्ठानचा शिवाजी सावंत पुरस्कार, महाराष्ट्र साहित्य परिषद असे अनेक सन्मान त्यांना प्राप्त झाले आहेत. त्यांच्या साहित्याची समीक्षा करणारे अनेक ग्रंथही इतरांनी लिहिले आहेत. हिंदी, कन्नड, बंगाली, उर्दू, इंग्रजी आणि फ्रेंच अशा जागतिक भाषांतून त्यांच्या पुस्तकांचे अनुवादही जगभराच्या वाचकांपर्यंत पोहोचले आहेत.

अस्सल कसदार मातीतून व्यक्त होणाऱ्या भावना मराठी साहित्यातून दरवळत ठेवणाऱ्या आणि वाचकांनाही आपल्या वाटणाऱ्या या ग्रामीण साहित्याच्या प्रवर्तकास विनम्र अभिवादन.

❖

६वी आवृत्ती




# काचवेल

**आनंद यादव**

**किंमत : २५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

‘झोंबी’, ‘नांगरणी’ आणि ‘घरभिंती’ या आत्मचरित्राच्या तीन खंडांनंतरचा हा चौथा खंड काचवेल.

नव्या घरातील सोप्याच्या भुईवर ग्रामीण भागात काचवेल काढण्याची लोकप्रथा आहे. काकणांच्या काचतुकड्यांनी ही वेल रेखली जाते. ही वेल वंशवेलीचंही प्रतीक असते.

त्या घराची गृहिणी नकळत स्वतःला वंशवेल मानते. तिची मुलं ही त्या वेलीवरच्या कळ्या, फुलं असतात. जेवढी मुलं, तेवढे तागोरे ती काढते...

आईची ही दैवी लोककला मी पहिल्यांदा बघत होतो.

यथाकाळ माझी सगळी भावंडं त्या वेलीवर रांगली. मी सोप्यात बसून अभ्यास केला; त्या अभ्यासालाही काचवेलीचा कशिदा मिळाला. पंधरा-सोळा वर्षे ही वेल तिथं पायघडीसारखी पहुडली.

तेव्हापासून मी साठ वर्षांच्या आयुष्यात खूप काचा तुकड्या-तुकड्यांनी गोळा केल्या. मला आकर्षक वाटणारे रंगीत तुकडे जपून ठेवले. जागोजागी भेटलेल्या कसबी कासारांनी मला ते प्रेमाने देऊ केले. त्या तुकड्यांनीच माझ्या व्यक्तिमत्त्वाची वेल सिद्ध झाली.

अंतिमत: ही काचवेल आणि तिची भूमी ही मराठी समाजाचं आणि संस्कृतीचं प्रतीकही आहे, असं जाणवलं. मी फक्त भारवाही.



# ग्रामीण साहित्य चळवळीचे प्रवक्ते

**– जयराम देसाई**

साहित्य क्षेत्रात आपले नाव कोरून ठेवून ग्रामीण साहित्य चळवळीला बळ देणारे ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव हे माझ्या कोल्हापूर जिल्ह्यातील मूळचे रहिवासी. नोकरीच्या निमित्ताने पुण्यात आले आणि त्यांनी पुण्याच्या साहित्य वर्तुळात आपले मानाचे स्थान निर्माण केले. माझा आणि त्यांचा गेल्या चाळीस वर्षांचा स्नेहभाव होता. मी गेली ३५ वर्षे 'साहित्य शिवार'चा दिवाळी अंक प्रसिद्ध करीत असतो. त्यामध्ये आवर्जून त्यांची कथा-लेख घेत होतो. त्यांचे मला मार्गदर्शन होत असे. अलीकडे त्यांची तब्येत बरी नसे म्हणून गेली दोन वर्षे मी त्यांच्याकडून लेख अगर कथा घेतली नाही; कारण त्यांना त्रास होऊ नये असा त्यामागील प्रामाणिक हेतू होता. यादव सरांना प्रति वर्षी त्यांच्या वाढदिवशी ३० नोव्हेंबर रोजी शुभेच्छा देण्याठी मी जात असे. पण रविवार दि. २७ रोजी त्यांना देवाज्ञा झाली. सर आम्हाला सोडून गेले. त्यांच्या निधनामुळे सबंध साहित्य क्षेत्राची, तसेच 'साहित्य शिवार'ची आणि व्यक्तिशः माझी फार मोठी हानी झाली आहे.

डॉ. आनंद यादव महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनाचे यथार्थ दर्शन घडविणाऱ्या कथा, कादंबऱ्या आणि कवितांचे लेखक म्हणून त्यांचे कर्तृत्व गौरवास्पद आहे. साहित्याचे समीक्षक म्हणून त्यांचे कर्तृत्व फार मोठे आहे. कागलसारख्या एका तालुक्यातून येऊन पुण्यासारख्या विद्येच्या माहेरघरात पुणे विद्यापीठात मराठी विभागप्रमुख म्हणून काम करणे, ही भूषणावह बाब होय.

साहित्य क्षेत्रात आपल्या लेखनाची सुरुवात त्यांनी कवी म्हणूनच केली. त्यांची नाळ ग्रामीण जीवनाशी जोडली गेली. ते एक प्रतिभासंपन्न आणि नामवंत असे लेखक म्हणून पुढे उदयास आले. मला त्यांचा अभिमान होता.

कोल्हापूर जिल्ह्यातील कागल या संस्थानी व ऐतिहासिक थोर परंपरा लाभलेल्या गावात यादव सरांचा जन्म झाला होता. स्वातंत्र्यपूर्व काळातील हे

जहागिरीचे गाव होते. पुढे ते कोल्हापूर संस्थानात रूपांतरित झाले. राजर्षी शाहू छत्रपती हे मूळचे कागलचेच होते. पुढे ते कोल्हापूरच्या राजघराण्यात दत्तक गेले. भारताचे पितामह महात्मा गांधी यांचे राजकीय गुरू नामदार गोपाळ कृष्ण गोखले यांचेही जन्मगाव कागलच आहे. अशा या इतिहासप्रसिद्ध आणि थोर परंपरा लाभलेल्या कागल गावात अनेक कष्टप्रद यातना सोसून आपल्या बालपणी आपल्या शेतात शेतमजूर म्हणून उदरनिर्वाह केला. अनेकांच्या मदतीने त्यांनी प्राथमिक-माध्यमिक शिक्षण घेतले. पुढे इतिहासप्रसिद्ध कोल्हापूर शहरात अनेकांच्या मदतीने महाविद्यालयीन शिक्षण पूर्ण केले. ज्येष्ठ शिक्षणतज्ज्ञ डॉ. जे. पी. नाईक यांच्यामुळेच मला महाविद्यालयीन शिक्षण घेता आले, असे मला ते वारंवार सांगत असत. शिक्षणाचा ध्यास घेतलेल्या यादव सरांनी मराठी व संस्कृत हे विषय घेऊन एम.ए. पर्यंतचे शिक्षण घेतले. ग्रामीण भागातून कष्टप्रद जीवन सोसून पुण्यात आलेल्या यादव सरांनी मराठी विषयातच पीएच.डी. (डॉक्टरेट) केली. आणि ते पुणे विद्यापाठात मराठी विभागप्रमुख म्हणून यशस्वी झाले, ही विशेष बाब म्हणता येईल.

यादवांचे शाळेतले नाव आनंदा रत्नाप्पा जकाते ऊर्फ यादव असे होते. घरची गरिबी, हातावरचे पोट. शेतमजूर म्हणून काम करायचे आणि प्रपंचाचा गाडा चालवायच, असे मला ते सांगत असत. परिस्थितीवर मात करून पुढे जायचे, हे त्यांनी ठरविले आणि जीवनात यशस्वी झाले.

मराठी विषयाची गोडी, वाचनाची आवड आणि त्यातूनच त्यांनी लेखनात रस घेतला. कवी म्हणूनच माध्यमिक शाळेत असताना ते ओळखले जायचे. मराठी साहित्यात त्यांनी मोलाची भर घातली. त्यांचे हिरवे जग, मळ्याची माती, मायलेकरं हे कवितासंग्रह प्रसिद्ध आहेत. खळाळ, माळावरची मैना, भूमिकन्या, उगवती मने, झाडवारा असे अस्सल रसरशीत कथासंग्रह  विशेष गाजले आहेत. मातीखालची माती ही त्यांची व्यक्तिचित्रे प्रसिद्ध आहेत. गोतावळा, माउली, लोकसखा ज्ञानेश्वर, या कादंबऱ्या त्यांच्या नावलौकिकास पात्र ठरल्या आहेत. झोंबी, नांगरणी, घरभिंती, काचवेल ही यादव सरांची आत्मचरित्रपर पुस्तके वाचकांच्या हृदयाचा ठाव घेतात. 'रात घुंगराची' हे वगनाट्य लोकांना फारच आवडले आहेत. त्याचे अनेक प्रयोगही झाले आहेत.

ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या, ग्रामीण साहित्य आणि

वास्तव, मराठी साहित्य, समाज आणि संस्कृती, १९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह, ग्रामसंस्कृती असे समीक्षात्मक व वैचारिक ग्रंथ त्यांचे विशेष गाजले आहेत. साहित्य क्षेत्रातील अनेक ज्येष्ठ लेखकांच्या कथांचे यादवांनी संपादन केले आहे. विवेचनात्मक दीर्घ प्रस्तावना लिहिल्या आहेत.

ग्रामीण साहित्याच्या चळवळीला डॉ. यादवांनी मूर्त स्वरूप दिले. शिक्षण संस्था, सामाजिक संस्थांत या संदर्भात शेकडो व्याख्याने त्यांनी दिली. शिबिरे, मेळावे, कार्यशाळा घेऊन या ग्रामीण साहित्य चळवळीचे त्यांनी वातावरण तयार केले आहे. यातूनच ग्रामीण समाजाला नवे परिमाण प्राप्त झाले.

डॉ. यादवांच्या कथा, कविता, कादंबरी, ललित, गद्य, नाटक, साहित्य विचार यांना महाराष्ट्र शासनाची चौदा पारितोषिके मिळाली आहेत. त्यांच्या पीएच.डी.च्या संशोधनपर प्रबंधास पुणे विद्यापीठाने पारितोषिके देऊन गौरविले आहे. त्यांच्या साहित्यकृतींचा कन्नड, ऊर्दू, तेलुगू, हिंदी, इंग्रजी, जर्मनमध्ये अनुवाद झाला आहे. झोंबी, आत्मचरित्र या ग्रंथांवर महाराष्ट्रातील सर्व आकाशवाणी केंद्रांवरून नाट्यरूपांतर प्रसारित करण्यात आले आहे. त्यांच्या या ग्रंथास साहित्य अकादमीने गौरविले आहे. भारतीय ज्ञानपीठ प्रकाशन संस्थेतर्फे त्यांच्या दोन कथा 'भारतीय कहानियाँ ' यामध्ये समावेश करण्यात आल्या आहेत.

बेळगाव येथील दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले आहे. महाराष्ट्र साहित्य पत्रिकेचे ते संपादक होते. शासन व संस्था तसेच अनेक समित्यांवर ते सदस्य होते. भारतीय विद्यापीठाचे मुखपत्र 'विचारभारती' या मासिकाचे काही वर्षे ते संपादक होते. गेली अनेक वर्षे साहित्याशी आणि साहित्यनिर्मितीशी एकनिष्ठ राहून आपल्या सिद्धहस्त लेखणीने आणि अधिकारवाणीने त्यांनी साहित्याची सेवा केली आहे. तसेच कथा, कविता, ललित गद्य, कादंबरी, नाटक, समीक्षा, आत्मचरित्र यांचे त्यांनी अधिकारवाणीने संपादन केले आहे. आज त्यांच्या नावावर ४२ पेक्षा अधिक ग्रंथ आहेत.

मी महाराष्ट्र राज्य सहकारी संघात असताना त्यांची महाराष्ट्रात अनेक ठिकाणी व्याख्याने आयोजित केली होती. एक अत्यंत साधा, सरळ, आपल्या विषयाशी प्रामाणिक राहून त्यांनी महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनात

वावरणाऱ्या लोकांचे प्रबोधन केले. त्यांच्या व्याख्यानातून अनेक नवोदित साहित्यिक निर्माण झाले आहेत. जरी त्यांना साहित्य क्षेत्रात मोठा मान असला तरी ते ग्रामीण भागातील जीवनाशी एकरूप राहिले. अनेकांना मार्गदर्शन केले. सतत आनंदी, दुसऱ्यांच्या सुखदुःखात सहभागी राहून त्यांनी वेदना समजावून घेतल्या. सर्वांशी प्रमाने वागून शक्य तेवढी मदतच केली. असा हा ज्येष्ठ साहित्यिक आपल्यातून निघून गेल्यामुळे साहित्य क्षेत्रात त्यांची पोकळी बराच काळ जाणवेल. त्यांना मी आदरांजली वाहून थांबतो.


❖













१०वी आवृत्ती




# गोतावळा

**आनंद यादव**

**किंमत : १५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

जिवाला बरं नसल्यागत
मळा दिसत हुता....
सबंध माळावर कुठं
झाड, डगरी, वारूळ
काय बी दिसत नव्हतं
...आता माळावर ढोरं
कशाला येतील नि पोरं
तरी कशाला येतील?
...चला! रग्गड झालं
आता. आता नगंच
ऱ्हायाला....
...समदा गोतावळा
घेऊन असंच माळानं
माळ हुडकत जाऊ.
हितं आता कोण हाय
आपलं?



# असं घडलं 'झोंबी'चं कव्हर

– अनिल मेहता


आनंद यादव यांचे 'झोंबी' हे अतिशय लोकप्रिय आत्मचरित्र. हे पुस्तक तयार होऊन ६ महिने झाले होते. फक्त मुखपृष्ठाचे काम राहिले होते. प्रथम ते काम चित्रकार चंद्रमोहन कुलकर्णी यांनाच करायला दिले होते. पण त्यांच्या कामाला वेळ लागत असल्याने मी इतर चित्रकारांनाही याच पुस्तकाचे काम करायला दिले. या पुस्तकासाठी मला मनाला पटेलअसेच मुखपृष्ठ हवे होते. जोपर्यंत तसे चित्र तयार होत नाही तोपर्यंत मी अस्वस्थच होतो. अर्थातच माझ्या या भूमिकेमुळे चंद्रमोहन कुलकर्णी नाराज झाले. शेवटी मला कुणाचे चित्र पटेना मी पुन्हा चंद्रमोहन कुलकर्णी यांची मनधरणी केली, विनंती केली. एक तरी ओळ किंवा हिंट द्या, असे म्हणून त्यांच्यामागे लागलो. शेवटी त्यांनी एका छोट्याश्या दिवडीत चिमणी तेवतेय असं चित्रं मला स्पष्ट केलं. मी ते तात्काळ मान्य केलं. आनंद यादव यांनाही ते चित्र आवडलं. हे मुखपृष्ठ या पुस्तकाला इतकं समर्पक झालं की सर्वांनाच ते आवडलं. इतके दिवस याच चित्रांसाठी थांबल्याचेही समाधान वाटले.

कधी कधी अशा काही महत्त्वाच्या पुस्तकांसाठी प्रकाशकांना मोठा तोटा सोसावा लागतो. 'माऊली' या कादंबरीची १९८४ सालीच प्रत तयार होती. पण ही कादबंरी प्रकाशित व्हायला १९८५ उजाडलं. याला कारणही चमत्कारीक होतं. पुस्तकाच्या मुद्रणात गंभीर चुका होत्या. मुद्रणालयात पूर्वी खिळ्यांचा वापर केला जाई. बाबा पाटीलहे तेव्हा आपल्याकडे काम करत. प्रुफ रिडिंगच्या खूप चुका या पुस्तकांमध्ये दिसत होत्या. चुकून किडका टाईप त्यामध्ये आला होता. पण तोपर्यंत १००० प्रती छापून झाल्या होत्या. मी ते काम तात्काळ

थांबवले. ही पुस्तके मधून फाडायला सांगितली आणि पुन्हा नव्याने संपादित करून ती छपाईला दिली. या पुस्तकामुळं मला झालेल्या नुकसानीबद्दल यादवांना खूप वाईट वाटले. पुस्तकाच्या निर्मिती प्रक्रियेत प्रकाशकाकडे प्रामाणिकपणा असावा, या प्रामाणिकतेसाठी मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रसंगी आर्थिक नुकसानही झेलले, याचे डॉ. यादवांना विशेष कौतुक होते.

**– शब्दांकन**
**गायत्री पाठक**

❖











# साहित्यातील ‘आनंद’यात्री

**– विजय बाविस्कर**

ग्रामीण साहित्याची पूर्वापार चौकट मोडून वास्तव चित्रण, कोणत्याही अभिनिवेशाशिवाय डॉ. आनंद यादव यांनी सादर केले. अशा नवीन वाटा निर्माण करणारा एक ‘आनंदयात्री’ आपण गमावला आहे.

मराठी साहित्याच्या विश्वात कथा, कादंबरी, कविता, ललित, लघुनिबंध, समीक्षा असे साहित्य प्रकार आपल्या लेखणीने समृद्ध करणाऱ्यांमध्ये ज्येष्ठ साहित्यिक डॉ. आनंद यादव यांचे नाव प्रामुख्याने घ्यावे लागेल. त्यांचे ग्रामीण साहित्य लोकांच्या मनाला अधिक भिडले. चरित्रकार म्हणूनही त्यांनी वेगळी वाट चोखाळली. आनंद यादव यांच्या साहित्यातील दर्जात्मक लेखनाला आजवर मिळालेल्या वाचकांच्या प्रतिसादाला खरोखरच तोड नव्हती. त्या अर्थाने सरस्वतीचा वरदहस्त त्यांच्या डोक्यावर कायम होता.

कोल्हापूर जिल्ह्यातील कागल गावी एका गरीब शेतमजुराच्या कुटुंबात त्यांचा जन्म झाला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत गेलेले बालपण; शेतात मजुरी करून, वेळ मिळेल तेव्हा शाळेत जाऊन ते शिक्षण घेत होते. प्रतिकूलतेवर मात करीत जिद्दीने मराठी व संस्कृत भाषेत एम.ए.सारख्या पदव्या त्यांनी प्राप्त करून दाखवल्या. शिक्षणाच्या प्रखर इच्छाशक्तीतून हा प्रवास त्यांनी यशस्वीरीत्या पूर्ण केला.

‘हिरवे जग’ हा शेतीवरील कवितांचा ग्रामीण कवितासंग्रह लहान वयातच त्यांना पु. ल. देशपांडे यांच्यासारख्या महान सारस्वताच्या सहवासात घेऊन गेला. पुढे शहरी जीवनाशी त्यांची नाळ जोडली गेली. यातूनच पुढे दारिद्र्याचे आसूड खात जगणाऱ्या या पोराच्या हाती ‘पाटी पेणशील’ आल्यापासून तो मॅट्रिक होईपर्यंत सोसाव्या लागलेल्या अडचणी व त्यावर केलेली मात त्यांनी १९८७ मध्ये आलेल्या ‘झोंबी’ या आत्मचरित्रात्मक कादंबरीतून जगासमोर आणली. पुढे नांगरणी, घरभिंती, काचवेल,

गोतावळा या कादंबऱ्यांमधूनही आधुनिक यंत्रपद्धतीच्या आगमनामुळे कृषी संस्कृतीचा कसा ऱ्हास होत चालला आहे, जुन्या संस्कृतीत असलेला निसर्ग, मानव, पशू-पक्षी यांचा गोतावळा नामशेष होत आहे, याचे हृद्य चित्रण ग्रामीण बोलीत वाचकांसमोर आणले. शहरी वाचकांना त्यांच्या या आगळ्यावेगळ्या ग्रामीण शैलीने मोहात पाडले. सर्जनशील साहित्यातच रमणाऱ्या लेखकांपैकी ते नव्हते. संशोधनात्मक वाङ्मयीन संशोधन कार्यातही त्यांनी मोलाची कामगिरी केली. किशोर व कुमारांसाठीही मनापासून लेखन केले. 'नटरंग'सारखी तमासगिराच्या आयुष्यावर कादंबरी लिहिली व त्यावर आधारित चित्रपट प्रचंड लोकप्रिय झाला.

साहित्य ही एक गंभीर गोष्ट आहे आणि त्याकडे तसेच पाहिले पाहिजे, असे आनंद यादव यांचे मत होते. साहित्य हा केवळ अक्षरअनुभव नसतो तर तो जीवनानुभवही असायला हवा, असा त्यांचा आग्रह होता. अध्यापन, आकाशवाणी केंद्रावरील नोकरी, तसेच पुणे विद्यापीठातील मराठी विभागप्रमुख म्हणून केलेले त्यांचे कार्यही वाखाणण्याजोगे होते. अनेक महत्त्वाच्या प्रादेशिक, विभागीय आणि कामगार साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांनी भूषविले. ८२व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष म्हणून त्यांची बहुमताने निवड झाली होती; परंतु त्यांनी लिहिलेल्या 'संतसूर्य तुकाराम' या चरित्रात्मक कांदबरीतील मजकुरावरून वाद निर्माण झाला. वारकऱ्यांच्या दबावामुळे त्यांना अध्यक्षपदाचा राजीनामा द्यावा लागला. तरीही त्यांचे साहित्य योगदान कमी ठरत नाही. सामाजिक जाणिवा साहित्यातून उमटाव्यात म्हणून १९७४ पासून डॉ. यादवांनी जाणीवपूर्वक राबविलेली साहित्य चळवळ खेड्यातील अनेक सामाजिक, सांस्कृतिक, शैक्षणिक संस्थांना मार्गदर्शक ठरली. त्यांच्या साहित्यकृतींचे कन्नड, हिंदी, उर्दू, तेलुगू, इंग्रजी, जर्मन भाषांत अनुवाद झाले. ग्रामीण साहित्याची पूर्वापार चालत आलेली चौकट मोडून ग्रामीण जीवनातील वास्तव चित्रण, कोणत्याही अभिनिवेशाशिवाय त्यांनी सादर केले. ग्रामीण साहित्याची स्वतःची शैली अभिमानाने मिरवत नवीन वाटा निर्माण करणारा एक 'आनंदयात्री' आपण गमावला आहे.

**(साभार)**

**दै.लोकमत**

❖

६वी आवृत्ती

# माळावरची मैना




## आनंद यादव

**किंमत : १५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

आनंद यादवांची विनोदी कथा शाब्दिक कोटिक्रम किंवा भाषिक विनोदावर आधारलेली नाही. ती ग्रामीण जीवनातील व्यक्ती, प्रसंग, कौटुंबिक आणि सामाजिक परिस्थिती यांच्यावर आधारलेली आहे. या बाबींतील विसंगती, उथळ जगण्याच्या प्रवृत्तींतून निर्माण झालेली हास्यास्पदता ते अचूकपणे टिपतात आणि त्यातून त्यांची कथा ऐटबाज भाषेत आकाराला येते.

यादवांची विनोदी कथा नुसतीच मनोरंजनवादी नाही. ती परिस्थितीवर, समाज जीवनावर आणि मानवी स्वभावावर विनोदी शैलीत भाष्य करते. या त्यांच्या वैशिष्ट्यामुळे त्यांच्या विनोदी कथेला पुष्काळ वेळा कारुण्याची झालर लाभते.

त्यामुळे यादवांची विनोदी कथा वाचकाला शेवटी अंतर्मुख करते. हे या कथेचं खास वेगळेपण मानावे लागतं.



# ग्रामीण साहित्यातील दीपस्तंभ

– रवींद्र शोभणे

मराठी नवकथेच्या काळात व्यंकटेश माडगूळकरांनी ग्रामीण कथेला नवे वळण देण्याचा प्रयत्न केला. त्यांच्या या प्रयत्नांनी पूर्वीची मराठी ग्रामीण कथा नवतेजाने झळाळू लागली. मराठीतील बिनीच्या नवकथाकारांमध्ये व्यंकटेश माडगूळकरांचे नाव जाणकार जाणीवपूर्वक घेऊ लागले. माडगूळकरांच्याच सोबत शंकर पाटील आणि द. मा. मिरासदार हेसुद्धा दोन कथाकार लिहिते झाले होते. या कथाकारत्रयीने मराठी कथा ही जशी लोकप्रिय करण्याचे कार्य केले (कथाकथनाच्या जाहीर कार्यक्रमांतून) तशीच या कथेची गुणवत्ता पूर्वसुरींच्या कथेपेक्षा निश्चितच वाढविण्याचे ऐतिहासिक कार्य केले. साधारणतः साठ सालापर्यंत ही कथाकार मंडळी जोरात होती. या मंडळींच्या पुढचं पाऊल टाकून नवं काही करू पाहणं हे त्या काळात (मर्ढेकर-गाडगीळ यांच्या कलावादी व सौंदर्यवादी गारुडात) फार मोठं धाडस होतं. ते धाडस डॉ. आनंद यादवांनी केलं आणि मराठीतील साठोत्तरी ग्रामीण साहित्याला नवं वळण मिळालं.

हे नवं वळण दुहेरी होतं. दुहेरी म्हणजे सामाजिक आणि वाङ्मयीन या अर्थाने साठपर्यंतचा कालखंड हा पूर्णतः सौंदर्यवादी विचारांनी भारावलेला कालखंड होता. साहित्यातील सामाजिक जाणिवांचा विचारच या काळात दुय्यम अर्थाने केला जात होता. कलाकृतीच्या सामाजिक आशयापेक्षा तिचा पोत आणि घाट यावरच या जाणिवांचा भर (आणि काथ्याकूटही) होता; पण साठोत्तरी कालखंड मात्र नव्या सामाजिक अभिसरणाला सामोरा जाऊ पाहत होता. त्यातला एक महत्त्वाचा भाग म्हणजे संयुक्त महाराष्ट्राच्या निर्मितीनंतर मुळातून बदलणारे खेडे आणि खेड्यातील बदलणारा माणूस. दलित आणि मार्क्सवादी सामाजिक व वाङ्मयीन चळवळींचाही जवळपास हाच जन्मकाळ होता. प्रखर सामाजिक भान या काळात साहित्य प्रांतात येऊ पाहत होतं. जीवनवादी जाणिवा अधिक सबळ होऊ पाहत होत्या. सहकार क्षेत्रातल्या चळवळींमुळे आणि सुधारणांमुळे खेड्यांचा चेहरामोहराच पुरता बदलू पाहत

होता. सगळी स्थित्यंतरं साहित्यात उमटणं अटळ व महत्त्वाचं होतं. या स्थित्यंतरांना पहिल्यांदा आपल्या साहित्यातून सामाजिक भानांसह आणि कलात्मकतेची बूज राखून टिपण्याचा प्रयत्न आनंद यादवांनी केला.

यादवांची वाङ्मयीन आणि सामाजिक भूमिका तयार होत असताना ते ती सर्वप्रथम काव्यातून व्यक्त करू पाहत होते. आधुनिक मराठी कवितेत गिरीश, ग. ल. ठोकळ इत्यादी कवींनी आपल्या काव्यातून 'जानपद' भूमिकेतून चितारलेले खेडे हिरवेगार, सुपीक, घुंगरवाळ्या नादरवांनी नटलेले, मोटेच्या आणि पाटाच्या पाण्याने खळाळणारे होते. म्हणजे केवळ वास्तवाचा आभास निर्माण करून स्वप्नरंजनात रमणारे, महात्मा गांधींनी दर्शविलेल्या ग्रामसंस्कृतीच्या सहानुभूतीतून ओलेचिंब होऊन निघालेले होते; पण हे ग्रामजीवन आणि त्या ग्रामजीवनातील वास्तव काही खरे नव्हे, व्याजवास्तवाच्या पलीकडे ते जाणारे नाही, याची जाणीव आपल्या लेखनाच्या पहिल्या टप्प्यावरच आनंद यादवांना झाली आणि त्यातूनच त्यांचा 'हिरवे जग' हा काव्यसंग्रह आला.

आपण ज्या ग्रामीण वास्तवाचा विचार करतो, ते वास्तव केवळ कवितेत न मावणारे आहे, याची जाणीव यादवांना याच काळात झाली आणि कवितेसोबतच त्यांनी आपल्या अभिव्यक्तीसाठी कथेचा फॉर्म निवडला. या काळात माडगूळकर पाटील-मिरासदार, रणजित देसाई या ग्रामीण कथाकारांची कथा आपल्या ठळक वैशिष्ट्यांसह मराठी साहित्यात रूढझाली होती. यादवांची कथा ही लघुकथा म्हणून आली. ही कथा 'फॉर्म'च्या दृष्टीने नवकथाकारांचा प्रभाव नाकारू शकत नव्हती. त्या अर्थाने ती प्रयोगशीलही होती; पण त्याहीपेक्षा त्यातले अनुभवविश्व हे अस्सल ग्रामीण होते. शहरी अनुभवावर आणि शहरी मानसिकतेवर ग्रामीणत्वाची झूल पांघरून ज्या अर्थाने ग्रामीण कथा घडत होती, त्यापासून ही कथा चार पावले पुढे असल्याची साक्ष 'खळाळ' आणि 'खळाळ'नंतरच्या त्यांच्या कथेने दिली. 'घरजावई', 'माळावरची मैना' या कथांची प्रकृती काहीशी भिन्न आहे; पण 'खळाळ', 'आदिताल', 'उखडलेली झाडे' इत्यादी कथासंग्रहातल्या कथांचा विचार केवळ 'ग्रामीण' एवढ्याच सीमित अर्थाने करता येत नाही, तर एकूणच कथेच्या परिप्रेक्ष्यातही आशय आणि अभिव्यक्तीच्या दृष्टीने या कथेचे वेगळेपण नमूद करता येते.

कविता, कथा, ललित गद्य या वाटेने सुरू झालेला आनंद यादवांचा प्रवास पुढे कादंबरीपर्यंत आला नसता तरच नवल ठरले असते. आपल्या

अभिव्यक्तीसाठी आणि ही अभिव्यक्ती सामाजिक भानाने परिपुष्ट असेल तर कादंबरीसारखा दीर्घायुषी वाङ्मयप्रकार हाताळणे हे बहुतेक गद्य लेखकाचे ईप्सित ठरते. तेच यादवांचेही झाले. 'गोतावळा' ही त्यांची पहिली कादंबरी १९७१ मध्ये प्रकाशित झाली आणि मराठी ग्रामीण कादंबरीला नवे परिमाण प्राप्त झाले. एक कलात्मक, अस्सल कादंबरी म्हणून 'गोतावळा'ला सर्वसामान्य वाचकांपासून तर जाणकार रसिकांपर्यंत सर्व स्तरांतील वाचकांनी भरभरून प्रतिसाद दिला. कृषिसंस्कृतीच्या मूल्यबदलाची कलात्मक अभिव्यक्ती म्हणून 'गोतावळा'चे वाङ्मयीन मोठेपण जवळपास सगळ्यांनीच मान्य केले.

आपल्या कथालेखनाच्या पहिल्या टप्प्यापासून ते 'गोतावळा'च्या लेखनापर्यंत लेखक म्हणून आनंद यादवांनी जाणीवपूर्वक एक प्रयोग केला होता आणि तो म्हणजे ग्रामीण कथात्म लेखनात संवादांसोबतच बोलीतील निवेदन. त्यापूर्वीचे ग्रामीण साहित्य म्हणजे निवेदन प्रमाण भाषेत आणि संवाद बोलीत अशा स्वरूपाचे होते; पण संवादासोबतच निवेदनही बोलीत मांडण्याचा एक सजग प्रयत्न यादवांनी केला. हा प्रयत्न केवळ टूम म्हणून वा केवळ वेगळेपणा इतपतच मर्यादित नव्हता, तर त्यामागे यादवांची ग्रामीण साहित्यासंबंधीची निश्चित अशी भूमिका होती. त्या निश्चित भूमिकेतूनच यादवांनी हा प्रयोग ग्रामीण जीवनदर्शनाच्या संदर्भात अधिक स्वाभाविक आणि मूलगामी केला. खरे तर यातून त्यांनी नंतर सुरू केलेल्या ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू झाली असे म्हटल्यास ते वावगे ठरू नये. यादवांनी सुरू केलेली ही ग्रामीण साहित्याची चळवळ प्रस्थापित व्यवस्थेतल्या वाङ्मयीन मूल्यांच्या विरोधात बंडखोरपणे उभी राहिली.

कथाकार, कादंबरीकार, ललित गद्यलेखक, आत्मचरित्रकार आणि समीक्षक या नात्यांनी यादवांनी आपल्या कर्तृत्वाचा ठसा वेगळेपणाने उमटवला आहे. या पाचही वाङ्मयप्रकारांच्या इतिहासलेखनाचा ढोबळमानाने विचार केला तरी आनंद यादव हे नाव कुणालाही नजरेआड करता येणार नाही, हेही तेवढेच खरे. त्यातही कादंबरीकार म्हणून आणि आत्मचरित्रकार म्हणून त्यांची कामगिरी दोन पावले सरसच, असे म्हणावे लागेल. 'गोतावळा' नंतर 'नटरंग', 'माउली' आणि 'कलेचे कातडे' या तीन कादंबऱ्यांचे सूत्र काही मर्यादेपर्यंत समानधर्मी असे आहे आणि ते सूत्र म्हणजे सृजनधर्म. कलावंताचे मनस्वीपण (नटरंग), मातृधर्माचे रूपकत्व (माउली)

आणि साहित्यधर्म (कलेचे कातडे) या अर्थाने सृजनप्रक्रियेलाच लेखक इथे कादंबरीधर्म बहाल करताहेत, हे जाणवते. ज्ञानेश्वरांच्या जीवनावरील कादंबरीसुद्धा या प्रक्रियेचे उन्नत रूप आहे, असेही म्हणता येईल. भूमीच्या सृजनधर्मापासून तिच्या निर्मितीजन्य मूलधर्मापासून आपली नाळ शेतात आलेल्या ट्रॅक्टरनं कापून काढली आहे. या आशयातून 'गोतावळा'चा वेध घेण्याचा प्रयत्न केला तर या समानसूत्रात 'गोतावळा' ही चपखल बसू शकते.

आनंद यादव यांना मराठी साहित्यात अधिक लौकिक प्राप्त झाला तो त्यांच्या 'झोंबी' या आत्मचरित्रामुळे. ग्रामीण जीवनातले चटके सहन करीत शिक्षणासाठी धडपडणाऱ्या आनंद रतन जकाते या नायकाच्या आणि त्या नायकाच्या अवतीभवतीच्या  वाङ्मयीन, सामाजिक पर्यावरणाचा आलेख 'झोंबी' आणि त्यापुढील 'नांगरणी', 'घरभिंती' आणि 'काचवेल' या खंडांतून यादवांनी मांडला आहे. या चतुष्ट्यातून लेखक केवळ आपले व्यक्तिगत आयुष्यच मांडत नाहीत, तर त्या आयुष्याला बरावाईट आकार देणाऱ्या काळाचेही सर्वंकष पातळीवर चित्रण करतात. १९९० मध्ये 'झोंबी'ला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला तेव्हा यादवांच्या या लेखनाला खऱ्या अर्थाने न्याय मिळाला, असे म्हणावे लागेल.

एखादा कलावंत जेव्हा आपल्या ललित लेखनातून नवे मूल्य मांडतो, नवा विचार रुजवू पाहतो, नव्या संकल्पना मांडू पाहतो, तेव्हा त्याच्या प्रतिष्ठापनेसाठी, त्याच्या समर्थनार्थ त्या ललित लेखकाला काही एक वैचारिक सूत्र घेऊन आपल्या मतप्रतिपादनार्थ समीक्षणात्मक लेखन करणे गरजेचे ठरते. मर्ढेकर, गाडगीळ, नेमाडे किंवा दलित साहित्याची चळवळ या संदर्भात उदाहरण म्हणून देता येईल. ग्रामीण साहित्य आणि चळवळीसंबंधीची आपली भूमिका मांडण्यासाठी आनंद यादवांनाही अशा प्रकारच्या समीक्षालेखनाचा आधार घेणे आवश्यक ठरले आणि त्यातूनच त्यांनी 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या', 'ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव', 'मराठी साहित्य : समाज आणि संस्कृती', 'ग्रामसंस्कृती' इत्यादी पुस्तकांचे लेखन केले. १९७४ ते १९८७ या काळात आनंद यादवांनी ग्रामीण साहित्याची चळवळ सबंध महाराष्ट्रभर राबवून आपल्या पुढच्या पिढीला लिहितं केलं, त्या पिढीची ममत्वाने भलावण करीत तिला मराठी साहित्यात रूढ करण्यासाठी मदत केली, हे यादवांचं कार्य सामाजिकदृष्ट्या अधिक मोलाचं आहे.

❖



# आनंदाचे डोही...!

— ह.ल.निपुणगे

डॉ. आनंद यादव यांच्या साहित्यामध्ये जो सच्चेपणा, साधेपणा आहे तो वाचकांना भावल्याशिवाय राहत नाही. त्यांच्या ग्रामीण कथा ग्रामीण बोलीच्या यथायोग्य वापरानं जिवंत वाटतात. त्यातील व्यक्तिचित्रे, समाजचित्रे वाचकांच्या मनाला भिडतात, ती आपण प्रत्यक्षपणे पाहत आहोत, असे वाटते.

त्यांनी आपल्या लेखनाची सुरुवात कवितांनी केली. त्यांच्या 'मळ्याची माती' या काव्यसंग्रहातील 'आपलं अपून जपायचं' ही कविता अजूनही माझ्या लक्षात आहे. एका सासुरवाशिणीला उद्देशून केलेली ही कविता खऱ्या अर्थाने ग्रामीण व्यक्तिचित्र साकार करते.

डॉ. आनंद यादवांनी आपल्या 'झोंबी' या आत्मचरित्रात लिहिल्याप्रमाणे त्यांच्या कविता 'पुलं'ना आणि सुनीताबाई यांना प्रथमक्षणीच खूप आवडल्या आणि त्यांनी दोघांनी यादवांना खूपच प्रोत्साहन दिले. डॉ. आनंद यादव यांचे साहित्यिक व्यक्तिमत्त्व फुलविण्यात 'पुलं'चा आणि सुनीताबाईंचा महत्त्वाचा वाटा आहे, यात शंका नाही. म्हणूनच यादवांना मी एकदा गमतीनं म्हटलं होतं, 'महाराष्ट्राचे लाडकं व्यक्तिमत्त्व म्हणजे 'पुलं' आणि 'पुलं'चं लाडकं व्यक्तिमत्त्व म्हणजे आनंद यादव.'

साहित्यामध्ये जे प्रत्यक्ष अनुभवले आणि त्यात रसिकतेने, सौंदर्यदृष्टीने, कल्पकतेने भर घातली, तर ते अधिक समर्पक होते. यादवांची 'गोतावळा' ही कादंबरी अशीच महत्त्वपूर्ण आहे. त्यांनी लिहिलेल्या 'रंजन' या ग्रामीण कथेचा विस्तार म्हणजे ही कादंबरी. 'गोतावळा' या कादंबरीच्या अनेक आवृत्त्या झाल्या. विद्यापीठाच्या अभ्यासक्रमात या कादंबरीचा समावेश झाला. यादवांना त्यांच्या पुस्तकांच्या नावाने ओळखायचे झाल्यास 'गोतावळाकार' यादव असेच म्हणावे लागेल.

यादवांच्या कादंबऱ्यांतील, कथांतील संवादांमुळे त्या अधिक जिवंत

वाटतात. याचे कारण ते पुण्याला आल्यावर त्यांनी आकाशवाणीसाठी विविध विषयांवर अनेक श्रुतिका लिहिल्या. या श्रुतिका ऐकणाऱ्या श्रोत्यांना न पाहता, फक्त ऐकून ती पात्रे अनुभवायला मिळतात.

डॉ. आनंद यादवांनी विपुल ललित लेखनही केले आहे. ते पुण्याला आल्यावर त्यांनी एका खेड्यातील मुलाला पुणे कसे दिसले यावर एक ललितगद्य लिहिले. ते त्यांनी मला त्यावेळी वाचायला दिले होते. मला ते मनापासून आवडले. प्रकाशित करावे असे वाटले; परंतु त्यावेळच्या आर्थिक अडचणींमुळे ते जमले नाही. त्यानंतर अद्यापही डॉ. यादवांचे पुस्तक प्रकाशित करण्याचा योग आला नाही; मात्र त्यांनी माझ्या 'विशाखा' दिवाळी अंकासाठी अनेकदा कथा, लेख लिहिले आहेत.

डॉ. यादव यांनी लिहिलेल्या ललितगद्यात 'स्पर्शकमळे' हे सौंदर्याचा आस्वाद घेणारे पुस्तक मला फारच आवडले. हे लेख प्रथम 'मेनका' मासिकात प्रकाशित झाले. नंतर ते पुस्तक मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केले. त्या पुस्तकाची मांडणी मी केली होती. 'पाणभवरे', 'मातीखालची माती' ही त्यांची ललितगद्येही वैशिष्ट्यपूर्ण आहेतच.

डॉ. यादवांनी जी समीक्षा लिहिली ती आस्वादक समीक्षा लिहिली. उगाच कुणालातरी ठोकून काढणे, टीका करणे हे त्यांच्या स्वभावात नाही. त्यातील 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या!', 'साहित्याची निर्मिती प्रक्रिया', 'मराठी लघुनिबंधाचा इतिहास', 'आत्मचरित्र मीमांसा' ही त्यांची समीक्षात्मक पुस्तके अभ्यासकांना खूपच उपयुक्त ठरली आहेत.

त्यांनी काही विनोदी कथाही लिहिल्या आहेत. त्यांचा 'घरजावई' हा विनोदी कथासंग्रह प्रकाशित झाला आहे. त्यातील 'घरजावई' ही कथा अजूनही माझ्या लक्षात आहे.

डॉ. यादवांनी आत्मचरित्र लिहिण्याचे ठरविले. त्याचा पहिला भाग 'झोंबी' या नावाने प्रकाशित झाला. या भागाला त्यांनी कादंबरी असे म्हटले. या चारही भागांना 'नांगरणी', 'घरभिंती', 'काचवेल' यांना कादंबरीमय चरित्र असे त्यांना म्हणावयाचे होते. ही चारही पुस्तके खरोखरच कादंबरीमय आहेत. रसाळ आहेत. सर्वांना आवडणारी आहेत. हळूहळू डॉ. यादवच या पुस्तकांना आत्मचरित्राचे भाग असे म्हणू लागले. तरीही वाचकांनी मग या पुस्तकांना स्वतंत्र नावे का दिली असा प्रश्न निर्माण केलाच!

त्यांची 'माऊली' ही कादंबरी मला खूपच आवडली. या कादंबरीची

पहिली आवृत्ती पोथीच्या आकारात (आडव्या) पुण्याच्या मंदार प्रकाशनाने प्रकाशित केली होती. आता ती नव्या स्वरूपात मेहता पब्लिशिंग हाऊसने प्रकाशित केली आहे. 'नटरंग' ही त्यांची कादंबरही खूपच गाजली. या कादंबरीची पहिली आवृत्ती मौज प्रकाशनाने प्रकाशित केली होती.

मराठीतील एका ख्यातनाम लेखकाच्या पुस्तकाला साहित्य अकादमी पुरस्कार मिळाला. त्या पुस्तकाची मूळ कल्पना परकीय होती. त्यावर खूप वादळ झाले. त्या लेखकाने डॉ. यादवांवर अब्रूनुकसानीचा दावा ठोकला. अर्थात नंतर हे सारे निवळले; परंतु यादवांनी 'कलेचे कातडे' ही कादंबरी लिहून योग्य तो परामर्श घेतला. ही कादंबरी लिहिणे आणि ती प्रकाशित करणे तसे धाडसाचे होते. त्यावेळी म. सा. पत्रिकेच्या अंकात या कादंबरीवर परीक्षणात्मक लेख आला. डॉ. अरविंद वामन कुलकर्णी पत्रिकेचे संपादक होते. खूप वादळ झाले, नंतर ते हळूहळू शमले. मी त्यावेळी म. सा. प.चा प्रमुख कार्यवाह होतो.

'लोकसखा ज्ञानेश्वर' ही कादंबरी लिहायला सुरुवात करण्यापूर्वी एकदा त्यांची व माझी कोल्हापूरला भेट झाली. आम्ही दोघे एकत्र गाडीने पुण्याला यायला निघालो. गप्पा सुरू झाल्या.

''काय नवीन काय लिहिताय?'' मी विचारले.

''ज्ञानेश्वरांच्या जीवनचरित्रावर कादंबरी लिहितोय!'' ते म्हणाले.

''आँ? अहो आतापर्यंत ज्ञानेश्वरांवर तीन कादंबऱ्या प्रकाशित झाल्या. रवींद्र भटांची 'इंद्रायणी काठी', पद्माकर गोवईकरांची 'मुंगी उडाली आकाशी', आणि गो. नी. दांडेकरांची 'मोगरा फुलला!'' या तीनही कादंबऱ्या खूपच गाजल्या, खपल्या. मग तुम्ही आता वेगळं काय लिहिणार?'' मी म्हणालो.

डॉ. यादवांनी आपली भूमिका सांगितली. या संबंधी काय काय वाचलं ते सांगितलं. वरील मी सांगितलेल्या तीनही कादंबऱ्या वाचल्याचे सांगितले आणि म्हणाले, ''मी अगदी मुळात जाऊन, सखोल चिंतन करून ही कादंबरी लिहिणार आहे. अनेक गोष्टींचा मुळात जाऊन शोध घेणार आहे. रेड्यामुखी वेद वदविले म्हणजे नेमके काय? चांगदेवाची भेट, चाललेली भिंत यासंबंधी शास्त्रीय कारणांचा शोध घेणार आहे. अशा कादंबऱ्या म्हणजे नुसता शब्दांचा फुलोरा असणे योग्य नाही. त्यावेळच्या समाज जीवनाचाही मी सखोल अभ्यास करून लिहिणार आहे! ही माझी कादंबरी वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण

असणार आहे,'' यादव म्हणाले.


मग सारा प्रवासभर आमच्या याच विषयावर गप्पा चालल्या होत्या. ते अनेक गोष्टी सांगत होते, मी ऐकत होतो. प्रवास संपता संपता माझ्या मनाने एक गोष्ट पक्की केली. ज्ञानेश्वरांच्या जीवनावर एक चांगली कादंबरी वाचायला मिळणार आणि तसेच झाले. ही कादंबरी गाजली. दोन-तीन आवृत्त्या झाल्या.

डॉ. यादव यांनी साहित्य क्षेत्रात केलेले कार्य फारच महत्त्वपूर्ण आहे. म. सा. पत्रिकेचे ते काही काळ संपादक होते. त्यावेळी त्यांनी संपादित केलेला ग्रामीण साहित्य विशेषांक खूपच गाजला. महाराष्ट्र टाइम्सने त्यावर संपादकीय लिहिले. त्यामुळे म.सा. पत्रिकेच्या या अंकाची दुसरी आवृत्ती काढावी लागली. हा इतिहास त्यांनी घडविला.

ग्रामीण साहित्य चळवळ त्यांनी उभी केली. अनेक नवनव्या ग्रामीण साहित्यिकांना मार्गदर्शन केले. ग्रामीण साहित्याला नवी दिशा दिली. ग्रामीण साहित्य प्रकाशित होण्यासाठी मदत केली. ग्रामीण साहित्यिकांची एक नवी पिढीच तयार केली असे म्हटले तर वावगे होणार नाही.

त्यांना अनेक पारितोषिके, पुरस्कार, मानसन्मान मिळाले. अनेक ठिकाणी त्यांनी समयोचित भाषणे केली. ती सर्वच लिखित स्वरूपात असतील असे नाही. साहित्याच्या प्रसारासाठी, निर्मितीसाठी त्यांनी फारच मोलाचे कार्य केले आहे.

❖






**४थी आवृत्ती**




# माऊली

## आनंद यादव

**किंमत : १५०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

'माऊली' ही अगदीच वेगळी कादंबरी. तिची नायिका आहे एक मांजरी; लेखकाने माया लावलेली. या मायेच्या पसाऱ्यात लेखकाचे कुटुंबीय, स्नेही-सोबती आणि त्या क्रूर काळ्या बोक्यासह मांजरीचा गोतावळाही समाविष्ट होतो आणि कादंबरीची वीण एक वेगळं रंगरूप घेऊ लागते. यादवांचे निरीक्षण वाचकाला स्तिमित करील असे आहे. हे निरीक्षणच त्यांना एक रस्ता सापडवून देते. स्वत:चे भान शाबूत ठेवून यादव हळूहळू मार्जारविश्वाचा शोध घेऊ लागतात. साधा वाटेल अशा तपशिलाची पेरणी करीत या शोधवाटेने लेखक स्वरक्षण आणि स्ववंशवर्धन या दोन मजबूत पाख्यांवर विसावलेल्या निसर्गसिद्ध आदिम प्रेरणेशी वाचकाला नेऊन भिडवतो तेव्हा वाचक पछाडल्यागत होतो. उत्पत्ती, स्थिती आणि लय यांच्याच फक्त अंकित असलेले एक थेट असे नर-मादीच्या नात्याचे अस्तित्व न्याहाळताना आदिनिरणाच्या वाटेकडे वळतो. मग मांजरी ही मांजरी राहत नाही; तिथे साकारत जाते आदिमायेचे-त्या जगन्माऊलीचे आत्मजन्मा नि आत्मभोगी असे कृतार्थ रुपडे. चिंतनगर्भ जीवनेच्छेचा कलारूप आविष्कार म्हणजे 'माऊली.' दार्शनिक तत्त्वज्ञान, लोकसाहित्य-परंपरा, सनातन भारतीय समाजमन यांचा हळुवार आणि तलम स्पर्श झालेली मराठी भाषेतील ही पहिलीच साहित्यकृती असावी, इतकी ती वेगळी आहे.

**– प्रा. अरविंद वामन कुलकर्णी**



# नारबाचा गोतावळा

**– उज्ज्वला केळकर**

डॉ. आनंद यादव एक लोकप्रिय लेखक. त्यांचं लेखन सामान्य वाचकांना जसं आवडतं, तसंच चोखंदळ वाचकांनाही भावतं आणि समीक्षकांनाही त्यात काहीतरी वैशिष्ट्यपूर्ण आणि वाखाणण्यासारखं आढळतं. डॉ. यादव यांची लेखक म्हणून मला पहिली ओळख झाली, ती १९७३मध्ये. त्यापूर्वीही त्यांचं इकडचंतिकडचं, काहीबाही वाचलेलं होतं; पण लेखकाचं नाव पाहून त्याचं पुस्तक आणावं, मासिकातलं, दिवाळी अंकातलं साहित्य वाचावं, ही किमया माझ्या बाबतीत घडवली 'गोतावळा'ने. हे पुस्तक जरी १९७१ साली छापलं गेलेलं असलं, तरी माझ्या वाचनात ते आलं, १९७३ साली. त्या वर्षी मी एम.ए. ला बसले होते आणि अभ्यासासाठी ही कादंबरी नेमलेली होती. प्रथम कादंबरी वाचली, तेव्हा ती वेगळी आणि वैशिष्ट्यपूर्ण वाटली. अभ्यासासाठी पुन्हा पुन्हा बारकाईने वाचत गेले, तसतशी त्यातली सौंदर्यस्थळं अधिकाधिक स्पष्ट होत गेली. उलगडत गेली. या गोष्टीला आता पस्तीस वर्षे होऊन गेलेली असली, कादंबरीतला तपशील धूसर होत गेला असला, तरी त्या काळात आम्ही मनाने 'नारबाशी' किती एकरूप होऊन गेलो होतो आणि त्याच्या गोतावळ्यातलेच होऊन गेलो होतो, हे अजूनही आठवतंय.

त्या वर्षी कस्तुरबाई वालचंद कॉलेज, सांगली येथील वाङ्मय मंडळाने 'गोतावळा' वर चर्चा आयोजित केली होती. डॉ. यादवांनाही आमंत्रित केले होते. कादंबरीवर जी चर्चा झाली त्यात जाणवलं, की बहुतेक सारे 'नारबा' वर इतके लोभावलेले होते आणि त्याच्याविषयी इतके भरभरून बोलत होते, की लेखकाला आपल्या लेखनाविषयी एकीकडे कृतार्थता वाटत असतानाच, नारबाविषयी सूक्ष्मसा हेवा तर वाटू लागला नाही ना, असं वाटण्यासारखी परिस्थिती होती. कारण त्यानंतरच्या आपल्या भाषणात यादव, कुठलीही व्यक्तिरेखा लेखकाइतकी मोठी नसते, अशा आशयाचं काही तरी बोलले होते. ते काहीही असलं, तरी आपल्या लेखनाला मिळालेली एवढी दाद,

एवढं प्रचंड कौतुक अनुभवण्याचा आनंदयोग यादवांच्या ललाटी लिहिला होता. अर्थात ललाटी लिहिला होता, असं म्हणणं म्हणजेसुद्धा त्यांना थोडंसं कमी लेखण्यासारखं आहे. कारण ललाटीचा लेख हा दैवयोगाचा भाग आहे. इथे प्रतिभा दैवदत्त असली, तरी त्या लेखनामागे केवढी तरी साधना होती. स्वत:ला लेखक म्हणून सिद्ध करण्यासाठी घेतलेले अपार परिश्रम होते. त्याहीपूर्वी लेखक होण्यासाठी, तिथपर्यंत पोचण्यासाठी जे शिक्षण घेतलं, विद्या संपादन केली, त्यासाठी करावा लागलेला संघर्ष होता आणि हे सारं लेखकाचं कर्तृत्व होतं.

डॉ. यादव यांना अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अत्यंत सन्मानाचे पद मिळाले आहे. इथवरचा त्यांचा प्रवास किती वाटा-वळणांनी कसकसा झाला? सुरुवातीला तर तर तो किती काट्याकुट्यातून, दगड-गोट्यांच्या मार्गावरून झाला, याबद्दल त्यांनी 'झोंबी' या आपल्या आत्मचरित्रात्मक कादंबरीत लिहून ठेवलंच आहे. आनंद यादव एका गरीब, कष्टकरी, स्वत:ची जमीन नसलेल्या शेतकरी कुटुंबात जन्माला आले. वडील निरक्षर. नुसतेच निरक्षर नव्हेत, तर अक्षरशत्रू. अक्षरशत्रू म्हणजे शिक्षणाचेच शत्रू. शिक्षण म्हणजे घरबुडवेपणा आहे असं मानणारे. शिकणाऱ्या आनंदाला शेतीतली जास्तीत जास्त कामे लावून त्याला शेतीत गुंतवण्याचा प्रयत्न करणारे. त्याला शिक्षणापासून परावृत्त करण्याचा आटोकाट प्रयत्न करणारे. शिक्षणाच्या अदम्य ओढीने आनंदा दिवसरात्र शेतात राबून होईल तशी शाळा करून शिकत राहतो. मॅट्रिक होतो. त्याच ओढीने पुढे एम.ए. पर्यंत शिकतो. घडत-वाढत राहतो. नवनवीन अनुभवांनी संस्कारित होतो. 'नांगरणी'तून हा सगळा तपशील त्यांनी मांडला आहे. आज या गोष्टींचं महत्त्व अशासाठी विशेष वाटतं, की शिक्षणाची कुठलीही परंपरा, पूर्वसंस्कार नसलेली व्यक्ती शिकते. ऊच्चविद्याविभूषित होते. देवदत्त प्रतिभेची साधना करते. आपण अनुभवलेलं जग, आपले संस्कार आपलं चिंतन शब्दबद्ध करते. वेगळं, वैविध्यपूर्ण, विविधांगी, लक्ष्यवेधी लेखन करते आणि साहित्य क्षेत्रातील अत्यंत सन्मानाचे मानले जाणारे अध्यक्षपद भूषविते.

डॉ. यादवांनी कविता, कथा, कादंबरी, ललित लेखन, समीक्षा असं विविधांगी लेखन केलंय आणि तेही दर्जेदार. तसं त्यांच्या अनेक कथा-लेखांशी, पुस्तकांशी थबकावंसं, रेंगाळावंसं वाटलं. 'खळाळ', 'मातीखालची माती', 'स्पर्शकमळे', 'पाणभवरे', 'नटरंग', आणखी किती

तरी... पण 'गोतावळा' हा माझा पहिला थांबा.

'गोतावळा' प्रथम वाचलं अभ्यासाला होतं म्हणून आणि म्हणूनच नंतर पुन्हा बारकाईने वाचलं. वाचता वाचता अनुभवलं आणि अनुभवता अनुभवता 'नारबा' सकट त्या सगळ्या गोतावळ्याचा लळा लागला. 'गोतावळा' ही नारबाची आत्मकथा. नारबा हा या कादंबरीचा नायक. दुसऱ्याच्या शेतावर काबाडकष्ट करत जगणारा शेतमजूर. त्याची कहाणी, त्याचे अनुभव, भावना, विचार यातून उलगडत जाते ती त्याच्याच भाषेत. आत्तापर्यंत वाचलेल्या ग्रामीण कथा-कादंबऱ्यांतून निवेदन प्रमाण भाषेत केलेलं असायचं आणि संवाद ग्रामीण बोली भाषेत असायचे. इथं कथक स्वतः, स्वतःच्या भाषेतच स्वतःची कहाणी सांगतो. त्यामुळे संपूर्ण कादंबरी प्रादेशिक भाषेत विकसत जाते. ही भाषा आहे लेखकाच्याच प्रदेशातली. कोल्हापूर-कागलकडची गावरान बोलभाषा. ही गावरान बोली मोठी गोडी आहे. प्रसन्न आहे. काव्यमय आहे. चैतन्यमय आहे.

कादंबरीमध्ये ज्या रूढ अर्थानं कथानक असतं, तसं कथानक या कादंबरीमध्ये नाहीच; तरीही प्रत्येक प्रकरणातून एकेक कथा ऊलगडत जाते. प्रत्येक प्रकरण एक स्वतंत्र कथा आहे आणि ती स्वतंत्र असूनही मूळ धाग्याशी, गोतावळ्याशी जोडलेली आहे. प्रत्येक कथा गोतावळ्यातील एकेका गोताची. हे गोत म्हणजे, गुरंढोरं, कोंबडा-कुत्री, शेरडं-घोडं, खारी-खेकडे, घारी-गिधाडं, कासव-कावळे आणि मुंग्या-माशांपासून किती तरी... एकट्या असलेल्या नारबाचा हाच 'गोतावळा' आहे. त्यातली काही नारबाच्या देखता डोळा मोठी झाली आहेत. आपल्या निगराणीनं त्यानं ती वाढवली आहेत. तेच त्याच्या भावजीवनाचे अंतरंगसखे झाले आहेत.

रामू सोनवडेच्या शेतात नारबा गडी म्हणून राबतोय. मालकाचा एक पाव्हणा त्याला ट्रॅक्टरची शेती कशी फायद्याची आहे, हे पटवून देतो. 'धंदा म्हटलं की गाय नि माय करून भागणार नाही, येईल त्याचा पैसा केला पाहिजे... काळी आई-बिळी आई आता सोडून द्या. म्हणायचंच असेल, तर दाई म्हणा. असं झालं तरच शेतीकडनं जास्तीत जास्त प्राप्ती होईल. तिला भरपूर राबवून घेतली, तरच पैसा.  एवढा पैसा घालून तुम्ही का काळी आई काळी आई करत बसणार?' असंही म्हणतो. यांत्रिक शेतीसाठी जनावरांची काही गरज नाही, हेही मालकाच्या गळी उतरवतो. मुळातच व्यवहारी दृष्टिकोन असलेल्या मालकाला आपल्या पाव्हण्याचं म्हणणं पटतं. वर्षभरात

तो आपल्या शेतात ट्रॅक्टर आणायचं ठरवतो. हा या कादंबरीचा आरंभबिंदू.

प्रत्यक्षात शेतावर ट्रॅक्टर येतो. ड्रायव्हरला नारबाची भाकर दिली जाते आणि ट्रॅक्टरसाठी गोठा मोकळा केला जातो. आयुष्यभर मालकासाठी राबणारी पण आता निरुपयोगी झालेली जनावरं एकेक करत सरतात किंवा दूर सारली जातात आणि असाच कष्टलेला नारबा अखेर देशोधडीला लागतो, इथं कादंबरी संपते.

या दोन कालबिंदूंच्या दरम्यान शेतामळ्याच्या मर्यादित विश्वात घडणारे प्रसंग, त्यांतलं जीवननाट्य या कादंबरीत तपशिलानं येतं. हे जीवननाट्य घडतं पशू-पक्ष्यांच्या संदर्भात. नारबा त्याचं अगदी सूक्ष्मपणे, तपशीलवार चित्रमयी वर्णन करतो. अर्थात तो या घटना-प्रसंगांचा केवळ तटस्थ साक्षीदार नाही. त्याचा वावरही त्या प्रसंगांमध्ये आहेच. तो मनानं त्यांच्यात गुंतलाय. म्हणूनच हे वर्णन करताना त्याला त्यांचा भूतकाळ आठवतो आणि कधी कधी स्वतःचाही... त्या त्या वेळी ते ते सौंदर्य तो मांडत जातो. या साऱ्यातून त्याचा त्यांच्यावर किती जीव जडलाय, हे उलगडत जातं.

नारबाला पशू-पक्ष्यांचा असा आणि इतका लळा का लागला? त्याचं कारण आहे, नारबाचं एकटेपण. त्याला आई-बाप, बहीण-भाऊ, बायको-पोरं कुणीच नाही. तो एके ठिकाणी म्हणतो, ''ईस साल झाली. सारा जलम हितं चाललाय आणि कोण असता, तर दोनाचं चार हात करून दिलं असतं... मला काय बी मन नसंल? पाडीच्या फऱ्यांचा दोन दिस जाळ व्हायला लागलाय. ढोरांसारखं ढोर. पर तिचं ते मन थंड करून आणावं लागतं. माझं जलमभर काय हुईत असंल?' पाडी ओपंला झाली होती. तिला पाडा दाखवायला हवा होता. ते सारं वर्णन करताना नारबाचं एकलेपणाचं दुःखही भळभळत वाहत राहतं. या एकाच प्रसंगात नव्हे, तर जागोजागी वेगवेगळ्या प्रसंगी, वेगवेगळ्या निमित्तानं नारबाची एकलेपणाची जाणीव पाझरत राहते. कासव, कोंबडा, घोडा हेही त्याच्यासारखेच एकटे. कोंबडा, घोडा यांच्यासाठी जोडीदार आणायला तो मालकाला सांगतो. पण मालक त्याचं बोलणं उडवून लावतो. कासवाबद्दल तो म्हणतो, हिरीचा जीव जपल्यागत त्याला जपलं हुतं. आपण एकटे आणि कासवही एकटंच. त्यामुळे ते आपल्याबरोबर हिंडतय, असं त्याला वाटायचं.

नारबा अतिशय भोळभाबडा आहे. मालक ट्रॅक्टर घेणार असतो. 'ढोरागुरांची शेती काय खरी नव्हं बघ नारायणा...' असं मालक म्हणतो तेव्हा

नारबा भाबडेपणानं म्हणतो, ''म्हणजे बैलास्नी मोठा इस्वाटा मिळणार म्हणा!'' पण मालक बैलं, रेडं काढून टाकायचं म्हणतो आणि नारबाला पोटात शिंग घुसल्यागत वाटतं. आपल्या भाबड्या स्वभावामुळेच मालक सुरुवातीला लग्न करून देतो, म्हटल्यावर त्यानं विश्वास ठेवलेला असतो.

नारबा एकटा आहे. त्याचा वावर सततचाच भोवतालच्या जनावरांमध्ये आहे. त्यामुळे जनावरांचे स्वभाव, सवयी त्याला माहीत आहेत. रेड्यांचा वास वैरणीला लागला की बैलं ती खाईत नाहीत हे तो सांगतो. बैलांना पाणी फक्त पिण्यापुरतं हवं, तर रेड्यांना पाण्याची इतकी आवड की नुसतं अंगावर पाणी पडलं, की पुरं. चारा नाही दिला तरी चालंल; जलमभर तस्सं मालकासाठी राबतील, असं म्हणतो. औताची बैलं माळाला चरणार नाहीत. तोडून आणलेली वैरण बसल्या जागी खातील, हे निरीक्षण तो नोंदवतो.

नारबाचं मन अतिशय संवेदनशील आहे. सशाच्या शिकारीनं आनंद वाटेल, म्हणून तो लालमा आणि त्याच्या पोरांबरोबर जातो; पण प्रत्यक्षात त्याला त्याचा आनंद होत नाही. कारण तो प्राण्यांचं दुःख वेदना पाहू शकत नाही. एकदा रेडे नांगराला जुंपले होते. एके ठिकाणी ते अडून बसले. कारण वावरात उंबराची मुळी आली होती. नारबानं आणि सित्यानं- दोघांनी त्यांना बदड बदड बदडलं. जेव्हा उंबराच्या मुळीचं लक्षात आलं, तेव्हा नारबाचा जीव कळवळला. म्हणाला, ''उनाची रख. पाठी चिंधडून गेल्या त्याच्या. आग आग हुईत असणार. जिभा बाहीर काढून गप हुबं ऱ्हायल्यात. काय बोलणार ते? माझी काय चूक न्हाई, म्हणून त्यास्नी काय सांगाय येतंय? मला तरी माझी चूक झाली, म्हणून काय ती निस्तरता येती?'' पुढे तो म्हणतो, ''इती इतीच्या तासासाठी ढोरं मरत्यात, तरी मालकाला माया फुटत न्हाई.''

मुला-बाळाचं कौतुक आई-वडलांनी सांगावं, तशाच कौतुकानं नारबा जनावरांविषयी बोलतो आणि मुलांची जशी निगराणी करावी, त्याच काळजीनं तो जनावरांची निगराणी करतो. मालकावरून ओवाळून टाकलेलं कोंबड्याचं पिल्लू नारबा काळजीपूर्वक वाढवतो. कोंबडं मोठं होत गेलं. पावसाळ्यात लाल शिरगुरी फुटू लागली. नाकाला जायशिळीची कळी आल्यागत दिसली आणि एका दिशी पाटंच बांग दिली, तेव्हा मन कसं पिकागत डवरलं, याचं वर्णन तो अतिशय आत्मीयतेनं करतो. नारबाच्या या जीव लावण्याची जाणीव मुक्या जनावरांनासुद्धा असणार. म्हणूनच कोंबडा

नारबाशिवाय दुसऱ्या कुणाला ऐकत नाही. म्हैस नारबाशिवाय दुसऱ्या कुणाला धार देत नाही.

नारबाला जनावरांबद्दल जिव्हाळा आहे. प्रेम आहे. सहानुभूती आहे. त्यांना केव्हा काय हवं, ते त्याला माहीत आहे. पण तो अगतिक आहे. तो निर्णय घेऊ शकत नाही. ते मालकांनी घ्यायचे आहेत आणि मालकाचे निर्णय हे व्यवहारी दृष्टिकोनातून घेतलेले आहेत. उन्हाळ्यात बैलांना पेंडभरडा घालायला हवा, दर वर्षीच आपण तो घालतो, असं नारबाला वाटतं. पण मालक नको म्हणतो. पावसाळा आला, की त्याला नाया वाघ्या, रेडं, म्हसरं विकून टाकायचीत. (मग त्यांच्यासाठी आता खर्च कशाला करायचा, हा मालकाचा दृष्टिकोन.) आंधळ्या घोड्याचा आता काही उपयोग नाही. म्हणून मालक त्याला वैरण घालू नको, म्हणून सांगतो. टिक्की म्हैस विकायला मालक नेऊ लागला, तेव्हा नारबा म्हणतो 'मालक ऱ्हाऊ दे की ती म्हैस. नऊ म्हैनं संपलं. आता म्हैनाभरात यील.' पण मालक व्यवहारी. तो म्हणतो, म्हणूनच पानापानांतून जागती होते. आंधळं घोडं विहिरीत पडतं तेव्हा त्याला वाचवण्याचा, नारबा आपल्या परीने खूप प्रयत्न करतो. जखमी चंपी कुत्रीची जखम बांधतो. तिला औषध पाणी करण्यासाठी जीव खालीवर करतो. उन्हात पडलेल्या म्हाताऱ्या म्हालिंया बैलाच्या अंगावर पटकूर टाकतो.

नारबा आपल्या गोतावळ्याचे, त्यातील पशू-पक्ष्यांचे नेमक्या शब्दांत सुरेख चित्र रेखाटतो. एखाद्या चित्रपटाप्रमाणे त्यांचं जीवन, त्यांची सुख-दुःखं, व्यथा-वेदना आपल्यापुढे उभ्या राहतात. कोंबडा, घोडा, नाम्या कुत्रा, सोन्या-चाण्ण्यातील फरक, त्यांची झुंज, अशी किती म्हणून शब्दचित्रं सांगावीत? छोट्या छोट्या वाक्यांतून काढलेली ही शब्दचित्रं मनात थेट उतरतात. प्रतिमांचा वापरही नेमका आणि यथार्थ आहे. लग्नाचा विषय निघाला, तशी मालक कोल्ह्यागत हसला... दिसानं पाय सोडलं... माणसांची मुंग्यांगत रांग... फुलं दिल्यागत पाट्या वरवर येत हुत्या... दोन चार पावलानं माळ हिरवा हुईत चालला हुता... राघवाच्या पिल्ल्याला नुकतीच हिरवी पख्खं फुटावीत, तसं दिसत हुतं... ढोरं आपली खुशाल दुधात गवळणी न्हायाला बसल्यागत आनंदात हुती... पाटाच्या पाण्यात किरणांच्या आंघुळी... आता किरणं पारूशीच वर आली... अंगावर येऊन मुक्यानं तापू लागली...' अशी कितीतरी वर्णनं दृश्यं प्रत्यक्षदर्शी करतात.

आंधळं घोडं विहिरीत पडतं. त्यानंतर तीन चार दिवसांनी ते मरतं.

नारबा म्हणतो, ''मेल्यावर चार दिसांनी फुगून फुटलं. त्येचा वास भवतीनं पसरला. मेल्यावरच्या गणगोतास्नी आवताण गेलं. हिरीजवळच्या पिप्परणीवर कावळं झुंडच्या झुंड येऊन बसलं. त्येंच्या बसण्यानं चिंध्या झालेली दांडगी छत्री उघडल्यागत झाड झालं. काळ्या कापडाचा एखादा तुकडा उडायचा नि हिरीत उतरायचा.'' यातच पुढं कावळे आणि एकटी आलेली पांढरी बामणी घार यांच्यातली झोंबाझोंबीही वर्णन केलीय. घोड्यात गिधाडांचा शेर नव्हता, हे सांगताना नारबा म्हणतो, ''गावात चौकशीला फौजदार येऊन जावा, तशी ती दोन-तीनदा येऊन गेली.'' नारबाला त्याचंही कारण माहीत होतं. ''विहीर भरपूर खोल. रुंदही नाही. त्यामुळे एखाद्या वेळी आत उतरता येईल, पण उडताना झपाटून वर यायला येणार नाही. त्यामुळे ते बिचारे काठावर बसून टुकून खाली बघत होतं.'' पुढे या गिधाडाचंही वर्णन नेमकेपणानं नारबा करतो... हा एकच नव्हे, यातले सारेच प्रसंग चित्रमय झालेले आहेत.

माळावर नित्यशः घडणाऱ्या जीवन-मृत्यूच्या शाश्वत नाट्याचंही असंच प्रत्ययकारी दर्शन आणखी एका प्रसंगात घडतं. सरडा नाकतोडा तोंडात धरतो. तेवढ्यात एका कावळ्याचं लक्ष त्याच्याकडे जातं. कावळ्याच्या तावडीतून बचाव व्हावा म्हणून सरड्यानं केलेली धडपड आणि अखेर कावळ्यांनी त्याच्यावर केलेली मात, हे सारं वर्णन मन हेलावून टाकणारं आहे. असाच एक प्रसंग चंपी कुत्री मरते, तेव्हाचा. तिच्यावर जीव जडवलेला नाम्या कुत्राही अन्नपाणी सोडून देतो. तिला टाकलेल्या विहिरीत तिच्या शेजारी जाऊन पडतो. चार दिवसांनी तोही मरतो. त्यांच्या मरण्यातून माशा, घारी, गिधाडं यांचं जगणं नारबा वर्णन करतो. सातव्या दिशी हलणारं पोट थंड झालं नि माशा दोघांच्या बी अंगावर थंडपणानं दाट दाट बसल्या. दुपारी गिधाडं-घारींनी दोघांची बी लुटालुट आभाळातून झडपा घालून केली. प्रत्येक प्रसंगाचा शेवट असा कारुण्यपूर्ण आहे. त्यामुळे कादंबरी केवळ शोकान्तच नव्हे, तर शोकात्मही होते.

तर अशी 'गोतावळा' ही कादंबरी. या गोतावळ्याच्या केंद्रस्थानी आहे नारबा- मळ्याचा लळा लागलेला नि जनावरांवर जीव जडवलेला. तो एके ठिकाणी म्हणतो, 'मालक मनातनं उतरला असला, तरी ढोरं जिवात गुतल्यात. मन मातीत अडकलंय. पिकापाण्याच्या नि झाडाझुडपाच्या मुळकांडागत झालंय. ही जिवात गुंतलेली ढोरं एकेक करत जातात. आंधळं

घोडं विहिरीत पडून मरतं. चंपी कुत्री जखमी होऊन मरते. शिवलिंया आधीच गेलेला असतो. कोंबडीची पिल्लं, शेरडं मालकीण विकते. गाभण पाडी जंगमाला अर्धेलीनं दिली जाते. गाय पांजरपोळात पोचवली जाते. कोंबडा मारला जातो. बैलं-रेड्यांना बाजार दाखवला जातो. माळावरचा पिंपळही तोडला जातो. नारबाचा गोतावळा असा सरता तुटताना नारबाही आतून तुटत तुटत जातो. मालकाच्या उपयुक्तवादी दृष्टिकोनाची परकाष्ठा दिसते, ती शेवटी. जनावरांच्या शेतीची आणि त्यांच्याकडून ती करून घेणाऱ्या नारबाची गरज आता संपली आहे. मालकाला आता गरज आहे ती ट्रॅक्टरनं कामं करून घेणाऱ्या ट्रॅक्टरच्या ड्रायव्हरची. म्हणून तो वर्षानुवर्षं शेतात काबाडकष्ट केलेल्या नारबालाही सुनावतो, ''ड्रायव्हरची मर्जी राखून राह्यचं तर राहा, नाही तर आपली वाट धर. तू न्हाई, उद्या दुसरा कोण तरी पाणी पाजाया येईल, पर ड्रायव्हर एकदा गेला, की पुन्ना त्या शरगावातून हितं कुणी पाय धुऊन पाणी प्यालो तरी येणार न्हाई.''

जनावरांशी अपरिहार्यपणे जोडले गेलेले कृषिविश्व आता यंत्रयुगाच्या चाहुलीमुळे उद्ध्वस्त होत जाणार, असे ही कादंबरी सुचवते. ट्रॅक्टर हा त्या यंत्रयुगाचं एक प्रतीक म्हणून या कादंबरीत अवतारला आहे. म्हणूनच रा. भि. जोशींना हे 'युगांतराचं चित्रण' वाटतं. काही तरी चांगलं साधण्यासाठी 'बरचसं चांगलं' उद्ध्वस्त करून टाकलेलं असतं आणि त्याचाच ठसा शेवटी खोल उमटतो. जे झालं त्यासंबंधी आपण फक्त विचार करत राहतो, असं ते म्हणतात.

'गोतावळा' कादंबरी आवडावी याची कारणंही खूपच आहेत. ग्रामीण भाषेचा अतिशय काव्यात्मक आणि सर्जनशील उपयोग यात आहे. कृषिजीवनाचं देखणं वर्णन यात आहे. कादंबरीचा नायक नारबाच्या एकलेपणाचं, त्याच्या मनोव्यथेचं, जनावरांविषयी त्याला वाटणाऱ्या ममत्वाचं अतिशय उत्कट आणि कारुण्यपूर्ण आविष्करण यात झालं आहे. इथं पक्ष्या-प्राण्यांचं वर्णन अशा ताकदीनं झालं आहे की त्यांना एक वेगळं आणि स्वतंत्र असं व्यक्तिमत्त्व लाभल्याचं जाणवतं. प्राणी जगताच्या सूक्ष्म निरीक्षणामुळेच हे चित्रण अत्यंत प्रभावी झालं आहे. या साऱ्यांमुळे ही कादंबरी जीवनाच्या गाभ्याला स्पर्श करते. वा.ल. कुलकर्णी म्हणतात त्याप्रमाणे या कादंबरीनं मराठी कादंबरीला एक नवं परिमाण दिलं आहे. बहुतेक वाचकांनी, निदान चोखंदळ वाचकांनी तरी ही कादंबरी वाचलेली असणारच! वाचलेली नसली, तर ती एकदा तरी वाचायला हवी!

❖

## श्रद्धांजलीपर लेख

# ग्रामजीवनाचा भाष्यकार

**– प्रशांत गौतम**



‘झोंबी’कार डॉ. आनंद यादव यांच्या निधनाने ग्रामीण साहित्यास उंची प्राप्त करून देणारे, नवोदितांच्या साहित्यास नवी उमेद देणारे व्यक्तिमत्त्व हरपले आहे. ग्रामीण कथा, कादंबरी. कवितांबरोबरच समीक्षा, ललित, वैचारिक अशा प्रांतांत त्यांनी वैविध्यपूर्ण सकस लेखन केले. त्यांनी ग्रामीण साहित्याला नवे परिमाण तर दिलेच; पण मातीशी जोडलेल्या साहित्याची नाळ, प्रामाणिकपणाही कायम ठेवला. ३० नोव्हेंबर रोजी त्यांचा वाढदिवस साजरा व्हायचा होता; परंतु नियतीच्या मनात बहुधा तसे नसावे.

कोल्हापूर जिल्ह्यातील कागल येथे एका शेतमजूर कुटुंबात ३० नोव्हेंबर १९३५ साली जन्मलेल्या डॉ. यादव यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीशी संघर्ष केला. शेतात मोलमजुरी करून वेळ मिळेल तेव्हा शालेय शिक्षण पूर्ण केले आणि लेखनाची आवडही जपली. आनंदा रत्नाप्पा जकाते हे त्यांचे मूळ नाव. शिक्षणासाठी त्यांना घरातून पाठिंबा नसला तरी प्रारंभीचे शिक्षण कोल्हापुरात जिद्दीने पूर्ण केले आणि पुढील शिक्षणासाठी पुणे गाठले. महाविद्यालयीन शिक्षण घेऊन मराठी आणि संस्कृतमध्ये एम.ए पूर्ण केले. पीएच.डी.साठी त्यांनी ‘लघुनिबंध : प्रेरणा, प्रवृत्ती व विकास’ हा विषय घेतला होता. पंढरपुरात अध्यापन, पुणे आकाशवाणी केंद्रात नोकरी आणि पुणे विद्यापीठात मराठी विभागप्रमुख म्हणून त्यांची शैक्षणिक क्षेत्रातील वाटचाल झाली.

विद्यापीठात मराठीचे अध्यापक म्हणून कार्य करण्याच्या आधीपासूनच त्यांनी ग्रामीण साहित्यातील विविध प्रांतांत लेखन सुरू केले होते. एकाच वेळी सृजनशील ग्रामीण कथाकार, कवी, कादंबरीकार, समीक्षक, ललित लेखक, बालसाहित्यकार म्हणून त्यांची ओळख साहित्याच्या जाणकार वाचकांना होत होती. असे असले तरी ग्रामीण साहित्याचे भाष्यकार ही ओळख कायम राहिली. ग्रामसंस्कृती हा त्यांच्या खास आवडीचा नि

चिंतनाचा विषय होता.

'हिरवे जग, 'मळ्याची माती', 'माय-लेकरं' हे कविता आणि दीर्घ कवितासंग्रह. 'खळाळ', 'घरजावई', 'माळावरची मैना', 'आदिताल', 'डवरणी', 'उखडलेली झाडे' हे कथासंग्रह. 'गोतावळा', 'नटरंग', 'एकलकोंडा', 'माऊली' या कादंबऱ्या. 'मातीखालची माती' (व्यक्तिचित्रं), 'स्पर्श कमळे,' 'पाणभवरे', '१९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह' यासारखे ललित, वैचारिक समीक्षासंग्रह, 'उगवती मनं' (बालकथा), 'ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव,' 'ग्रामीण साहित्य : स्वरूप आणि समस्या,' 'मराठी साहित्य : समाज संस्कृती,' 'मराठी लघुनिबंधाचा इतिहास' अशी साहित्यसंपदा सांगता येते.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे त्यांचे या सर्व प्रदीर्घ प्रवासाचे चिंतन, आकलन, अवलोकन मांडणारे आत्मकथन. १९८७ मध्ये त्यांचे 'झोंबी' हे आत्मकथन प्रकाशित झाले. 'झोंबी' या आत्मचरित्रपर लेखनामुळे त्यांची ओळख देशभरात पोहोचली. १९९० साली या आत्मकथनाचा सन्मान साहित्य अकादमी या पुरस्काराने झाला. त्यांचे आत्मकथन पुढे 'नांगरणी', 'घरभिंती', 'काचवेल' या शीर्षकाच्या तीन खंडांतून विस्ताराने आले.

'नटरंग' ही त्यांची वास्तव कादंबरी. ती गाजली आणि त्यावर निघालेला चित्रपटही गाजला. प्रादेशिक, विभागीय, कामगार, समरसता, दक्षिण महाराष्ट्र साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद डॉ. यादव यांनी भूषविले. आदिवासी, दलित, ग्रामीण संमेलन असो, की जनसाहित्य संमेलन असो, संमेलनाचे अध्यक्षपद त्यांना सन्मानाने प्राप्त झाले; पण महाबळेश्वर येथे भरलेल्या ८२व्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद बहुमताने निवडून येऊनसुद्धा गमवावे लागले. कारण संत तुकारामांवरील 'संतसूर्य तुकाराम'या कादंबरीतील काही आक्षेपार्ह मजकूराने त्यांचे अध्यक्षपद वादात सापडले. वारकऱ्यांचा विरोध. त्यांची भावना खूप तीव्र होती. त्याचा सन्मान करीत डॉ. यादव यांनी अध्यक्षपदावर पाणी सोडले. परिणामी अध्यक्षांशिवाय पार पडलेले साहित्य संमलेन अशी महाबळेश्वरच्या साहित्य संमलेनाची इतिहासात नोंद झाली. यादवांनी माफी मागितली. पुरस्कार मागे घेतले तरीही तो वाद धगधगतच राहिला. संमेलनाच्या निमित्ताने निर्माण झालेल्या वादामुळे डॉ. आनंद यादव नको तितके चर्चेत आले.

या सर्व साहित्यबाह्य बाबींमुळे त्यांच्या लेखनाचे महत्त्व काही कमी होत

नाही. स्वत: एक लेखक असतानाही ते नव्या पिढीच्या सदैव पाठीशी राहिले. नव्या लेखकाचे लेखन मग ते कोणत्याही साहित्य प्रकारातले असले तरी त्या लेखनाला उभारी देण्याचे काम त्यांनी केले. 'झोंबी', 'गोतावळा' यासारख्या महत्त्वाच्या कादंबरी लेखनातून त्यांनी खेड्याची संकल्पना मांडली व ती अटकेपार नेली. 'गोतावळा', 'नटरंग'सारख्या कादंबऱ्या ग्रामीण साहित्यात माईलस्टोन ठरल्या. डॉ. यादव यांच्या साहित्यकृतींचे कन्नड, उर्दू, हिंदी, तेलगु, इंग्रजी, जर्मन अशा भाषांतून अनुवाद झाले व सर्वदूर पोहोचले.

साहित्य अकादमीचा राष्ट्रीय पुरस्कार, राज्य शासनाचे चौदा पुरस्कार त्यांना लाभले होते. डॉ. यादव यांच्या निधनाने ग्रामीण साहित्याचा एक भाष्यकार काळाच्या पडद्याआड गेला आहे.

**– (साभार)**
**दैनिक सामना**

❖








# ‘झोंबी’चा विराम!

डॉ. आनंद यादव यांच्या निधनामुळे एक संघर्षशील व्यक्तिमत्त्व काळाच्या पडद्याआड गेले आहे. मराठी साहित्यामध्ये ग्रामीण साहित्य प्रवाहाची स्वतंत्र ओळख निर्माण करण्यामध्ये यादवांचे मोठे योगदान आहे. स्वातंत्र्यानंतरच्या दोन दशकांपर्यंत खेड्यात जन्मलेल्या लिहिणाऱ्या तरुणांना आत्मभान देण्याचे काम यादव यांच्या नेतृत्वाखालील ग्रामीण साहित्य चळवळीने केले. ग्रामीण साहित्याचा प्रवाह आज मराठी साहित्यातला मध्यवर्ती प्रवाह बनला आहे, त्याचे निःसंशय श्रेय यादवांना जाते. स्वातंत्र्याच्या पुढे-मागे जन्मलेल्या खेड्यातील प्रत्येक तरुणाला शिक्षणासाठी, जगण्यासाठी तीव्र संघर्ष करावा लागला, त्या पिढीचे आनंद यादव हे प्रतिनिधी होत. ‘झोंबी’ या आत्मचरित्रात्मक कादंबरीतून त्यांचा हा संघर्ष मराठी वाचकांपुढे आला आणि खेड्यातल्या शिकणाऱ्या मुलांसाठी तो प्रेरणादायी बनला. अत्यंत हलाखीची कौटुंबिक स्थिती, अडाणी आई-वडिलांचा शिकण्यासाठी असलेला विरोध, अशा प्रतिकूल परिस्थितीवर मात करून त्यांनी शिक्षण घेतले. पुढे नोकरीसाठी, साहित्य क्षेत्रात आपली ओळख निर्माण करण्यासाठी, असा प्रत्येक टप्प्यावर त्यांना संघर्ष करावा लागला. ग्रामीण साहित्याची चळवळ सुरू करतानाही त्यांना शहरी पांढरपेशा वर्गाच्या विरोधाचा सामना करावा लागला. आपल्या क्षेत्रात नाव मिळाल्यानंतर आणि नोकरीत स्थिरस्थावर झाल्यानंतर बहुतेकांच्या आयुष्यातल्या संघर्षाला पूर्णविराम मिळतो; परंतु यादवांच्या आयुष्यात असा पूर्णविराम कधीच आला नाही. आयुष्याच्या उत्तरार्धात ‘संतसूर्य तुकाराम’ कादंबरीच्या निमित्ताने निर्माण झालेला वाद आणि साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदाचा राजीनामा, इथपर्यंत त्यांचा संघर्ष सुरू राहिला. या संघर्षाच्या पलीकडे मराठी साहित्य क्षेत्रात त्यांचे योगदान खूप मोलाचे आहे. झोंबी, नांगरणी, घरभिंती आणि काचवेल हे आत्मचरित्रात्मक कादंबऱ्यांचे चार खंड

ही तशी अलीकडची गोष्ट. त्याआधी खळाळ, उखडलेली माणसं यांसारख्या कथासंग्रहातील कथा; मातीखालची माती संग्रहातील व्यक्तिचित्रे; गोतावळा, नटरंग, माउलीसारख्या कादंबऱ्या लेखक म्हणून त्यांचे श्रेष्ठत्व सिद्ध करण्यासाठी पुरेशा आहेत. यादवांनी साहित्यातून खेड्यातल्या माणसांचे दुःख, दैन्य, दारिद्र्य वाचकांसमोर आणले. व्यंकटेश माडगूळकर, शंकर पाटील, द.मा. मिरासदार अशा आधीच्या पिढीतील दिग्गज ग्रामीण लेखकांचा प्रभाव ओलांडून स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली. महात्मा जोतिबा फुले यांचे विचार हेच ग्रामीण साहित्य चळवळीचे प्रेरणास्थान मानणाऱ्या यादव यांना उत्तरायुष्यात वैचारिक भूमिकेवर मात्र ठाम राहता आले नाही. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद ही त्यांच्यासारख्या मोठ्या लेखकासाठी खूप छोटी गोष्ट होती. परंतु त्यासाठी ते वैचारिक तडजोडी करू लागले. राष्ट्रीय स्वयंसेवक संघाशी संबंधित समरसता साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद स्वीकारल्यानंतर लेखक म्हणून ते एकटे पडत गेले. त्याचमुळे 'संतसूर्य तुकाराम'च्या निमित्ताने उभ्या राहिलेल्या संघर्षात त्यांच्या बाजूने फारसे कुणी लेखक उभे राहिलेले दिसले नाहीत. चूक मान्य करून, कादंबरी मागे घेऊन, तुकोबांच्या चरणी नतमस्तक झाल्यानंतरही वारकऱ्यांनी त्यांना माफ केले नाही. त्यांना संमेलनाध्यक्षपदाचा राजीनामा द्यायला लावला. संमेलनाध्यक्षांच्या यादीत त्यांचे नाव कायमचे कोरले गेले आहे, आणि त्यांचे अध्यक्षपद उधळून लावणाऱ्या वारकऱ्यांची असहिष्णुताही!

**(साभार)**

**महाराष्ट्र टाइम्स**

❖

**४थी आवृत्ती**




# उगवती मने

## आनंद यादव

**किंमत : १६०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

मानवी जीवनात 'मूल' या घटनेला एक अजोड स्थान आहे. वंश-सातत्याचं मूळ रुजणं म्हणजे मूल असणं. मूळ म्हणजेच मूल. ते असेल तरच संसार-वृक्ष बहरतो, फुलतो आणि फळाला येतो. नसेल तर कोमेजतो, वाळतो, निष्पर्ण होऊन शेवटी नष्ट होतो. मूल असणं म्हणजे स्वत:च पुन्हा नव्यानं जन्माला येणं. नवं शरीर, नवं मन घेऊन पुन्हा जगण्यास प्रारंभ करणं. कुणाचं तरी आई-बाप, बहीण-भाऊ होऊन जगणं, हे आपल्या सड्याफटिंग, एकट्या जगण्यापेक्षा किती वेगळं असतं, याचे पडताळे येऊन आपण रसिक इथं थरारून जातो; समृद्धही होतो.

घरादारातील, आसपासची, निरनिराळ्या थरांतील, विविध परिस्थितीतील लहान मुलं, त्यांच्या भावभावना, त्यांचं स्वैरमुक्त, अजाण वर्तन अनुभवताना जसं आपलं प्रौढमन चक्रावून जातं; तसंच ते बालरूप घरात नसल्यानं, संसारात न आल्यानं, किंवा त्याची जोपासना करणारं बाईमाणूस घरात नसल्यानं प्रौढमनांची कासाविसी किती तऱ्हांनी, किती चित्रविचित्र पद्धतींनी होते, हेही पाहण्यासारखं असतं.... या पुस्तकात त्याचं दर्शन घडतं.

...उगवतं बाल मन प्रौढमनाला खूप काही शिकवू शकतं. प्रौढमनाला नवं वळण देऊ शकतं, याचेही अनुभव जीवनात भरपूर येतात.

....बाल मनाचंही एक स्वतंत्र, समृद्ध विश्व असतं. पण याची जाणीव प्रौढमनाला फार क्वचित असते.




# नव्या जाणिवांचा वाटसरू

साहित्यात मराठी मातीतील वास्तव मांडण्याचे भान व्यंकटेश माडगूळकर यांच्या 'बनगरवाडी'ने दिले खरे; पण त्या बरोबरीनेच द. मा. मिरासदार, शंकर पाटील यांच्यासारख्या दमदार साहित्यिकांनी त्यात भर घालायला सुरुवात केली आणि मराठी वाचकाला ग्रामीण विश्वानेही भुरळ घातली. हे साहित्य काल्पनिक किंवा किस्सेवजा कथांतच कुंठत असताना पुढच्या पिढीने त्यात नव्या संवेदनांची भर घालण्यास प्रारंभ केला. त्यामध्ये आनंद यादव यांचे नाव अटळपणे घ्यायला हवे. कोल्हापूरजवळील कागल गावाहून शहरात आलेल्या यादवांनी आपल्या मातीशी असलेली नाळ कधीच तुटू दिली नाही. 'गोतावळा' या त्यांच्या कादंबरीने साहित्य विश्वाचे लक्ष वेधून घेईपर्यंत त्यांनी कथा, कवितांचा आकृतिबंध हाताळलेला होता. एका मोठ्या पटावर आपली सकसता तपासण्याची संधी त्यांना 'गोतावळा'मुळे मिळाली आणि त्यानंतरच्या 'नटरंग', 'झोंबी', 'काचवेल' यांसारख्या त्यांच्या साहित्यकृतींनी मराठी वाचकाला काही नवे आणि दमदार वाचायला मिळाले. मराठी साहित्यातील ग्रामीण संबंध अधिक ठळक करण्यासाठी ज्या साहित्यिकांची नावे आवर्जून घ्यायला हवीत, अशांच्या यादीत यादव आपोआप जाऊन बसले. स्वातंत्र्यपूर्व काळातील ग्रामीण साहित्यापेक्षा यादवांच्या पिढीतील लेखन वेगळे होते, कारण त्यात वास्तवतेचे भान होते. ग्रामीण निसर्गवर्णनापेक्षा, तेथील जगण्याला असलेली दुःखाची किनार आणि दाहकता लक्षात येण्यास बनगरवाडीतील व्यक्तिमत्त्वे समोर येत होती आणि नव्या लेखकांना एक नवी पायवाटही दाखवीत होती. उद्धव शेळके यांची 'धग' त्याच काळातील. रा.रं. बोराडे यांच्यासारख्या लेखकास 'सत्यकथा'च्या मांडवात जाऊन बसण्याचा मानही त्याच सुमारास मिळाला. हे सारे घडत होते, साठच्या दशकानंतर. या साहित्याची चिकित्सा करण्यास डॉ. भालचंद्र फडके यांनी सुरुवात केली आणि हे साहित्य समीक्षेच्याही

परिघात येऊन ठेपले. तोपर्यंत साहित्यातील नैतिकतेलाही या ग्रामीण साहित्याने प्रश्नचिन्हांकित केले होते. स्वाभाविकच आनंद यादवांसारखे नव्या दमाचे लेखक भाषेच्या वेगळ्या वाटा-वळणे शोधू लागले. केवळ सत्यकथनापलीकडे जाऊन त्यातील कलात्मक मूल्यांनाही जपण्याचे हे भान त्यांच्यासारख्या साहित्यिकांनी दिले, हे नाकारता येणार नाही. अध्यापनाच्या क्षेत्रात आलेल्या यादवांनी, 'ग्रामीण साहित्य : स्वरूप व समस्या' आणि 'मराठी साहित्य : समाज आणि संस्कृती' यांसारख्या पुस्तकांच्या रूपाने समीक्षालेखनही केले. चार कवितासंग्रह, दहा कथासंग्रह, पाच लेखसंग्रह, सात कादंबऱ्या, आत्मचरित्राचे चतुष्टक, आठ समीक्षात्मक पुस्तके असे लेखन त्यांच्या नावावर जमा झाले. साहित्यात रुळू लागलेल्या ग्रामीण साहित्याला वेगळी चूल मांडावीशी वाटल्यानंतर सुरू झालेल्या विविध ठिकाणच्या पाच ग्रामीण साहित्य संमेलनांचे अध्यक्षपद यादव यांना मिळाले. मध्यमवर्गीय संवेदनांच्या बाहेर जाऊन साहित्यात नंतर येऊ घातलेल्या दलित साहित्याला यादव यांच्यासारख्या लेखकांनी मार्ग दाखवण्याचे काम केले आणि नंतरच्या काळात त्याला मोठा प्रतिसादही मिळाला. वाद ओढवून घेणे हे त्यांच्यासाठी नित्याचे होते, असे म्हणायला हवे. व्यंकटेश माडगूळकर यांची 'सत्तांतर' ही कादंबरी हे वाङ्मयचौर्य आहे, अशी टीका केल्यानंतर यादवांवर अब्रुनुकसानीचा दावा करण्यात आल्यावर त्यांना माघारही घ्यावी लागली. महाबळेश्वर येथील अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळाल्यानंतरही त्यांच्या 'संतसूर्य तुकाराम' या कादंबरीतील कल्पनाविलासाला जाहीरपणे विरोध झाला. तो एवढ्या टोकाचा होता, की त्यामुळे यादव यांना संमेलनाचे अध्यक्षपदही भूषवता आले नाही. माफीनाम्यानेही हा विरोध पूर्णपणे मावळला नाही. तमीळ लेखक पेरुमलमुरुगन यांची 'साहित्यिक आत्महत्या' न्यायालयाने मागे घ्यावयास लावली, पण यादव 'लेखनसीमा' जाहीर केल्यानंतरही ते साहित्यजगात आणि व्यक्तिगत पातळीवरही एकटेच राहिले. वादांचा त्यांच्या जगण्यावरही विपरीत परिणाम झाला. त्यांच्या निधनाने मराठी साहित्याच्या विश्वात नव्या जाणिवा जागृत करणारा लेखक आपल्यातून निघून गेला आहे.

**(साभार)**

**दैनिक लोकसत्ता**



# साहित्याच्या विविध प्रकारांत मुशाफिरी


'झोंबी'कार आनंद यादव यांनी काव्य, कथा, कादंबरी, समीक्षा, ललित अशा विविध साहित्य प्रकारात मुशाफिरी केली. अव्वल दर्जाचा ग्रामीण लेखक म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाई. अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी निवड होऊनही संमेलनाध्यक्षपद भूषविता न आलेले ते एकमेव साहित्यिक ठरले.

आनंद यादव यांचा जन्म ३० नोव्हेंबर १९३५ रोजी कोल्हापूर जिल्ह्यातील कागल या गावी झाला. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीत, घरातून विरोध असताना आणि प्रसंगी शेतात मजुरी करून त्यांनी आपले शालेय शिक्षण पूर्ण केले. मराठी आणि संस्कृत भाषेत त्यांनी पदवी मिळवली. 'मराठी लघुनिबंध : प्रेरणा, प्रवृत्ती व विकास' या विषयात त्यांनी सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातून पीएच.डी. मिळवली. प्रारंभी पंढरपूर येथे अध्यापन आणि आकाशवाणी केंद्रावर नोकरी करून त्यांनी दीर्घ काळ विद्यापीठात मराठी विभागप्रमुख म्हणून जबाबदारी सांभाळली. ग्रामीण साहित्य संमेलन, समरसता साहित्य संमेलन आदी संमेलनांचे अध्यक्षपद त्यांनी भूषवले. महाबळेश्वर येथे सन २००९ मध्ये झालेल्या साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद त्यांना भूषविता आले नाही. यादव यांनी संत तुकाराम महाराजांच्या जीवनावर लिहिलेल्या 'संतसूर्य तुकाराम' या कादंबरीवर आक्षेप घेण्यात आल्याने अध्यक्षपद स्वीकारण्यापूर्वीच त्यांना राजीनामा द्यावा लागला. कादंबरीतून तथाकथित आक्षेपार्ह मजकूर काढून टाकल्यानंतरही विरोध कायम राहिल्याने पुस्तक मागे घेण्यात आले. 'लोकसखा ज्ञानेश्वर' या पुस्तकामुळेही गोंधळ झाला. मराठी साहित्य पत्रिकेचे संपादक, राज्य

मराठी विकास संस्था, जागतिक मराठी साहित्य अकादमी या संस्थांचे कार्यकारिणी सदस्य, मराठी साहित्य परिषदेचे उपाध्यक्ष, ‘विचारभारती’चे संपादक अशा विविध जबाबदाऱ्या त्यांनी पार पाडल्या.

**महाराष्ट्र टाइम्स**


❖











# अस्सल ग्रामीण साहित्यातून 'आनंद' देणारा साहित्यिक

'झोंबी या आत्मचरित्रपर कादंबरीमुळे डॉ. आनंद यादव यांची ओळख संपूर्ण देशाला झाली. 'झोंबी'ला १९९० मध्ये साहित्य अकादमीचा पुरस्कार प्राप्त झाला होता. नांगरणी, घरभिंती, काचवेल, गोतावळा, नटरंग, झाडवाटा, उगवती मने यासह त्यांची अनेक पुस्तके लोकप्रिय झाली. 'नटरंग' या त्यांच्या कादंबरीवर काही वर्षांपूर्वी त्याच नावाचा मराठी चित्रपट प्रदर्शित झाला होता.

डॉ. यादव यांचा जन्म कोल्हापूर जिल्ह्यामध्ये कागलचा. आनंदा रत्नाप्पा जकाते हे त्यांचे मूळ नाव. अत्यंत गरीब कुटुंबातील यादव यांना शिक्षणासाठी घरून पाठिंबा नव्हता. त्यामुळे यादव यांनी सुरुवातीचे शिक्षण कोल्हापूर येथे पूर्ण करून पुढील शिक्षणासाठी पुणे गाठले. शिक्षणाचा ध्यास घेतलेल्या डॉ. यादव यांना सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठात प्रपाठक म्हणून काम करण्याची संधी लाभली; तसेच, विद्यापीठाच्या मराठी विभागाचे प्रमुख म्हणून ते निवृत्त झाले. महाबळेश्वर येथे २००९ मध्ये झालेल्या ८२व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाच्या अध्यक्षपदी डॉ. यादव यांची निवड झाली होती. याच दरम्यान त्यांनी लिहिलेल्या 'संतसूर्य तुकाराम' या त्यांच्या कादंबरीवरून वाद उद्भवला. या पुस्तकात संतश्रेष्ठ तुकारामांविषयी अनुचित मजकूर असल्याचा आरोप करत वारकरी संप्रदायाने डॉ. यादव यांना तीव्र विरोध केला. देहू येथे जाऊन डॉ. यादव यांनी पुस्तक मागे घेतल्याचे जाहीर केले होते. तरीही, त्यांना संमेलनात अध्यक्षपदाची सूत्रे स्वीकारता आली नाहीत. काम करण्याआधीपासूनच त्यांनी लेखन सुरू केले होते. ग्रामीण साहित्य, ग्रामसंस्कृती हे त्यांच्या आवडीचे विषय होते. ग्रामीण साहित्याला ओळख निर्माण करून देण्यात डॉ. यादव यांचा महत्त्वाचा वाटा होता.

**(साभार)**

**महाराष्ट्र टाइम्स**

**४थी आवृत्ती**




# आदिताल

**आनंद यादव**

**किंमत : १७०/-रु. । पोस्टेज :५०/-रु.**

'पृथ्वीवर येणाऱ्या युगारंभीच्या पहिल्या वसंत ऋतूच्या पाऊल-स्पर्शासारखी ती त्याला भासली.
तिचं धडधडतं हृदय त्याच्या कानापाशी होतं...
जगाच्या आरंभी सुरू झालेला ताल.
काळाला स्पर्श करत सतत युगानुयुगे सनातनपणे चाललेला धिनतिक.
या तालातूनच निर्माण झालेली सृष्टीची लयकारी...
त्याला आदिताल सापडल्यासारखं वाटलं.'

# प्रतिक्रिया

## ग्रामीण साहित्याचा आधारवड

### डॉ. आनंद यादव यांना मान्यवरांची श्रद्धांजली



**Devendra Fadnavis** @Dev_Fadnavis · Nov 27
ते ग्रामीण महाराष्ट्र व शेतकरी जीवनातील सुखदु:खांशी एकरुप झालेले लेखक,जीवनही संघर्षाने भरलेले.
अशा थोर साहित्यिकास माझी विनम्र श्रद्धांजली!

4 44 189



**Devendra Fadnavis** @Dev_Fadnavis · Nov 27
ग्रामीण व शेतकरी जीवनाचे आपल्या साहित्यात प्रभावी चित्रण करणारे,तेथील संक्रमणाचे भाष्यकार डॉ आनंद यादव यांची उणीव मराठीसाहित्याला सतत जाणवेल

5 63 329



**Vinod Tawde** @TawdeVinod · Nov 27
सामाजिक समरसतेवर भर देणारे ज्येष्ठ साहित्यिक आनंद यादव यांच्या निधनाने आपण सिद्धहस्त लेखक गमावला आहे. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.

4 130 97

‘अनेक कार्यक्रमांच्या निमित्ताने डॉ. आनंद यादव यांचा सहवास लाभला. त्यांना व्यासपीठावर नाही, तर प्रेक्षकांमध्ये बसलेले पाहिले आहे. त्यांचा स्वभाव निगर्वी होता. ग्रामीण भागाशी त्यांची नाळ जोडलेली होती. विद्यापीठामध्ये त्यांनी अनेक वर्षे हौसेने शिकवले.

**– गिरीश बापट, पालकमंत्री**

यादव यांचे ग्रामीण साहित्य केवळ शाब्दिक खेळ नव्हता. ग्रामीण साहित्य त्यांनी शब्दांमधून खऱ्या अर्थाने फुलवले. ग्रामीण साहित्य हे विनोदाच्या अंगाने मांडले गेले; पण डॉ. यादव यांच्या साहित्यातून ग्रामीण भागात असलेले वास्तव अनुभवायला मिळते. त्यांना साहित्य संमेलनाचे अध्यक्षपद मिळूनही भूषविता आले नाही. त्यांच्या निधनाने ग्रामीण साहित्याची हानी झाली आहे.

**–उल्हास पवार, माजी आमदार**

डॉ. आनंद यादव ग्रामीण भारताचे हितचिंतक आणि साहित्य संस्कृतीचे प्रगल्भ लेखक होते. त्यांची ग्रंथसंपदा त्यांच्या अव्वलतेची साक्ष देते. साहित्याला संस्कृती आणि मानवतेच्या धाग्यात गुंफण्याचे, सर्व संस्कृती एकात्मतेचे दर्शन घडवण्याचे श्रेय त्यांना जाते. संमेलनाध्यक्षपदाच्या निवडणुकीत लोकशाही मार्गाने निवडून आलेल्या यादव यांना खुर्चीवर बसण्याचा मान महाराष्ट्राने दिला असता तर महाराष्ट्र संस्कृती श्रेष्ठ ठरली असती.

**–डॉ. श्रीपाल सबनीस, साहित्य संमेलनाध्यक्ष**

ग्रामीण साहित्याचा प्रारंभ डॉ. आनंद यादव यांच्यामुळे झाला. झोंबी, नांगरणी हे त्यांचे आत्मकथनपर साहित्य उत्कृष्ट ठरले. डॉ. यादव यांचे ग्रामीण साहित्यातील योगदान चिरकाल स्मरणात राहील.

**–डॉ.नागनाथ कोत्तापल्ले,ज्येष्ठ लेखक**

आपण खऱ्या अर्थाने भूमिपुत्र गमावला आहे. यादव यांनी सर्व प्रकारचे लेखन केले. ते संमेलनाध्यक्ष झाले; पण त्यांना ते पद भूषविता आले नाही, याचे दुःख आहे.

**—प्रा. द. मा. मिरासदार,ज्येष्ठ लेखक**

ज्या क्षेत्रात मी काम करतोय त्यात डॉ. यादव यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळत होते. मराठवाड्याच्या कोनाकोपऱ्यात माझ्याबरोबर आलेले ते पहिले साहित्यिक होते. व्यक्तिगत जीवनातील वडीलकीचा आधार हरपला आहे. सामाजिक क्षेत्रातील आधारवड कोसळला आहे.

**—गिरीश प्रभुणे, ज्येष्ठ लेखक**

ग्रामीण भागातील तरुण मोठ्या प्रमाणात शहराकडे वळत होता. त्यांची घुसमट होत होती; ती घुसमट डॉ. यादव यांनी आपल्या लेखणीतून मांडली. ग्रामीण भागाचे लिखाण हे विनोदाचे किंवा तुच्छतेचे समजले जाई; पण, यादव यांनी लेखणीतून ग्रामीण भागातील वेदना मांडल्या. सर्जनशील साहित्यिकाची भूमिका निभावताना त्यांनी कार्यकर्तेपणही जपले.

**—प्रा. मिलिंद जोशी,मसाप अध्यक्ष**

मेहता पब्लिशिंग डॉ. आनंद यादव यांच्यामुळे उभी आहे. त्याचे श्रेय डॉ. यादव यांना जाते. त्यांचा कथासंग्रह 'माळावरची मैना' मेहता पब्लिशिंगने प्रसिद्ध केला, तेव्हापासून ऋणानुबंध होता. आधारस्तंभ आणि मित्र हरपला आहे.

**—अनिल मेहता, संचालक, मेहता पब्लिशिंग हाऊस.**

**(साभार) महाराष्ट्र टाइम्स**

आनंद यादव व्यक्ती म्हणून आणि माणूस म्हणून श्रेष्ठ होते. त्यांचा माझा परिचय जरी फार कमी प्रमाणात असला तरी त्यांच्याविषयी आमचे बोलणे होत असे. त्यातून ती व्यक्ती समजायला मला मदत झाली. त्यांच्या 'तुकाराम'या पुस्तकाने त्यांना खूप काळ मानसिक त्रास सोसावा लागला.

**–मृणालिनी सावंत, लेखिका**

'यादव सरांच्या 'झोंबी' पुस्तकाच्या मुखपृष्ठाचे काम माझ्याकडे आले. ते माझे खूप मोठे भाग्य होते. प्रत्येक पुस्तकावर रीतसर चर्चा लेखक आणि चित्रकारांदरम्यान व्हावी, अशी त्यांची धारणा असे. चांगले साहित्य आणि चित्र याची कशी सांगड घालता येऊ शकते, यावर आमची तास न् तास चर्चा व्हायची.

**– चंद्रमोहन कुलकर्णी, चित्रकार**

'नटरंग' या कादंबरीवरून तमाशाप्रधान चित्रपट बनला आणि मराठी चित्रपटसृष्टीत हा चित्रपट मैलाचा दगड ठरला.

**–सुनील महाजन, संवाद, पुणे**
**(साभार) दै.लोकमत**

# 'आनंद' स्मृती



विचारांना शब्दरुप देणारं स्थळ




जिवाभावाचं मैत्र : अनिल मेहता-आनंद यादव



पुस्तकांच्या उंचीचा माणूस...



मित्रवर्य गिरीश प्रभुणे आणि आनंद यादव



पुस्तकांच्या सान्निध्यात साहित्ययात्री...



अमृतमहोत्सवी सत्कार...



# कथा : आनंद यादवांची

## माळावरची मैना

सोपानराव बारा गावच्या पाण्यावर पोसला होता. त्यामुळं कागलच्या रूपचंद शेटजीला टांग मारायला त्याला उशीर लागला नाही. त्याच्या हातातनं बघता बघता त्यानं रूपवान सोना नायकिणीला काढून आणली नि आंबेगावच्या माळावर असलेल्या आपल्या खास दगडी घरात ठेवली. तीन-चार महिने मजेत गेले. सोनानं स्वत:बरोबर कागलच्या शेटजीनं घातलेले सोन्याचे बरेच दागिनेही आणले होते. त्यामुळं शेटजी सोपानरावाला पाण्यात पाहत होते. पण सोपानरावही हलका नव्हता. त्यानं जिल्ह्यात अनेक कारणांनी गाजलेल्या गुरव जमादाराला आणि त्याच्याबरोबर बंदुकीप्रमाणं नेम साधून काम करणाऱ्या चंद्या पोलिसाला हाताशी धरलं.

पण आता गावात अनेकांना पोटभर खाऊ घालणारा सोपानरावच उपाशी पडायची पाळी आली होती. तेल आणि तूपही जाऊन हातात फक्त धुपाटणंच राहतंय की काय, अशी वेळ आली होती... पोलीस जमादारांना आजपर्यंत चारलेला मलिदा फुकटच जाणार होता. कारण आता घरातल्या लोण्याच्या गोळ्यावरच ह्या बोक्यांनी डोळा ठेवला होता.

आंबेगावावर छापे घालायला म्हणून हे दोघेजण आरंभी येत होते. कारण गावच्या वस्तीकडच्या ओढ्यात बारके बारके साखर कारखाने चालल्यागत दिसायचे. सबंध दीड-एक मैलावर ओढ्याला धूरच धूर. पण इथं आंबलेला गूळ शिजायचा. गावापासनं दीड-एक मैलावर ओढा. भोवतीनं फडं नि घाणेरी भरपूर वाडलेली. शिंदीची झाडंही बनागत लागलेली. दोन जुनाट वड आणि पिंपळ कुठल्या काळात उगवले होते कुणास ठाऊक! भले प्रचंड होते. वडाचा विस्तार अर्ध्या एकरात झालेला. पिंपळाची उंची तर इतकी की त्याच्यावर साताठ आघ्यामोहळं गेली दहा-बारा वर्षं निर्धास्तपणानं वस्ती करून होती. ढोलीत इजटं नि खोकटं खॉय खॉक करून रात्रभर ओरडायची... सगळ्या गावातली आठ-दहा पिढ्यांची भुतं ह्या झाडावर राहतात असा समज दहा-वीस मैलांवर पसरलेला. हा समज जास्तच पसरेल

अशी लोकांनी सोयही केली होती. याचा फायदा घेऊन रॉकेलचे डबे, बॅरल, फुटबॉल, आणि सायकल-मोटारींच्या ट्यूब्स, आंबलेला गूळ, बाभळ-जांभळीच्या साली यांच्या आधारानं हे कारखाने पेटलेले. लांब लांब नळ्यांतून थेंब थेंब धरत बसलेले. सगळ्या जिल्ह्याला पुरं होईल इतकं कडक पाणी तयार होत होतं. बराच कामगारवर्ग ह्याच रातपाळीत मग्न होऊन गेला होता.

ह्यांच्यावर अचानक छापे घालण्यासाठी ह्या पोलीस– जमादारांची नेमणूक झालेली. दोघेही ह्या कामातले अर्क. हाग्या दम नि मार देऊन गुन्हे कबूल करून घेण्यात ह्यांचा हात कोणी धरू शकणार नाही. म्हणून नेमणूक केलेली. पोलिस-जमादार पाठीमागं नि हातभट्ट्या पुढं असा आट्यापाट्यांचा खेळ सारखा सुरू झाला होता... पण पुढं मतामत सुरू झाली. 'हातमे हात' मिळवले आणि 'तू पळाल्यागत कर मी धावल्यागत करतो.' अशी बोली झाली. दोघांशिवाय इतर कुठल्याही पोलिसाला याचा पत्ता नाही. ह्या कडक पाण्याचा 'जिल्ही एजंट' सोपानराव ह्यानं पोलीस-जमादाराला बरोबर दावणीला बांधून टाकलं होतं.

ओढ्यावर रात्री-दिवसा केव्हाही जीप अचानक येऊन थांबायची. पण फुटक्या डब्यांशिवाय नि जळणाशिवाय तिथं त्यांना काहीच मिळायचं नाही. माळानं जीप जाताना पिंपळावर खोकटं खॉय खॉक करून ओरडायची नि कामगारवर्ग आपले कारखाने सोडून पसार व्हायचा. ही खोकटं ओरडू लागली की चंद्या पोलीस नि गुरव जमादार यांच्या चेहऱ्यावर विजयाचं समाधान झळकायचं. पण बाकीचे पोलीस मात्र ओढ्यात एकही कुणी कसा दिसत नाही नि गावातही नाही म्हणून संशयानं म्हणायचे,

"आयला, कोण तरी सूचना देत असावं."

"सूचना कोण देणार? पर्तेक डावाला अचानक आपली धाड असती की."

– चंद्या पोलीस पोटातल्या पोटात हासत म्हणायचा.

"आपली जीप येताना माळावर कसला तरी नेहमी आवाज येतो."

चंद्या पोलीस बरोबर उत्तर देई.

"ती खोकटं आरडत्यात. पिप्पळावर लई खोकटं ऱ्हात्यात. शिवाय रातचं भुतं-खेतंबी अचकट-विचकट वरडत असतील."

भुतांचं रातचंच नाव काढलेलं ऐकून एक-दोन पोलीस आतल्या आत

गारद होत जायचे.

मग आलेली पोलीसपार्टी फुटके डबे जप्त करीत निघून जायची. जमादार नि चंद्या पोलीस 'अधिक काय मिळतं की काय' म्हणून तपासण्यासाठी पाठीमागं राहायचे... दुसऱ्या दिवशी कोल्हापुरात दुपारपर्यंत हजर.

रात्रभर सगळा उद्योग व्यवस्थित पार करत होता. हप्त्यांनी खिसे गरम होत होते. पोटंही गरम व्हायची. डोळे रंगायचे. फक्त पिशव्या मोकळ्या राहायच्या.

ह्या पिशव्या सकाळी सोपानरावाच्या मळ्यात जाऊन भरायच्या... भेंड्या, बावच्या,शेंगा, वांगी, केळी, काय मिळेल ते आणि जाईल तेवढं घेतलं की सोपानरावाच्या खोपीत आकडी दुधाचा गरम गरम चहा व्हायचा. मग मस्तपैकी रात्रभर न झालेली झोप. चांगला दहा-आकरा वाजेपर्यंत. आणि झोपेनंतर सोपानरावाच्या घरात पोटभर जेवण. आणि मग कोल्हापुरची वाट. आंबेगावापासनं दररोज बैलगाड्या कोल्हापुरला जायच्या-यायच्या. ह्यातनं यांचा प्रवास व्हायचा.

हा कार्यक्रम बराच काळ अगदी व्यवस्थित चालला होता. सगळेजण पोटभर खात-पीत होते. निकामी झालेले फुटके डबं इमाने-इतबारे पोलीस खाते जप्त करून नेऊन टाकत होते. फायली रंगत होत्या. पोलीसखातं 'उद्योगी' आहे असं सरकारलाही मनापासनं वाटत होतं.

या कडक पाण्याच्या गरम उद्योगाला सोपानरावानं अनेक माणसं लावली होती नि गावातली बेकारी मनापासनं नष्ट करण्याचा प्रयत्न चालवला होता.

''सोपानदा, पोटालाच काय मिळत न्हाई. कामबी कुठं न्हाई.'' अडलानडलेला एखादा विचारायला यायचा.

''सांगंल त्या गावाला, सांगल तिथं बाटल्या पोचत्या करशील का?''

''करीन की.''

''अगदी तोंडाला टाकं घालून जावं लागंल.''

''आणि गावलो तर?''

''सोडवायची येवस्था मी करतो. पर आपून न्हाई तोंड उघडायचं.''

''चालंल की.''

''मग हो तर वरतीकडंच्या वड्याला. सुभान्याला सांग लिवून दिलंय म्हणून.''

माणूस भन्नाट पळायचं. कामाला लागायचं.

सोपानरावाजवळ पैसा भरपूर. लोक हाताशी. एकट्या आंबेगावात तीस-चाळीस एकरांची बागाईत शेती. नदीकाठचं सुपीक रान. ह्या मळ्यात कायम भाजीपाला. पान कायम हिरवंगार. त्या तसरीला सोपानरावसारखा माळवं विकणारा दुसरा कोणी नव्हताच. हे सगळं माळवं आठवड्यातनं दोनदा कोल्हापुरला जायचं, गाडीवर एक गडी आणि सोपानराव बसलेला आहेच. तशात नवी नवी बैलं घ्यायचा, सोपानरावला दांडगा उत्साह. नुकतीच एक न वजवलेली अंडील जोडी चिंचली मायक्काच्या जत्रंसनं आणली होती. माळव्याच्या व्यापाराबरोबर भाजीपाल्याच्या त्याच गाडीत बाटल्या ठेवून कडक पाण्याचाही धंदा कोल्हापुरास त्यानं चांगलाच चालवला होता... तशात सोना नायकीण त्यानं गावात आणून ठेवली आणि सगळं गाव ढवळून निघालं.

संध्याकाळच्या वेळी वडावर कावळे जमल्यागत गावातली तरणी पोरं नायकिणीच्या घराकडच्या बाजूला घुटमळायची. कारण संध्याकाळी सोनाबाई आपल्या दोन-तीन मुलांबरोबर माळानं दोन-तीन फर्लांग फिरून यायची. अंगावर पांढरशुभ्र पातळ. ह्या पातळातनं ती हवेतनं तरंगत गेल्यागत चालायची. आणि तरणी पोरं आतल्या आत ढासळून त्यांच्या काळजाचा चेंदामेंदा व्हायचा. रूप आणि बांधा संगमरवराचा पुतळा घडवल्यागत. तिच्याविषयी असं ऐकायला मिळायचं की तिचा बाप राजघराण्यातला होता आणि आई दरबारची नायकीण होती! बाप राजबिंडा, लांबसडक नाकाचा. लालसर गोरा उंचेला नि घाऱ्या डोळ्यांचा. आई तर दरबारची नायकीण. ह्या दोघांच्या पोटी तिचा जन्म झालेला. आणि संस्थान-दरबार गेल्यावर कागलच्या एका शेटजीनं सोनाबाईला ठेवलेली. पण त्याच्यावर जोरा करून सोपानरावानं तिला आंबेगावसारख्या एका खेड्यात आणून ठेवलं. सोपानरावची तशी हिंमत होती. सोनाबाईच्या सगळ्या अटी त्यानं मान्य केल्या.

गावाच्या एका बाजूला मोकळ्या हवेत तिला घडीव दगडांचा मोर-बंगला बांधून दिला. त्याच्यावर मंगलौरी कौलं गाड्या भरून कोल्हापुरास्नं आणून घालून दिली. बॅटरीवरचा फस्कलास रेडिओ आणून दिला. इंग्रजी बायांच्या उघड्या अंगाच्या तसबिरी. खिडक्यांना पांढरे शुभ्र पडदे. घराला आतनं आकाशी रंग, गाद्या-गिरद्या, बसायचा दिवाणखाना सजलेला. इनामदाराच्या

वाड्यागत घर झालं. रोज सकाळी भाजीपाला येऊ लागला. दूधवाला वीस पैसे कमीनं दूध घालू लागला. पण त्यानं गिऱ्हाईक सोडलं नाही. दूध घालून आल्यावर त्याला पोट भरून पाच पक्वान्नांचं ताटं जेवल्यागत वाटायचं. अशा घरात सोनाबाई नि तिची तीन टवटवीत मुलं. रोज दाढी-मिशा गुळगुळीत करून जास्तीत जास्त पुरूषपण झाकणारा बाबुराव तबलेवाला. बाज्याची पेटी वाजवणारा लुकडा म्हातारा. आणि ह्या सर्वांच्या सेवेला एक बाई. असा सहा जणांचा संसार सोपानराव एका बाईसाठी संभाळत होता... पण इथंही अचानक छापा घालून दोन बोके लोणी खाऊन जातात असं त्याला दिसून आलं. म्हणजे ताक ढवळायचं ह्यानं नि लोणी खायचं बोक्यानं. हे त्याला सोसलं नाही. अचानक त्याला हे बोके मुद्देमालासह सापडले.

त्या दिवशी रात्री दहा-साडेदहाचा सुमार होता. जेवण करून सोपानराव पान खाऊन मन रंजवायला सोनाबाईकडं चालला होता. देवळासमोर पारावर चार-पाच टगी पोरं धुडगूस घालत होती. अंधार चांगलाच पडला होता. माणूस अगदी जवळ आल्याशिवाय ओळखायचं नाही. सोपानरावानं बिडी पेटवली नि तिच्या मंद उजेडात तो अंदाजानं पाय टाकत पुढं चालला.

सोनाच्या घराच्या दिवाणखान्यात गॅसबत्ती पेटली होती. आत सोपानरावाच्या पैशाचं रॉकेल जळत होतं. त्या उजेडात मजा चालली होती. पडदा पसरलेल्या खिडकीतनं पांढराघोट उजेड नखऱ्यानं झगमगत होता.

बिडी विझवून सोपानराव दाराच्या अगदी जवळ आला. नि त्याच्या कानांवर पिशवीतनं राणीछाप रुपये सांडल्यागत खळखळून हासणं आलं. टेर्र झालेला आवाज बरळत होता–

"आणखी एक होऊ दे ऽ ऽ"

"नको आता. पाटील यायची वेळ झाली आहे. तुम्ही उठा."

"मी? मी उठू? मला काय पाटलाची भीती हाय?"

"पण मला आहे."

"तुला तरी का? तू का ऽ य त्याची लग्नाची बायको हाईस?"... बांगड्यांचा आवाज आणि धडपड बाहेर ऐकू आली.

"सोडा बघू हात."

"सोडा न्हाई नि लेमन न्हाई. आदूगर गाणं ऽ."

"हात सोडा माझा आधी."

सोपानरावाचं डोसकं काही न घेता चढत चाललं. पण त्याला काय

करावं हेही कळेना. कारण दुखणं फार अवघड जाग्याचं होतं नि डॉक्टरही ओळखीचा निघाला. मग बराच वेळ काहीच बोलणं बाहेर येईना म्हणून तो बाहेर खाकरला.

''बाबूरा ऽ व!''

तबलावाला बाबूराव धावतच बाहेर आला. सोनाबाई आत सटकली. म्हाताऱ्या पेटीवाल्यानं त्या दोघांना धरलं नि हातापाया पडत बाहेर आणून सोडलं.

''जमादार?'' सोपानरावाच्या दोन्ही भिवयांची गाठ कपाळावर बसली.

''हा ऽ! स ऽज आलो हुतो ऽ!'' तो थोडा शुद्धीवर होता.

''स ऽ ज कशाला? हितं काय हातभट्टी काढलीया?''

''नायकिणीकडं आलो हुतो ऽ– काय म्हणणं हाय?''

''अस्सं?''

''हो ऽ! फुकट न्हाई. पैसे मोजून. हां ऽ!''

''ब ऽ रं!''

''जमादारसाहेब, चला आता गप, रात बरीच झालीया.'' असं म्हणत चंद्या पोलिसानं त्याला ओढून नेला.

मिशावरनं हात फिरवीत सोपानराव आत गेला.

''सोनाबाई, काय चाललंय हे तुमचं?''

''अहो, तुमचंच नाव घेत ते आत आले. मी म्हटलं तुम्ही घरात नाही. तर बसले. मलाही काही बोलता येईना. बसून पान खाल्लं. नको नको म्हणताना पैसे देऊ लागले. मलाही नाही म्हणता येईना. गाण्याचा आग्रह करू लागले.''

भाबडेपणानं बोलल्यागत सोनाबाई घडाघडा बोलून गेल्या. बाबूरावनंही शक्य तितका कमी बायकी अभिनय करून सगळी हकीकत सांगितली.

''तसल्यात तो जमादार पिऊन तर्र झाला होता.''

पेटीवाल्या म्हाताऱ्यानं खालच्या पट्टीतला सूर काढला.

सोपानरावच्या मनाची समजूत पटल्यागत झाली, तरी त्यानं सोनाबाईला समज दिलीच.

सकाळी पोलीस-जमादार अपराध्यागत चेहरे करून सोपानरावच्या मळ्यात आले. त्यांचे खाऊन खाऊन त्यांची अंगं गेंड्याच्या कातडीगत नि तोंडं चटावलेल्या लोचट कुत्र्यागत झाली होती. रातची उतरलीही होती.

''सोपानराव, राती आमचं चुकलंच बरं का. जरा जादाच झाली हुती राती.''

हसत हसत जमादार सांगत होता.

''चुकून झालं असेल. नशेत माणूस काय करतं ते कळत न्हाई.''

काही तरी बोलून माफी करण्याचा विचार सोपानरावचाही होता. कारण टांगड्यात टांगड्या अडकून गुंतागुंतही झाली होती. कुणालाच काही स्पष्टपणे बोलता येत नव्हतं. शिवाय विनाकारण भांडणं काढून वाळली आग मागं लागणार होती. हप्तेही मिळणार नव्हते. उभयपक्षी नुकसान होतं.

पण पुढे महिन्याभरात सोपानरावच्या कानांवर अनेक गोष्टी आल्या. अधनं-मधनं पोलीस-जमादाराचे नि त्याचे खटके उडू लागले. सोपानरावानं कुणा-कुणाकडनं त्याच्या कानांवर घातलं, पण फारसा काही परिणाम झाला नाही. बोक्यांना लोण्याची चटक लागली होती. त्यांनाही आता उपाशी राहिल्यावर बाईशिवाय चैन पडायची नाही. मग काही झालं तरी लोण्यावर डल्ला मारून ते अनेक वेळा बाहेर पडायचे... एकदा तर पुन्हा चक्क दारातच गाठ पडली.

''जमादार, लई झालं आता. आम्हाला न्हाई खपायचं.''

''काय करणार असशील ते कर. ह्या बाईसंगं तुझं काय लगीन लागलं न्हाई. माळावरची मैना हाय ही.''

असं म्हणून दोघेही चालते झाले.

डोकं भिरमटून त्या वेळी सोनाबाईला सोपानराव एकेरीवर येऊन बोलला. तिनंही व्यवस्थित जाणीव करून दिली.

''एखाद्या वक्ताला दुसऱ्याचीही गरज मला भागविली पाहिजे. अडी-अडचणीच्या वेळी उपयोगी पडणारे हे लोक आहेत. त्यांना तोडून कसं भागेल? माझ्याच्यानं ते होणार नाही. तुम्ही पुरूष आहात, तुमचं तुम्ही कसं सांगायचं ते त्यांना सांगा नि इथं यायचं बंद करा. पण ह्या माळावर मी रात्री आरडा-ओरडा करत बसणार नाही.''

सोनाबाईनं तिला साजेल असंच उत्तर दिलं. आणि सोपानरावही स्वतःचं मनगट स्वतःच चावून घेत बसला. त्याला काहीच करता येईना... मारायला गेलं तर चावतंय नि सोडायला गेलं तर माजतंय अशी त्याची अवस्था झाली.

सात-आठ दिवस डोकं खाजवून खाजवून त्यानं कल्पना काढली. पोलीस-जमादाराचा आडवाटेने काटा काढून, तोंड धरून बुक्यांचा मारा

द्यायचा ठरवला.

चिंचली मायक्काच्या जत्रेसनं नवी बैलजोडी आणली होती. ती वजवायला बाहेर काढली. त्यांची वैरण-चंदी वाढवली. रोज पहाटे गाडी जुंपून त्यांना घेऊन सोपानराव माळाला जाऊ लागला. सर्कशीतल्या रिंगमास्तरच्या शहाणपणानं बैलं वजवली. थांबणं, पळणं यातले बारकावे आवाजबरहुकूम करून घेतले. बैलंही घोड्यागत मालकाचा आवाज ओळखू लागली. कासऱ्याला ठराविक दोन हिसके दिले की उभी राहू लागली. मग कितीही वरून ओरडलं तरी जाग्यावरनं हालायची नाहीत. पण जेव्हा एकच हिसका दिला जाई तेव्हा मात्र चौखूर पळू लागली. सगळं सांगून ठेवल्यागत काम होत होतं. त्यांची नांव ठेवली पोलीस आणि जमादार.

हळूहळू या बैलांची गाडी माळवं घेऊन बाजाराला जाऊ लागली. वाट ओळखीची होऊ लागली. गुरव जमादार आणि चंद्या पोलीस यांची ड्युटी तिकटी-गेटावर कधी असते ह्याचीही माहिती सोपानरावाला होतीच. तिकटी गेटावरनंच मंडईला जायची वाट. आठ-पंधरा दिसांत दोन-चारदा माळवं नेऊन वाट बैलांच्या पायाखालची केली.

एक दिवस अकराच्या सुमारास गुरव आणि चंद्या पोलीस गेटात काही तरी लिहीत बसले होते. आणि रस्त्यावरनं त्यांना सोपानरावाचा आवाज ऐकू आला. तो मोठ्यानं शिव्या देत होता, ‘ह्येंच्या आयला मी ह्या जमादाराच्या! खाऊन खाऊन किती रे माजलास तू!– आरं पोलीस, नावाजलेला म्हणून तुला ठेवला नि आता हितं बसतंस व्हय? चल तुझ्या भणं! तुम्हाला किती खायला घालायचं? खाऊन खाऊन माझ्या पोटावर पाय आणता व्हय?– चल म्हणतो न्हवं? म्हसोबापुढं कापून जत्रा करीन तुमची!’’ असं मोठमोठ्यानं बडबडत होता. गावावरनं ओवाळून टाकलेल्या घाणघाण शिव्या देत होता. हातातले कागद टाकून पोलील-जमादार ताडदिशी बाहेर आले आणि त्यांना बघून सोपानरावानं बैलांना एकच हिसका दिला. बैलं चौखूर उधळली. पवट्या टाकत पळाली नि त्यांच्याकडं बघत पोलीस-जमादारांनी शेण खाल्ल्यागत तोंडं केली. आठवड्यातनं दोन दिवस हा कार्यक्रम तिकटीगेटावर पोलीस-जमादारांची ड्यूटी असेल तेव्हा चालायचा. चार-पाच मिनिटांनी बैलं चौखूर उधळायची. पोलीस-जमादार खुळ्यागत उभे राहायचे.

सात-आठ वेळा हा कार्यक्रम झाला. गेटासमोरच बैलांना दोन हिसकं

मारलं नि कासरा जरा तणावला की बैलं उभी राहायची आणि सोपानराव मग वरनं पाटीभर शिव्या पोलीस-जमादार अशी नावं घेऊन मोजायचा. बैलं दोन-चार मिनिटं हलायचीच नाहीत. या दरम्यान पोलिस-जमादाराच्या छपन्न पिढ्यांचा उद्धार सोपानरावानं करून घेतला. त्यांनी खाल्लेलं सगळं अन्न त्यानं तिकटीवर काढलं. कुणालाही ऐकवू नयेत अशी बोलणी त्यांना ऐकवली.

पोलीस-जमादार दोघेही वैतागून गेले. पण नेमकं काय करावं हेही त्यांना कळेना. शेवटी दमात घेऊन एक दिवस त्यांनी सोपानरावची गाडी अडवली, नि त्याला जाब विचारला,

''कुणाला शिव्या देतोस तू?''

''बैलांस्नी.''

पिळलेल्या मिश्यांच्या मागनं सोपानराव गुरगुरला.

''मग पोलीस-जमादार कुणाला म्हणतोस?''

''बैलांस्नीच. माझ्या बैलांची नावं हाईत ती.''

''नावं बदलून ठेव.''

''काय म्हणून? तुम्हाला लईच लागतंय असं वाटत असंल तर तुम्हीच तुमची नावं बदलून ठेवा. जगात काय तुमचीच नावं पोलीस-जमादार म्हणून ठेवावीत असं काय न्हाई.''

''तासाभरात पिंजऱ्यातला पोपट करून टाकू. ड्रेसवर असताना तू आम्हाला शिव्या देतोस, म्हणून फौजदारी करणं काय अवघड न्हाई.''

''खुशाल करा. मीबी डोकं शाबीत ठेवून कोर्टाच्या आवारात पवलेला हाय. नि माझ्याबी मनगटातनं रगतच व्हातंय, हातभट्टीची दारू न्हवं.''

असं म्हणून त्यानं पोलीस-जमादारांची नावं घेऊन दोन खच्चून शिव्या दिल्या आणि बैलांना एक हिसका दिला. बैलं चौखूर पळाली.

पोलीस-जमादार चिंतागतीत पडले. त्यांना सोपानरावचे सगळे गुण ठाऊक होते. आणि तो गुन्ह्यात सहीसलामत गावेल असं नव्हतं. शिवाय हप्ते प्रकरण मधेच त्यानं काढलं तर सारीच बोंब. आपल्याच तंगड्या आपल्याच गळ्यात यायच्या. त्याना काय करावं कळेना.

शेवटी त्यांनी विश्वासात घेऊन जगताप फौजदारालाच सगळी हकीकत सांगितली. फौजदार मोठा कडक होता. सगळी त्याच्यासमोर चळचळायची. ''सोपानराव हा आंबेगावचा खोडसाळ माणूस आहे आणि आपण हप्ते जास्त

उकळतोय अशा संशयानं तो बैलांची नावं पोलिस-जमादार अशी ठेवून शिव्या घालतो.'' असं जमादारानं फौजदाराला सांगितलं. फौजदारापर्यंत जाणारा हप्ताही कमी आहे असं फौजदाराला वाटत होतं, म्हणून आपणही त्याला जरा दमात घेऊन अप्रत्यक्ष दमबाजी करावी असं त्याच्या मनात होतं. वस्तुस्थितीही कळावी म्हणून तो एक दिवस गेटावरच येऊन थांबला.

सोपानरावाची गाडी आली नि गेटासमोर येऊन चिखलात रूतल्यागत थांबली. बैलं पुढं जायलाच तयार नाहीत, म्हणून त्यानं पोलीस-जमादाराच्या नावानं ऊद घालून त्यांचा उद्धार सुरू केला. भरपूर शिव्या ऐकल्यावर फौजदार बाहेर आला.

''ए ऽ तोंड बंद कर.''

''का हो साहेब?''

''कुणाला शिव्या देतोस?''

''बैलांस्नी.''

''मग पोलीस-जमादारांची नावं कशाला घेतोस?''

''ही नावं बैलांचीच हाईत साहेब.''

''मग बदल ती.''

''जीव गेला तरी बदलणार न्हाई.''

सोपानराव खंबीर होऊन बोलला.

''का?''

''साहेब, माणसांची नावं बदलली तर माणसाला कळत्यात... पण जनावरांची नावं बदलून भागत न्हाई. त्यांस्नी मरूस्तवर त्याच नावानं हाका मारावं लागतं. कारण त्येंनी तेवढचं नाव ध्येनात ठेवलेलं असतं.''

''अस्सं?''

''हां!''

''पण बैलांची जगावेगळी अशी नावं ठेवलीसच कशाला?''

''त्येचं असं झालं साहेब. आंबेगावात पोलीस-जमादारांचा लई धुमाकूळ. दारूचं अड्डं पकडाय, हप्तं उकळाय, गावातल्या माणसांस्नी दम द्यायला पोलीस-जमादार मंडळी लई येत्यात तिकडं. शिवाय एक पोलीस नि जमादार आमच्या शेतावर तर कायम येऊन पडलेलं असत्यात. रोज जाता-येता भाजीपाल्याच्या पिशव्या भरून न्हेत्यात.''

''नावं सांगशील त्येंची.'

सोपानराव चंद्या पोलीस नि जमादाराकडं बघत म्हणाला,

''आता नावं नि काय करायची साहेब. गरिबांच्या नोकरीवर पाणी पडंल.''

पोलीस-जमादारांचे चेहरे ढेकळागत झाले होते.

''पण त्याचा नि ह्यांचा संबंधच काय?'' फौजदार.

''समंध हाय तर. माझ्या बारक्या पोरानं हीच नावं नव्या तऱ्हेची हाईत म्हणून ठेवली झालं.''

''असं?''

पोलीस-जमादार जरा गडबडलेच. त्यांना वाटलं आता हे प्रकरण इथंच संपवावं. त्यांना काळजी वाटू लागली. सोपानरावही तेवढ्यावरच थांबला. फौजदारही शहाणपणानं पण जरा करड्या आवाजातच सांगत होता.

''मग गेटासमोर गाडी आणून थांबवत जाऊ नकोस.''

''साहेब, मी का मुद्दाम थांबवितोय व्हय? बैलंच हितं येऊन थांबत्यात, ते काय केल्या घटकाभर हलतच न्हाईत.''

''ते कसं काय?'' फौजदाराचा छद्मी प्रश्न.

''कुणाला ठावं? बुजत असतील कशाला तरी... ह्येच्या भणं, ह्या गेटावर भुतबितं ऱ्हात्यात का काय कुणाला दखल?''

''बराच बोलतोस!''

''खरं ते बोलतोय साहेब... आंबेगावला लई भुतं हाईत. आणि आंबेगावात हिकडची लई माणसं येत्यात. काय थोडी आंबेगावची हिकडं येत्यात. तवा त्येंच्याबरोब एखादं भूतबी हितं येऊन बसायचं.''

''गाडी दुसऱ्या वाटेनं नेत जा मंडईला.''

''हीच वाट बैलांच्या पायाखालची हाय साहेब. दुसऱ्या वाटेनं बैलं बुजत्यात. मोटारीच्या आडवं-तिडवं गेली तर चार हजारांचं माझं लुकसान हुईल. भरून कोण देणार? जातो. उशीर झाला.''

असं म्हणून त्यानं बैलांना एक हिसका दिला. पोलीस-जमादाराला दोन शिव्या हासडल्या.

सोपानरावाच्या कडवट बोलण्यावरून फौजदारानंही काही अंदाज बांधले. पोलीस-जमादाराला आणखी काही प्रश्न विचारले. फारसं काही हाताशी लागलं नाही. पण एक दिवस अचानक सोपानराव फौजदाराला कोर्टात भेटला. विश्वासात घेऊन फौजदारानं त्याला सगळी भानगड

विचारली.

"साहेब, तुमचा त्यो चंद्या पोलीस नि गुरव जमादार, दोघंबी हजाम हाईत. ह्येंचं मी लई सोसलं. पदरमोड करून ह्यांस्नी घाटलं आणि शेवटला माझ्याच घरचं वासं मोजून जाऊ लागलं.

"काय, झालं तरी काय?"

"त्येचं असं आहे साहेब, मी माझ्या इतमामाला सोभण्याजोगी एक बाई ठेवलेली हाय."

"बाई?"

"बाई म्हंजे आपली नायकीण हो."

"नायकीण? ? ?"

"हां ऽ!"

"ब ऽ ऽ रं!"

"तर हे भडवे आता रातसारी तिथं जाऊन दारू पिऊन धुडगूस घालत्यात."

"दारू पिऊन?"

"हां ऽ! बाटलीबिगार बाईची मजा कसी चाखता येणार?"

"खरं आहे."

"खरं काय हाय" बाईसंग मजा मारायची असेल तर सोताची ठेवावी म्हणतो मी."

"हां, तेच म्हणतो मीबी."

फौजदारानं स्वत:ला सावरून घेतलं.

"ठीक आहे. मी बंदोबस्त करतो त्याचा. तू काही काळजी करू नको."

तेव्हापासून ह्या पोलीस-जमादारांची जोडी आंबेगावला यायची बंद झाली. गावात मग हप्ते भरणाऱ्यांनाही भरपूर फायदा उरू लागला. त्यांचा उत्साह दुप्पट वाढला. बिन हप्तेवाल्यांनीही दोन दोन चुली वाढवल्या. सोपानराव निर्धास्त झाला. हप्तेही वाचले. रोज रातचं बिनघोरपणानं सोनाबाईकडं पान खायला जाऊ लागला.

पलीकडच्या ओढ्याला दोन-तीन आठवडे निर्धास्तपणानं धुळवड साजरी झाली नि अचानक एका रात्री शिमगा झाला. पोलीस आले. व्हॅन भरून माणसं नि लॉरी भरून रसायनाची पिपं पकडली. जगताप फौजदार नि काळे इन्स्पेक्टर दिशा चुकवून अचानक जाळं पसरून बसलेले कुणालाच माहीत नव्हते. तरी पण निम्मेनीम लोक पळून गेले. रातभर माळावर कालवा

झाला. ही सगळी वरात कोल्हापुरला जाईपर्यंत पहाट झाली.

बरेच दिवस सामसूम झाल्यावर हळूहळू एक एक भट्टी जागा बदलून मिणमिणत्या जाळावर पुन्हा पेटू लागली. फौजदार आणि इन्स्पेक्टर अधनं-मधनं सारखे येऊन जाऊ लागले. गावात चौकशी करून हव्या असलेल्या माणसांना कोल्हापूरला नेऊ लागले. गावातील खडा न खडा माहिती त्यांनी काढली नि हातभट्टीवाल्यांच्या हातात कड्या पडू लागल्या. सोपानरावलाही वहिमावरनं एक दोनदा दम दिला.

रातचं जेवण करून सोपानराव सोनाबाईच्या दारात आला नि पुन्हा त्याच्या कानावर हसणं-खिदळणं पडलं.

''कोण ह्या वक्ताला आलंय?'' म्हणून रागाच्या दणक्यात त्यानं दाराची कडी खडाखडा वाजवली.

''सोना ऽ ऽ''

''कोण आहे रे तो?'' करत तांबारलेल्या डोळ्यांचा फौजदार नि इन्स्पेक्टर बाहेर आले. अचानक ह्या लोकांना पाहून सोपानराव गडबडून गेला आणि वरवर हॅ हॅ करून हासला.

''काय काम हाय? एवढ्या रातचं इकडं कुठं?''

डोळ्यांचे रंग बदलल्यामुळं नि समोरचं अंधारात स्पष्ट दिसत नसल्यामुळं जड जिभेनं फौजदार बोलला.

''कुणीकडं चालला आहेस बोल.''

''साहेब, तुमच्याकडंच आलो हुतो.''

– सोपानरावानं स्वत:ला सावरलं. उजेडात आल्यावर व बोलाचाली झाल्यावर फौजदारानं त्याला ओळखलं.

''का? ह्या वेळी आमच्याकडं काय काम काढलं?''

''माझा बेत बदलला म्हणून सांगायला आलो हुतो.''

''कसला?''

''बैलांची नावं बदलून ठेवायचा मी इचार केलाय.''

''वा! वा! छान! काय नावं ठेवणार आहेस आता तू त्यांची?''

''फौजदार-इन्स्पेक्टर.''

सोपानराव एवढंच बोलला नि फौजदाराच्या डोळ्यांपुढं त्या अंधारातही काजवे चमकले.

''आणि गाडी अगदी तुमच्या घरावरनं न्ह्यायचं ठरीवलंय.''

असं म्हणून सोपानराव त्या अंधारात रावणासारखा सात मजली हसला.

❖



# डॉ. आनंद यादव यांची साहित्यसंपदा

### आत्मचरित्र
झोंबी
नांगरणी
घरभिंती
काचवेल

### कादंबरी
माऊली
नटरंग
गोतावळा

### कथासंग्रह
शेवटची लढाई
भूमिकन्या
खळाळ
झाडवाटा
माळावरची मैना
घरजावई
उखडलेली झाडं
उगवती मने
आदिताल
डवरणी

### बाल-कुमार साहित्य
सैनिक हो, तुमच्यासाठी...

### काव्य
मळ्याची माती
माय लेकरं

### वैचारिक/ललितगद्य
साहित्यिकाचा गाव
मातीखालची माती
स्पर्शकमळे
पाणभवरे
साहित्यिक जडण-घडण
ग्राम संस्कृती

### संदर्भ ग्रंथ
मराठी लघुनिबंधाचा इतिहास
साहित्याची निर्मिती प्रक्रिया
ग्रामीणता : साहित्य आणि वास्तव
आत्मचरित्र मीमांसा
ग्रामीण साहित्य : स्वरूप व समस्या
मराठी साहित्य : समाज व संस्कृती
१९६० नंतरची सामाजिक स्थिती आणि साहित्यातील नवे प्रवाह

आता शिंगं फुटलीत
तुझ्या पाडसाला, आई.

भोवतीच्या डोंगरांची
आता सपाटेल भुई.

माझ्या भावंडांनो, आता
हातांवर तोला जग.
दुबळ्याशा मायाजीवी
आणा पोलादाची रग.

घर, गोत, गाव : खुंटा!
खुंट्याभोवतीच फेऱ्या.

तोडा रेसमाची दावी
दिशा कराया साजऱ्या.

मणमण मालकाला
आणि सूप सालदारा.

खंडीखंडी धनी नेई,
पेंडीपेंडी कष्टणारा.

माया करता करता
पिकावारी जन्म गेला;

तरी भुकेपाशी दाणा
कधी नाहीच भेटला.

कसा गुलाब फुलावा?
आता काटेच उरले!

गुलकंद खाई कोण?
ऐसे दैवच फिरले.

...तुझी काळीज वाळवीच
आई, बाहीर पडली;

लाख इंगळ्या होऊन
मला आतून डसली.

**- डॉ.आनंद यादव**
'मायलेकरं' या कविता संग्रहातून

# काळ्या पदराच्या आड

गेली परतून पाखरं
पोटं भरून घराला.
आभाळाच्या माळावरनं
दीस खाली उतरला.
हात लावून कपाळाला
सांज कुणाची वाट पाही.
आणि किनीट पडता
लगबग घरी जाई.
रात गेलेली कामाला
आली दमून परत.

दार उघडलं तिनं
हुता अंधार घरात.
शेजारी उगवतीच्या
हळू घरास तवा गेली.
काळ्या पदराआडनं
चांद-चिमणी आणली.
–ठेचाळशील गं राती;
सावकाश चाल बाई.
ठावक्यातलंच तेल;
दुसराबी दिवा न्हाई!

**- डॉ.आनंद यादव**
'मळ्याची माती' या कविता संग्रहातून


**मेहता मराठी ग्रंथजगत**
१९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, बाजीराव रोड,
टेलिफोन भवन समोर, पुणे-३०. फोन-०२० २४४७६९२४

प्रति,

संपादक, मुद्रक, प्रकाशक : सुनील अनिल मेहता यांनी हे मासिक १९४१, सदाशिव पेठ, माडीवाले कॉलनी, पुणे ४११ ०३० येथून प्रसिद्ध केले. मुद्रण स्थळ : जय गणेश ऑफसेट, ३५६, अ गणेश पेठ, पुणे २.